19-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A



**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**जळगांव जिल्हा परिषदेअंतर्गत बांधण्यात आलेल्या साठवण बंधाऱ्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१) * २०३८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा परिषदेअंतर्गत माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान ८२ साठवण बंधाऱ्यांच्या कामामध्ये रुपये १.५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्यामुळे आणि सदरचे काम निकृष्ट झाल्याबाबत जिल्हा परिषद जळगावच्या सर्वसाधारण सभेमध्ये २७ उपअभियंता यांची चौकशी मंत्रालयाच्या ग्रामविकास विभागामार्फत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय शिवतारे**, **श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता:** (१) व (२) होय, मात्र अशी चौकशी जलसंपदा विभागामार्फत करण्यात येत आहे. सदर कामे जिल्हापरिषदे अंतर्गत असल्याने जलसंपदा विभागाच्या दिनांक ०१/०१/२००५ रोजीच्या परिपत्रकानुसार जलसंधारण विभागाचे अभिप्राय आवश्यक आहेत. त्यानुसार जलसंधारण विभागाचे अभिप्राय देण्याबाबत पुढील कार्यवाही सुरू असून, त्यानंतर पुढील कार्यवाही जलसंपदा विभागाकडून करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. विक्रम काळे : जळगाव जिल्हा परिषदेअंतर्गत हे साठवण तलाव बांधलेले आहेत. या कामामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी जलसंपदा खात्यामार्फत करण्यात आलेली आहे काय, असल्यास दोषीवर काय कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री. विजय शिवतारे : जळगाव जिल्हयाच्या तत्कालीन पालकमंत्र्यांच्या तक्रारीवरुन 31 साठवण बंधाऱ्याच्या कामाची चौकशी करण्यात आली. नाशिकचे उपायुक्त श्री. गुडेवार यांनी चौकशी केलेली असून चौकशी अहवाल सादर केलेला आहे. प्रकल्पाच्या साठ्यापेक्षा कमी साठा उपलब्ध होतो असा मुख्य आरोप आहे. त्यासंबंधीचा चौकशी अहवाल जलसंपदा विभागाला सादर झालेला आहे. जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांची मूळ आस्थापना ही जलसंपदा विभाग असल्यामुळे दि. 1.1.2005 रोजीच्या परिपत्रकानुसार जलसंधारण विभागाचे अभिप्राय आवश्यक

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. दिनांक 12.12.2014 रोजी जलसंधारणाच्या अभिप्रायासाठी अहवाल प्राप्त झालेला आहे. जलसाठ्याच्या बाबततचे सर्टिफिकेशन मुख्य अभियंता, जलसंधारण, पुणे यांच्याकडे पाठविले गेले आहे. प्रकल्पीय जलसाठा कमी झालेला आहे असा मुख्य आरोप आहे. त्यामुळे त्यासंबंधीचे सर्टिफिकेट आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

ॲड. अनिल परब : अभियंत्यांनी काम व्यवस्थित केले नाही म्हणून त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. या प्रकरणी घाणे या अभियंत्यांनी चौकशी केली होती. परंतु मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी होऊ दिली नाही. या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश केव्हा काढण्यात आले, चौकशी केव्हा झाली, मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी चौकशी दाबून ठेवली असेल तर या प्रकरणाची पुनश्च चौकशी करण्यात येईल काय ? ज्या अधिकाऱ्यांनी चौकशी दाबून ठेवली, चौकशी करण्यामध्ये दिरंगाई केली त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. विजय शिवतारे : 31 बंधाऱ्यांची कामे सन 2009-2010मध्ये झालेली आहेत. सन 2011-2012 मध्ये तत्कालीन पालकमंत्र्यांनी या संबंधात तक्रार केली होती.त्यांच्या पत्रानुसार त्वरित चौकशी आदेश देण्यात आले. नाशिक उपायुक्त यांनी या प्रकरणी चौकशी केली. एकूण 31 बंधाऱ्याची कामे आहेत. यामध्ये तांत्रिक बाबी आहेत. मुख्य आरोप साठवण क्षमतेबाबत करण्यात आलेला आहे. उपायुक्तांनी कार्यकारी अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली 4 समित्या नेमल्या. जेव्हा हे बंधारे पाण्याने भरलेले असतात त्यावेळी पाण्याचा साठा तपासता येतो. परंतु उंची, लांबी व रुंदी यासंबंधीचे मोजमाप पाणी बंधाऱ्यामध्ये पाणी नसते त्यावेळी होऊ शकते.पावसाळयामध्ये जलसाठ्याची तपासणी होऊ शकते आणि संपूर्ण स्ट्रक्चरची तपासणी उन्हाळयामध्ये होऊ शकते. या अधिकाऱ्यांच्या आस्थापना जलसंपदा खात्याकडे आहे. प्रकल्पाचा जलसाठा कमी असल्याचा आरोप आहे. यासंबंधीचे सर्टिफिकेट जलसंधारण खात्याच्या मुख्य अभियंत्याकडून उपलब्ध झ ाल्याबरोबर कारवाई करण्यात येईल. याप्रकरणास एक दीड वर्षाचा कालावधी झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी या प्रकरणाची चौकशी मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दाबून ठेवलेली आहे असा उल्लेख केलेला आहे. परंतु तसे झालेले नाही. संपूर्ण पाण्याचा साठा आणि स्ट्रक्चरची तपासणी करण्यासाठी वेळ लागलेला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2038...

श्री. विक्रम काळे : मंत्री महोदय हे अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत असे वाटते. बंधाऱ्यामध्ये पाणी असल्यामुळे त्याची लांबी, रुंदी आणि खोली मोजता येत नाही असे त्यांनी सांगितले. आता विज्ञान इतके पुढे गेलेले आहे की, पाणी असताना देखील प्रकल्पाची लांबी, रुंदी, खोली तपासता येते. अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती चुकीची असून मंत्री महोदयांना उत्तरामध्ये दुरुस्ती करता येईल. या प्रकरणी तपास पूर्ण झालेला आहे. चौकशी करण्यामध्ये अधिका-यांकडून दिरंगाई करण्यात येते. या प्रकरणी जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर हे अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. विजय शिवतारे :प्रकल्पाच्या साठ्यापेक्षा प्रत्यक्षात कमी साठवण क्षमता निर्माण झालेली आहे असा मुख्य आरोप आहे. मुख्य अधियंता, जलसंधारण, पुणे हे या बंधाऱ्यामध्ये प्रकल्पसाठ्यापेक्षा कमी साठवण क्षमता निमार्ण झालेली आहे की नाही यासंबंधीचे सर्टिफिकेशन करतात. म्हणून ती फाईल त्यांच्याकडे गेलेली आहे. प्रकल्पीय साठ्यापेक्षा कमी साठवण क्षमता निर्माण झालेली आहे असे सर्टिफिकेशन त्यांनी केले तर एल छेद घेत असताना जे काही मापदंड आहेत त्या मापदंडामध्ये बसविण्यासाठी मुद्दाम असा प्रकार केला गेला आहे काय यासंबंधीची सखोल चौकशी 8-10 दिवसामध्ये होऊ शकते. सर्टिफिकेट येऊ द्या. ते आल्यानंतर पुन्हा तांत्रिक बाबी तपासून संबंधितावर कडक कारवाई केली जाईल.

श्री. राजेंद्र मुळक : साठवण बंधारा बांधत असताना मूळ संकल्पचित्र तयार करण्यात आले असेल आणि त्या संकल्पचित्राप्रमाणे बांधकामामध्ये तफावत असेल तर अधिकारी कारवाईस पात्र आहेत. म्हणून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. विजय शिवतारे : सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न योग्य आहे. या प्रकरणी साठवण क्षमता कमी झाली आहे असा मूळ आरोप आहे. जेव्हा तलाव बांधले गेले त्यावेळच्या इन्स्पेक्शन रिपोर्टमध्ये काही ठिकाणी मायनर गोष्टींमध्ये तफावत दिसते. तो काही मोठा दोष नाही. क्वालिटीच्या बाबतीत तपासणी झालेली आहे. बांधकाम उत्तम झालेले आहे. पाणी कुठे गळत नाही. इन्स्पेक्शन रिपोर्ट आणि प्रत्यक्ष तपासणीमध्ये 31 पैकी एक-दोन बंधा-याच्या कामामध्ये

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2038....

तफावत आढळून आलेली आहे. हा दोष मोठा नाही. प्रचलित मापदंडाप्रमाणे पाणीसाठा कमी झालेला असून मुद्दाम मापदंडामध्ये बसविण्यासाठी कामामध्ये काही गडबडी करण्यात आलेल्या आहेत काय असा आरोप करण्यात आलेला होता.

----

...नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**यवतमाळ पंचायत समितीमध्ये सुमारे ३ कोटी ३३ लाख रुपयांचा**
**मुद्रांक शुल्काचा झालेला अपहार**

**(२) * २४५ श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) पंचायत समितीमध्ये सुमारे ३ कोटी ३३ लाख रुपयांचा मुद्रांक शुल्काचा अपहार झाल्याची बाब चौकशी समितीला माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात किती अधिकारी व कर्मचारी गुंतले आहेत, व त्यांच्याविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व संबंधितांविरुध्द केव्हा कार्यवाही करण्यात येणार आहे ?

**श्री.दीपक केसरकर**, **श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणात श्री.पी.जी.पारवे तत्कालीन विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती यवतमाळ व प्रशासक यवतमाळ ग्रामीण, श्री.आर.जी.कोरम तत्कालीन सचिव ग्रामपंचायत पिंपळगाव व प्रशासन यवतमाळ ग्रामीण व श्री.यु.एम.माने तत्कालीन सचिव ग्रामपंचायत लोहार या सर्वाना प्रशासकीय कार्यवाही संदर्भात कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. तसेच विस्तार अधिकारी (पं) यांचे मार्फत १५ ग्रामपंचायतीचे मुद्रांक शुल्क अनुदानाबाबतच्या अभिलेख्याची तपासणी करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, श्री.पी.जी.पारवे, आर.जी.कोरम व यु.एम.माने यांना कारणे दाखवा नोटीस केव्हा देण्यात आली व त्याची सद्य:स्थिती काय आहे?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, दिनांक 1.11.2014 रोजी या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रश्न 3.33 कोटी रूपयांच्या मुद्रांक शुल्काचा अपहारासंबंधीचा होता. शासनाने ही बाब मान्य केली असून चौकशीचे काम सुरु असल्याचे म्हटले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. हे काम विस्तार अधिकाऱ्यांकडे दिले आहे. विस्तार अधिकारी हे त्यांच्यापैकीच एक आहेत. त्यामुळे चौकशीचे काम तहसीलदार किंवा प्रांत अधिकाऱ्यांकडे सोपविले जाईल काय?

...2...



ता.प्र.क्र.245.....

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिनांक 5.11.2014 रोजी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार 15 विस्तार अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे, ही बाब सत्य आहे. माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्याबाबत विचार करुन आवश्यक त्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या जातील.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, दिनांक 1.11.2014 रोजी संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्याचे म्हटले आहे. अपहाराची घटना 2009-10 व 2011-12 या वर्षातील आहे. मी प्रश्न उपस्थित केल्यानंतर कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांना आजच्या आज निलंबित करुन पुढील चौकशी केली जाईल काय?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मूळ प्रश्न मुद्रांक शुल्क अपहारासंबंधीचा आहे. वास्तविक मुद्रांक शुल्काची रक्कम वितरण करीत असताना काही ग्रामपंचायतींना अधिक रक्कम दिली गेली व काही ग्रामपंचायतींना कमी रक्कम दिली गेली, ही या प्रकरणातील अनियमितता आह. त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला होता. वितरण केलेल्या निधीचा विनियोग ग्रामपंचायतींकडून योग्य प्रकारे झाला आहे की नाही, झाला नसेल तर तो भ्रष्टाचार होतो. म्हणून सखोल चौकशीची आवश्यकता आहे. त्यानुसार सखोल चौकशी केली आहे. या प्रश्नाबाबत ब्रिफिंग घेत असताना मी स्पष्टपणे सूचना दिल्या आहेत की, अपहार झाला असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई केली गेली पाहिजे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये अपहार झाल्याची बाब शासनाने मान्य केली आहे. या प्रकरणाची चौकशी कोणी करावी याबद्दलचे निकष काय आहेत? विस्तार अधिकाऱ्यांची चौकशी इतर विभागातील विस्तार अधिकाऱ्यांमार्फत केली जाणार आहे. त्यामुळे खरोखर चौकशी होणार आहे की चौकशी न करण्याकडे शासनाचा कल आहे? किती रक्कमेपर्यंत अपहार झाल्यास कोणामार्फत चौकशी करावी याचे निकष निश्चित केले आहेत की प्रश्न उपस्थित झ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ााल्याने उपचार म्हणून चौकशी केली जात आहे. चौकशी सुरु असताना संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणार आहात काय किंवा सक्तीच्या रजेवर पाठविणार आहात काय?

...3...



ता.प्र.क्र.245.....

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मूळ प्रश्न ग्रामपंचायतींच्या निधी वितरणासंबंधीचा होता. ग्रामपंचायत विस्तार अधिकाऱ्यांची सबऑर्डिनेट आहे. त्यामुळे त्याची चौकशी विस्तार अधिकारी करु शकतात. त्यातून सत्य बाहेर येईल. माननीय सदस्यांची मागणी असेल तर निश्चितपणे या प्रकरणाच्या चौकशीकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, 3.33 कोटी रुपयांचा अपहार ही साधी बाब नाही. किती रक्कमेचा अपहार झाल्यानंतर कोणत्या अधिकाऱ्यामार्फत चौकशी करावी याचे निकष विभागाने निश्चित केले आहेत का? विस्तार अधिकाऱ्याकडे 3.33 कोटी रुपयांच्या अपहाराची चौकशी करण्याचे प्रकरण सोपविणे उचित नसल्यामुळे हे प्रकरण एसीबीकडे दिले जाईल काय?श्री.दीपक केसरकर : मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी निधीच्या संदर्भात चौकशी केली. त्या चौकशीकरिता सहाय्यक लेखा अधिकारी (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आहे. वित्तीय अनियमितता मोठया प्रमाणात दिसत असली तरी कोणत्या ग्रामपंचायतीला कमी निधी दिला गेला आणि कोणत्या ग्रामपंचायतीला अधिक निधी दिला गेला आणि तो निधी योग्य प्रकारे वापरला की नाही याची चौकशी करताना असे आढळून आले की, दोन ग्रामपंचायतींनी दोन खाती उघडली आहेत. त्या ग्रामपंचायतींकडून अनियमितता झाली आहे. त्याबाबतची चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यामधील सत्य उघडकीस येऊ शकेल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, 3.33 कोटी रुपयांच्या मुद्रांक शुल्क रक्कमेचा अपहार झ ााल्याची बाब खरी असल्याचे उत्तरात म्हटले आहे. हा अपहार आहे की अनियमितता आहे?

श्री.दीपक केसरकर : उत्तरामध्ये अनियमितता झाली आहे असे नमूद करणे आवश्यक होते.

**सभापती** : मंत्री महोदय, आपले उत्तर अचूक असण्याची काळजी आपण घ्यायची असते.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, यवतमाळ जिल्हयातील पंचायत समितीमध्ये 3.33 कोटी रुपयांचा अपहार झाल्याची बाब चौकशी समितीला माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये निदर्शनास आली हे खरे आहे काय? याबाबत उत्तर देत असताना मंत्री महोदयांनी हे खरे आहे असे म्हटले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याचा अर्थ भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे अनियमिततेचा प्रश्न येत नाही. भ्रष्टाचार झाला असेल तर सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आजच्या आज निलंबित करणार आहात काय?

नंतर सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ AKN/ AKN/ ST/ पूर्वी श्री. भोगले....... 11:20

ता. प्र. क्र. 245 ..............

श्री. दीपक केसरकर : महोदय, मी यापूर्वी उत्तर देतांनाच सांगितले आहे की, निधीचे वितरण करताना ग्रामपंचायतींना कमी जास्त निधी गेलेला आहे ही वस्तुस्थिती असून त्यानुसार मला उत्तरात दुरुस्ती करण्याची परवानगी द्यावी.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हरकत घेत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. वास्तविक मंत्री महोदयांनी अगोदरच उत्तरात दुरुस्ती करणे अपेक्षित असते. ठीक आहे, आता आपण दुरुस्ती करावी आणि त्यानंतर या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपण मंत्री महोदयांना उत्तरात दुरुस्ती करण्याची परवानगी दिलेली आहे. तसेच मंत्री महोदय ही दुरुस्ती गृहित धरुनच वारंवार उत्तर देत आहेत की या प्रकरणात अपहार झालेला नसून अनियमितता झालेली आहे. याचे कारण मुद्रांक शुल्काचा निधी ग्रामपंचायतींना कमी जास्त प्रमाणात गेला आणि ही बाब अनियमितताच होते. या अनियमिततेबाबत चौकशी सुरु असून ही अनियमितताच आहे असे समजावे.

श्री. माणिकराव ठाकरे : महोदय, अपहार नसून अनियमितता आहे अशी मंत्री महोदयांनी वास्तविक सुरुवातीलाच उत्तरात दुरुस्ती करणे आवश्यक होते. तसे केले असते तर हा विषय फारसा पुढे गेला नसता. पण उत्तरात अपहाराचा उल्लेख केल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री. किरण पावसकर : महोदय, मंत्री महोदयांच्या म्हणण्याप्रमाणे ही अनियमितता असेल तर 3 कोटी 33 लाखाची अनियमितता ही लहान गोष्ट नाही तसेच पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात सुध्दा मंत्री महोदयांनी "हे खरे आहे" असे म्हटले आहे. तसेच पुन्हा नंतरच्या प्रश्नाच्या उत्तरात नोटिसेस बजावण्यात आल्या असल्याचेही ते सांगत आहेत. त्यामुळेच ही अनियमितता नसून भ्रष्टाचार असावा म्हणूनच नोटिसेस बजावण्यात आल्या आहेत आणि यातून शासनाचा पैसा गेलेला आहे. मंत्री महोदय सभागृहात उपस्थित राहून उत्तर देत आहेत मग अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास मागे का हटत आहेत? हे प्रकरण नोव्हेंबर महिन्यात घडलेले आहे त्यामुळे यात मंत्री महोदयांचा हात आहे की काय, नसेल तर ते दोषींवर कारवाई का करीत नाहीत, त्यांना पाठीशी का घालत आहेत ?

..........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.245..........

श्री. सुधीर मुनगंटीवार : सन्माननीय सदस्यांना याची जाणीव आहे काय की ज्या पध्दतीने ते मंत्री महोदयांवर आरोप करीत आहेत, त्यांचा या प्रकरणात हात आहे काय अशा प्रकारची भाषा सभागृहात मंत्री महोदयांबाबत वापरणे कितपत योग्य आहे, ही प्रश्न विचारण्याची त्यांची पध्दत योग्य नाही. या राज्याच्या प्रत्येक पैशाचे संरक्षक म्हणून आपण काम करीत आहोत. असे असताना मंत्री महोदयांना अशा प्रकारे प्रश्न विचारणे किंवा त्यांच्यावर हेत्वारोप करणे उचित नाही. हा तारांकित प्रश्न आहे आणि तारांकित प्रश्नासंबंधीचे काही सामान्य नियम आहेत. तारांकित प्रश्नात आपण एक-एक रुपयाचे विश्वस्त आहोत त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अपहार होता कामा नये याची काळजी आपण सर्वच घेत असतो. या प्रकरणात मंत्री महोदय वारंवार सांगत आहेत की, अपहार नसून अनियमितता आहे आणि दुसरीकडे आपला नैसर्गिक कायदाच असा सांगतो की, नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली पाहिजे, त्यानुसारच या कारणे दाखवा नोटिसेस इश्यू करण्यात आल्या आहोत. अशा प्रकारच्या अनियमिततांबाबत आपण अनेक वेळा चौकशी करीत असतो तशीच ही चौकशी असून या अनियमिततेसंबंधीच्या चौकशीचा अहवाल येत्या 15 दिवसात घेतला जाईल आणि पुढील अधिवेशनात याच तारांकित प्रश्नाबाबतची संपूर्ण माहिती सभागृहाला दिली जाईल. मंत्री महोदयांनी अपहार नसून अनियमितता झाल्याचे वारंवार मान्य केले. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अनेक राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यांमध्ये प्रिंटींग मिस्टेक म्हणून बऱ्याच गोष्टी छापल्या जातात पण आज सभागृहाच्या पटलावर मंत्री महोदय एका चुकीची दुरुस्ती करीत आहेत त्यामागील त्यांची भावना लक्षात घ्यावी.

श्री. धनंजय मुंडे : महोदय, हा मुद्रांक शुल्काचा विषय असून त्यात अनियमितता असली तरी देखील ही गंभीर बाब आहे. तसेच छापिल उत्तरात सुध्दा मंत्री महोदयांनी अपहार मान्य केला आहे. याबाबत माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मुद्रांक शुल्काची रक्कम पंचायत समितीच्या ज्युरिडिक्शनमधील सर्व गावांना त्या त्या गावच्या लोकसंख्येच्या आधारावर विकासाठी दिली जाते. ही मुद्रांक शुल्काची रक्कम जर कमी दिली गेली असेल तर तो एक प्रकारे अनियमितता नसून अपहार समजला जाईल म्हणून आजच्या आज ज्यांनी ज्यांनी अशी अनियमितता अथवा अपहार केला असेल त्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी शासन करणार काय ?

यानंतर श्री. भारवि..........

अशुध्दप्रत/ प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.245...

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, ग्रामपंचायतीला लोकसंख्येनुसार वाटप होत आहे. सदर रक्कम ही स्टॅम्प डयूटीची आहे. स्टॅम्प डयूटीची फक्त 50 टक्केच रक्कम प्राप्त होते. ही स्टॅम्प डयूटी जमा झाली आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीला वितरण करण्यात आलेली रक्कम ही वेगळवेगळी आहे. ह्या ग्रामपंचायती शहराच्या जवळ असल्यामुळे त्यांना मिळालेली रक्कम ही मोठी आहे. तेथून स्टॅम्प ड्यूटीचा होणारा भरणा हा मोठा असतो. येथे वितरित करण्यात आलेल्या रकमेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. ही रक्कम प्रत्येक ग्रामपंचायतीकडे पोहोचलेली आहे. यासंबंधात चौकशी करावयाची गरज भासली तर त्याबाबतीत आम्ही मागे देखील हटणार नाही. कोणी भ्रष्टाचार केला असेल तर त्याला शिक्षा केली पाहिजे या मताचे आम्ही देखील आहोत. ग्रामपंचायतीकडे रक्कम ही चेकने पाठविली जाते. सदर चेक मिळाल्यानंतर ती रक्कम खात्यामध्ये जमा केली पाहिजे. त्या रकमेचा वापर नॉर्म्सप्रमाणे केला पाहिजे. याची चौकशी होत असतानाच आमच्या लक्षात आले की, काही ग्रामपंचायतींनी दोन-दोन खाती उघडलेली आहेत. तेथे अनियमितता किंवा भ्रष्टाचार होऊ शकतो. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या चौकशीचे आदेश आम्ही दिलेले आहेत.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. एखादे वाक्य जेव्हा अर्धवट ऐकले जाते त्यावेळी त्यातून चुकीचा अर्थ निघू शकतो. त्यामुळे माझे वाक्य पूर्ण ऐकून घ्यावे. येथे खरोखर भ्रष्टाचार होऊ नये असा आपला उद्देश असेल तर या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे म्हणून आम्ही ग्रामपंचायतीपासून चौकशी करण्यास सांगितले आहे. आमचा उद्देश सखोल चौकशी करण्याचा आहे व त्यात जे दोषी आढळतील त्यांना शिक्षा करण्याचा आहे. यात पैसे हे चेकने गेलेले आहेत. त्यामुळे त्यात अपहार होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हे पैसे ग्रामपंचायतीला प्राप्त देखील झाले आहेत. याची आम्ही सखोल चौकशी करीत आहोत.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.245..

श्री.दीपक केसरकर...

सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मला माझे उत्तर पूर्ण करू द्यावे. आम्ही सखोल चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. यामध्ये कोणीही दोषी आढळला तरी त्याला शिक्षा देऊ असे स्पष्ट आश्वासन आम्ही दिलेले आहे. चौकशी करण्यासाठी देखील प्रोसिजर आहे. नोटीस दिल्याशिवाय कोणावरही कारवाई करता येत नाही. मूळ प्रश्नासंबंधी चौकशी नसताना देखील आम्ही अतिरिक्त चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. मूळ प्रश्न हा निधी वितरणाच्या संबंधातील होता. तो भ्रष्टाचारासंबंधातील नव्हता. भ्रष्टाचार असे लिहिले गेले आणि त्याला चुकीचे उत्तर दिले गेले म्हणून मी आपल्याकडे उत्तरामध्ये दुरूस्ती सुचविण्यासंबंधी विनंती केली होती. ती आपण मान्य केली आहे. या प्रकरणामध्ये आम्ही काय करावे अशी आपली अपेक्षा असेल तर ती बाब आपण मांडावी. आम्ही त्याचा अवश्य विचार करू.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या सभागृहामध्ये प्रश्नोत्तरच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य एखाद्या प्रकरणाबद्दल प्रश्न उपस्थित करतात त्यावेळी त्याचे अचूक उत्तर मिळावे अशी अपेक्षा असते. छापील उत्तर वितरित करण्यात येते तेव्हाच आपल्याला त्यात बदल करता येतो. छापील उत्तरामध्ये "अपहार" शब्द आहे व या लेखी प्रश्नाला "हे खरे आहे" असे देखील उत्तर दिलेले आहे. या प्रश्नातील मूळ स्पीरीट बदलून वेगळ्या पद्धतीने उत्तर येणार असेल तर त्या प्रश्नाचा आणि या उत्तराचा काहीच संबंध राहत नाही. .... (अडथळा)...

**सभापती** : सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी आपला उप प्रश्न अचूक विचारावा. तो डेव्हलप करायला घेतला की, घोटाळा होतो. तेव्हा आपण अचूक प्रश्न विचारावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मूळ प्रश्नाचा गाभा हा अपहार नसून अनियमितता आहे असे मंत्री महोदय म्हणत आहेत. मी मघाशीच सांगितले होते की, त्याचा अर्थ एकच ध्वनित होत आहे. त्यामुळे या प्रश्नासंबंधातील अधिकची माहिती घेण्यासाठी राखून ठेवावा व त्यासंबंधातील सुधारित उत्तर माननीय मंत्र्यांनी द्यावे.

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.245....

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, या प्रश्नाचे सविस्तर उत्तर मी दिलेले आहे. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, जे अधिकारी हे उत्तर तयार करतात त्यांना मी आज सकाळी ब्रीफिंगसाठी बोलाविले होते. त्यांना मी स्पष्ट स्वरूपात सूचना दिल्या आहेत की, अशा प्रकारची चुकीची उत्तरे दिलीत तर.......मी हे स्वत: पॉईंट आऊट केले आहे......

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सभागृहात शांतता राखावी. मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण सकाळी ब्रीफिंग घेत असताना चुकीची माहिती असेल तर मला आपल्यावर ॲक्शन घ्यावी लागेल असे ध्वनित केले आहे. छापील उत्तरामध्ये आपण "अपहार" असा शब्द लिहिल्यामुळे त्यावर पुष्कळ चर्चा झाली. त्यामध्ये आपण नंतर दुरूस्ती देखील केली. ज्या अधिकाऱ्याने प्रत्यक्षात अपहार झालेला नसताना देखील अपहार झाला आहे असे चुकीचे उत्तर दिले आहे त्याला योग्य ती शिक्षा कशी होईल हे आपण बघावे. आता मी पुढच्या प्रश्नाकडे जात आहे.

................

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**यवतमाळ जिल्ह्यातील पुसद वन विभागांतर्गत होणारी अवैध वृक्षतोड**

**(३) * २३४७ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पुसद वन विभागांतर्गत मागील दोन-तीन वर्षात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड झाली परंतु बहुतांश वन गुन्हे बेवारस दाखविण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुसद वन विभागाच्या कारभारावर संशय व्यक्त होत असल्याने उक्त प्रश्नाबाबत सखोल चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी असणा-या अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कारवाई होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

सन २०१२-१३ ते ऑक्टोबर २०१४ अखेर पर्यंत वृक्षतोडीचे १९३९ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. त्यापैकी ८६ टक्के गुन्हे बेवारस आहेत. अवैध वृक्षतोड सर्वसाधारणपणे रात्र-बेरात्री होत असल्याने अवैध वृक्ष तोडीच्या प्रकरणात आरोपी सापडण्याची शक्यता कमी असते, त्यामुळे बेवारस गुन्हा नोंदवला जातो. तथापि अशा प्रकरणांचा छडा लावून माल जप्त करणे, आरोपींविरुध्द गुन्हा नोंदवणे अशी कारवाई केली जाते. सदर कालावधीत ४७९ आरोपींविरुध्द गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

(२) व (३) पुसद वन विभागाच्या कारभारावर संशय नसल्याने सखोल चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि ज्या प्रकरणात कर्मचा-यांचा हलगर्जीपणा निदर्शनास आला अशा प्रकरणातील ५५ दोषी कर्मचा-यांकडून रु. ३४,४०७ रकमेचे वसूली आदेश काढण्यात आले आहेत. तसेच ३ वनरक्षकांना निलंबित करण्यात आले असून एका वनापालाविरुध्द विभागीय चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, पुसद वन क्षेत्रामध्ये जवळ जवळ 1039 गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यापैकी 86 टक्के गुन्हे बेवारस आहेत, असे लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे. आज पुसद वन क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्ष तोड होत असल्यामुळे जंगले सुद्धा भकास व्हायला लागली आहेत. वन विभागाकडे आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग देखील कमी आहे. वृक्ष तोड करण्यासाठी जे येतात त्यांच्याकडे जी साधने, शस्त्रे असतात त्याच्या तुलनेमध्ये वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडे शस्त्रे, साधने नसतात.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:2347 ...........

श्री. माणिकराव ठाकरे .....

जंगलाचे संरक्षण करण्यासाठी जास्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे किंवा किती कि.मी. मध्ये किती कर्मचारी असावेत, कोणत्या कर्मचाऱ्यांकडे कोणती शस्त्र असावीत यासंदर्भात विभागाचे काही निकष आहेत काय ? अशा प्रकारचे निकष असतील तर शासन आवश्यक त्या ठिकाणी कर्मचारी वर्ग,साधने तसेच शस्त्रास्त्रे उपलब्ध करुन देणार आहे काय ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, राज्याच्या हिताच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी उपस्थित केलेला आहे. आपल्याकडे जी हिरवी वन संपदा आहे तिचे संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी आहे परंतु ही हिरवी वन संपदा उघडयावर आहे. 1000 हेक्टर जंगलाचे संरक्षण करण्याची जबाबदारी फक्त एका गार्डवर देण्यात आलेली आहे. वन विभागामध्ये ज्या चोऱ्या झालेल्या आहेत त्यांच्या वसुलीचे प्रमाण अतिशय चांगले असल्यामुळे मी वन विभागाच्या कर्मचाऱ्याचे अभिनंदन करतो, कौतुक करतो. सन 2011 मध्ये अवैध वृक्षतोड झाल्या प्रकरणी 15.60 लक्ष रुपयाचे नुकसान झाले होते त्यापैकी वन विभागाने 14.42 लक्ष रुपये वसूल केले असून जवळ जवळ 92 टक्के वसुली केलेली आहे. राज्यातील इतर विभागामध्ये चोरी पकडण्याचा जो दर आहे त्याच्यापेक्षा हा दर किती तरी जास्त आहे. सन 2012 मध्ये अवैध वृक्षतोड झाल्या प्रकरणी 21.08 लक्ष रुपयाची चोरी झाली होती त्यापैकी वन विभागाने 17.08 लक्ष रुपये वसूल केले असून जवळ जवळ 81 टक्के वसुली केलेली आहे. सन 2013 मध्ये अवैध वृक्षतोड झाल्या प्रकरणी 22.13 लक्ष रुपयाची चोरी झाली होती त्यापैकी 79 टक्के रक्कम वन विभागाने वसूल केली आहे. सन 2014 मध्ये अवैध वृक्षतोड झाल्या प्रकरणी 17.17 लक्ष रुपयाची चोरी झाली होती त्यापैकी 16.19 लक्ष रुपयांची वसूली केली असून वसुलीचे प्रमाण 94 टक्के आहे.

सभापती महोदय, प्रश्नामध्ये विचारण्यात आले आहे की, बहुतांश गुन्हे बेवारस दाखविण्यात आले होते काय ? सभापती महोदय, चोरी कोणी केली हे माहिती नसल्यामुळे गुन्हे बेवारस दर्ज केले जात असतात. वृक्षतोडीच्या चोरीमध्ये जे कर्मचारी दोषी आढळून आले आहेत त्यांची गय सुध्दा करण्यात आली नाही. वन विभागातील 3 कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश काढण्यात आले असून



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:2347 ...........

श्री.सुधीर मुनगंटीवार .......

55 कर्मचाऱ्यांना दोषी धरण्यात आले आहे. यामध्ये सगळयात मोठा प्रश्न जंगलाच्या बाजूला जी गावे असतात त्यांच्याकडून येत असतो. गावातील गरीब कुटुंब सरपणासाठी लाकडे आणत असतात. परंतु आपल्या व्याख्येप्रमाणे जंगलातून सरपणाची लाकडे आणणे ही सुध्दा चोरीच आहे. एखाद्या शेतकऱ्याने शेतीच्या उपयोगासाठी जंगलातून लाकूड आणले तरी त्याला चोरीच संबोधले जाते. जंगलामध्ये ज्या ज्या चोऱ्या होतात त्या पकडल्या जात असतात. त्यामुळे जंगलाच्या संरक्षणासाठी 3 एसआरपी प्लॅटून असून यामध्ये आपल्याला अजून वाढ करावयाची आहे. वृक्षसंवर्धनामध्ये गावकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. जंगलाच्या जवळ एकंदर 15500 गावे असून या ठिकाणच्या गावकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी 12466 गावात संयुक्त वन व्यवस्थापन असून हे जंगल तुमचे आहे, तुमच्या मालकीचे आहे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण करण्यासाठी वन विभाग प्रयत्न करीत असून यामध्ये जंगलात चराई बंदी, कुऱ्हाड बंदी, आग नियंत्रण अणि अतिक्रमण नियंत्रण बाबींचा समावेश केलेला आहे. आपल्या वनातील काही भागात आजही झाडांची चोरी होत आहे हे शासनाला मान्य आहे. वनाची चोरी थांबविण्यासाठी वन कर्मचाऱ्यांना शस्त्र पुरवठा करण्याचा निर्णय घेत असून त्यांना वाहने देणार आहोत. इंडियन फॉरेस्ट ॲक्ट कलम 61 (अ) नुसार ज्या गाडया पकडल्या जातात त्या गाडया सरकार दरबारी जमा करण्याची तरतूद आहे. अवैध वृक्ष तोडीमध्ये आपण आतापर्यंत 13 गाडया जप्त केल्या असून यामध्ये एक तवेरा गाडी असून 5 टोयाटो, 1 टाटा सुमो, 1 ट्रॅक्टर-ट्रॉली, 1 बोलेरो पीकअप, 2 मेटॅडोर अशी वाहने आहेत. शासन आता असा निर्णय घेणार आहे की, लाकूड चोरणाऱ्या वाहनामध्ये असलेल्या लाकडाची किंमत 3 लक्षापेक्षा जास्त असेल तर अशा प्रसंगी ती गाडी ताबडतोब सरकारजमा करायची. चोरी करणाऱ्यांना धाक बसला पाहिजे यासाठी शासन अशा प्रकारचा निर्णय करणार आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या प्रश्नाला न्याय देण्यासाठी अतिशय चांगले विश्लेषण केलेले आहे. परंतु मूळ प्रश्नाच्या गाभ्यापासून आपण दूर जातो आहे असा माझा समज आहे. पहिल्या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आले असून त्यानंतर या प्रश्नाचे विश्लेषण केलेले आहे. आम्ही सत्ताधारी पक्षात होतो तेव्हा आमचा

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:2347 ...........

श्री. भाई जगताप ......

आक्षेप हाच होता. मंत्री महोदयांनी आता जे काही सांगितले ते खरे आहे हे आम्हालाही माहिती आहे. आज आपल्या जंगलाच्या संरक्षणासाठी जी मॅन पॉवर आहे त्याचा विचार केला तर जंगलाचे संरक्षण करणे अशक्य आहे हे आम्ही समजू शकतो. परंतु जंगलातील कर्मचाऱ्यांचा आणि लाकूड चोरणाऱ्यांचा संबंध नाही असे आपण सांगू शकत नाही. सरपणाला कोणी लाकूड नेले तर त्याला चोरी संबोधले जाते असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु सरपणाच्या लाकडाची नोंदच होत नसते हे सगळयांना माहिती आहे. खरे म्हणजे सरपणाच्या लाकडाची केस होऊ शकत नाही. बेवारस प्रकरणाच्या संदर्भात या ठिकाणी मंत्री महोदयांनी खुलासा केलेला आहे. परंतु 55 कर्मचाऱ्यांडून केवळ 34 हजार रुपयांची रिकव्हरी केलेली आहे. जंगलातील एखाद्या सागवान लाकडाची किंवा चंदनाच्या लाकडाची चोरी झाली तर त्या लाकडाची किंमत लाखो रुपये असू शकते. वन विभागातील कर्मचारी भयानक परिस्थितीत काम करीत असतात त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांनी चांगली कामे केली असेल तर आपल्याला त्यांची पाठ थोपटायलाच पाहिजे परंतु कर्मचाऱ्यांनी चुकीची कामे केली असेल आणि अशा वेळी त्यांना आपण पाठीशी घालत असू तर ते बरोबर नाही. 55 कर्मचाऱ्यांकडून केवळ 34,407 रुपये वसूल करण्यात आलेले आहे हे कोणालाही पटण्यासारखे नाही. मंत्री महोदयांना हे पटण्यासारखे असेल तर मी लगेच खाली बसतो. आपण उत्तरामध्ये म्हटले आहे की, 86 टक्के गुन्हे हे बेवारस आहेत. त्यामुळे केवळ कर्मचाऱ्यांची पाठच थोपटणार आहोत की, गुन्हे जास्तीत जास्त कसे डिटेक्ट होतील यासाठी प्रयत्न करणार आहोत ? या ठिकाणी 55 कर्मचाऱ्यांकडून तुटपुंजी रक्कम रिकव्हर केली आहे त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर निंलबनाची किंवा तत्सम कारवाई सरकार करणार आहे काय ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरात काहीही चूक नाही. हे मी सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. गुन्हे बेवारस दाखविण्यात आले आहेत काय असा प्रश्न विचारल्यामुळे त्याला "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. गुन्हे मुद्दाम दाखविण्यात आले नाही असे नाही, तर गुन्हयामध्ये आरोपीचे नाव आपल्याला निश्चितपणे माहीत नसते व ज्यावेळी आपण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हयाची नोंद करतो त्यावेळेस आपण "अज्ञात इसम"म्हणून "बेवारस नोंद" करीत असतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2347....

श्री.सुधीर मुनगंटीवार....

सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपण वन कर्मचाऱ्यांची पाठ थोपटली ते आपणास पटते काय ? ज्या रकमेची चोरी झाली त्यापैकी किती रक्कम वसूल केली, वसुलीची टक्केवारी किती आहे असा ही त्यांनी प्रश्न विचारला. त्याबाबत सांगू इच्छितो की, सप्टेंबर 2014 पर्यंत 17 लाख 17 हजार इतक्या रकमेच्या लाकडाची चोरी झाली, त्यापैकी 16 लाख 19 हजार इतक्या रकमेची वसुली केलेली आहे, म्हणजे 94 टक्के वसुली झालेली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. माझे दोन प्रश्न आहेत. लाकडाची चोरी होते त्याची वाहतूक अवैध पद्धतीने होत असते किंवा खुलेआम होत असते. आपणास बऱ्याचवेळा रस्त्याने प्रवास करताना ट्रकमधून अवैध वाहतूक सुरु असल्याचे दिसून येते. मी या ठिकाणी कोणाचे नाव घेऊ इच्छित नाही, परंतु काही पेपर मिल्सकरिता देखील अवैधरित्या लाकडाचा पुरवठा होत असतो आणि अवैधरित्या वाहतुकीतून ही चोरी होऊन त्याची विल्हेवाट लावली जाते. अशाप्रकारे अवैधरित्या होणारी लाकडाची वाहतूक रोखण्याकरिता वन विभागाने अन्य विभागांशी संपर्क साधून काही प्रयत्न केले आहेत का ? माझा दुसरा प्रश्न आहे की, श्री.सुरेश प्रभू हे केंद्र सरकारमध्ये वने आणि पर्यावरण मंत्री असताना त्यांनी जॉईन्ट फॉरेस्ट प्रोग्राममध्ये महिलांना शस्त्र देऊन त्यांना वन संरक्षक म्हणून नेमावे असा एक निर्णय घेतला होता. त्या संदर्भात निर्णय घेऊन वन संरक्षणाकरिता महिलांना सहभागी करुन घेणार आहात काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, भारतीय वन कायद्यामध्ये तरतूद केली आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे वनाचे संरक्षण करण्याकरिता आम्ही काही कडक पावले उचलणार आहोत. त्यामध्ये तीन लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या लाकडाची चोरी पकडल्यास त्यामध्ये पकडलेला ट्रक असेल वा इतर वाहन असेल त्याबाबतीत कोर्टामध्ये न जाता ते वाहन ताबडतोब जप्त करुन त्याची विल्हेवाट लावण्यात येईल. आवश्यकता वाटल्यास तीन लाख रक्कम देखील कमी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी महिलांच्या सहभागा विषयी प्रश्न विचारला. त्याबाबत सांगू इच्छितो की, जंगल टिकले तर आपणास शुद्ध हवा घेता येईल, आपले आचार- विचार शुद्ध

..2.

AJIT/ ST/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 11:50

ता.प्र.क्र.2347....

श्री.सुधीर मुनगंटीवार....

राहतील. तेव्हा जंगल टिकविण्याची जबाबदारी वन कर्मचाऱ्यापासून आपल्या सर्वांची आहे. तेव्हा या कामासाठी महिलांचा नव्हे तर समाजातील सर्व घटकांचा समावेश करण्यात येईल. जे एनजीओ पुढे येतील, लोकप्रतिनिधी पुढे येतील त्या सर्वांना सहभागी करुन घेण्यात येईल. माझे तर असे म्हणणे आहे की, एखाद्या लोकप्रतिनिधीनी आपल्या विभागात झाडे लावण्यासाठी आमदार निधीतून 2 कोटी रुपये मागितले तर तेही देण्याची आमची तयारी आहे. आम्ही आपल्या प्रतिसादाची वाट पाहत आहोत.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. आज आपण पाहत आहोत की, महाराष्ट्रातील जंगल कमी होत चालले आहे. हे जंगल वाचविण्यासाठी आपण अनेक उपयोजना करणार असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. ज्या उपयोजना सुचविल्या आहेत त्या टाईम बाऊन्डमध्ये करणार आहात काय ? जे झाड कापण्याच्या लायकीचे आहे त्यासाठी 20-25 वर्षे लागतात. मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही इतक्या रकमेच्या लाकडीची चोरी पकडली त्यापैकी अमुक इतकी रक्कम वसूल केली. माझा प्रश्न आहे की, चोरी करण्यात आलेले लाकूड कोणत्या पद्धतीचे होते ? कारण ज्या स्पेसिफीक जातीची लाकडे तोडण्यात येतात त्या जातीची लाकडे ज्या भागांत आहेत त्या ठिकाणी आपणास लक्ष ठेवता येईल. माझा प्रश्न आहे की, लाकूड कोणत्या जातीचे होते आणि किती घनमीटरचे होते ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, पकडण्यात आलेल्या लाकडांची माहिती पुढीलप्रमाणे आहे. सन 2011 मध्ये 155 घनमीटर, 2012 मध्ये 174 घनमीटर, 2013 मध्ये 199 घनमीटर आणि सन 2014 मध्ये 102 घनमीटरची झाडे होती. यामध्ये चोरीचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हणजे स्वत:च्या फायद्यासाठी चोरी करणे आणि शेतीच्या उद्योगासाठी झाडे तोडणे असा दुसरा प्रकार आहे. शेतीच्या उद्योगासाठी 60 सें.मी.ची गोलाई असणारी झाडे तोडण्यात येतात. सिरोंचा आणि भामरागड भागात संघटित गुन्हेगारी किंवा षडयंत्र करुन चोरी करण्यात येते. या भागामध्ये सागवानाची 60 से.मी. गोलाई असणारी झाडे तोडण्यात येतात. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे, 94 टक्के, 89 टक्के, 84 टक्के व 92 टक्के अशी रक्कम वसूल केलेली आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2347....

श्री.सुधीर मुनगंटीवार....

लाकडांची चोरी होऊ नये म्हणून आपण एसआरपीची मदत घेत आहोत. गाड्या जप्त करण्याचा निर्णय घेत आहोत. ज्या भागात वन कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे, ती वाढविण्याचा देखील आम्ही विचार करीत आहोत. यापूर्वी वन विभागाचे प्रस्ताव वित्त विभागाकडून सहजा सहजी मान्य केले जात नव्हते. परंतु आपण या अधिवेशनातील पुरवणी मागणी पाहिली तर

त्यामध्ये वन विभागाला झुकते माप दिलेले आहे आणि भविष्यातही झुकते माप देणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी टाईम बाऊन्डसंबंधी विचारले त्याबाबत सांगू इच्छितो की, आम्ही आगामी अधिवेशनात पुढील पाच वर्षाचा टाईम बाऊन्ड कार्यक्रम देणार आहोत. त्यामध्ये लोकसहभाग, एनजीओंचा सहभाग आणि लोकप्रतिनिधींचा सहभाग घेण्यात येईल. आज आपले जंगल 33 टक्क्यांऐवजी 19 टक्के आहे. देशात आपल्या राज्याचा तिसरा क्रमांक लागतो. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये दोन-तीन-चार टक्के जंगल आहे. अशा जिल्ह्यांमध्ये जंगल वाढविणे आवश्यक आहे सन 1974मध्ये केंद्र सरकारने वनेतर भागामध्ये जंगल वाढविण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग सुरु केला होता. त्या विभागाकडून वने वाढण्याची अपेक्षा होती, परंतु सामाजिक वनीकरण विभाग हा वन विभागाच्या अखत्यारीत नव्हता. आता आम्ही सामाजिक वनीकरण विभाग हा वने विभागाचा भाग असेल असा मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतला आहे. आता वन जमिनीवर आणि वनेतर जमिनीवर आपल्या सर्वांच्या सहकार्याने जंगल वाढावे ही आमची अपेक्षा आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद उपविभागांतर्गत येणा'या वन जमिनीवर झालेले अतिक्रमण**

**(४) * १६८५ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५०२८७ ला दिनांक ६ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद वन विभागांतर्गत औरंगाबाद व जालना या दोन जिल्ह्यामध्ये माहे मार्च, २०१४ अखेर १३२ हेक्टर ५३ आर वनक्षेत्रावरील अतिक्रमण केव्हा पासून करण्यात आले आहे,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१४ अखेर १०७ हेक्टर ३३ आर वनक्षेत्रावर असलेल्या अतिक्रमणाचे स्वरुप काय आह,

(३) असल्यास, माहे एप्रिल, २०१४ अखेर असलेल्या १०७ हेक्टर ३३ आर वनक्षेत्रातील अतिक्रमण निष्कासन करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, अतिक्रमण दूर करण्यासाठी किती जणांवर न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) औरंगाबाद वन विभागांतर्गत औरंगाबाद व जालना या दोन जिल्ह्यामध्ये माहे मार्च, २०१४ अखेर असणारे १३२ हेक्टर ५३ आर वनक्षेत्रावरील अतिक्रमण हे सन २००२-०३ पासूनचे आहे.

(२) माहे एप्रिल, २०१४ अखेर वनक्षेत्रावर असलेले १०७ हेक्टर ३३ आर अतिक्रमण पीक वहिती / शेतीसाठीचे आहे.

(३) माहे एप्रिल, २०१४ अखेर असलेल्या १०७ हेक्टर ३३ आर वन क्षेत्रातील अतिक्रमणापैकी ६९.१८ हेक्टर क्षेत्रावरील अतिक्रमण हटविण्यात आलेले आहे. तसेच ११.५० हेक्टर क्षेत्रापैकी अनुक्रमे १०.०० हेक्टर व ०१.५० हेक्टर अतिक्रमित क्षेत्राची दोन प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. उर्वरीत २६.६५ हेक्टर क्षेत्रावरील अतिक्रमणाबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अन्वये हटविण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) ११.५० हेक्टर क्षेत्रावरील दोन अतिक्रमणासंदर्भात मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. त्यात अतिक्रमकांची संख्या ४७ इतकी आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन 2003 चे हे प्रकरण आहे. 132 हेक्टर 53 आर क्षेत्रावर अतिक्रमण झालेले आहे तर 11 हेक्टर हेक्टर प्रकरणी न्यायालयात खटले दाखल केलेले आहेत. या प्रकरणाकडे एक तप दुर्लक्ष होण्यामागची कारणे काय आहेत, ज्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले त्यांच्यावर कारवाई करण्यात आली काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1685...

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, वन हक्क कायदा 2006 नुसार वन जमिनीवर ज्यांचे अतिक्रमण असेल त्यांना दावे दाखल करता येतात. जर ते आदिवासी बांधव असतील तर त्यांना एका विशिष्ट कालमर्यादेमध्ये वनपट्टे दिले पाहिजेत असा नियम आहे. जर ते आदिवासी बांधव नसतील तर त्यांना तीन पिढ्यांचा दाखला म्हणजे जवळपास 75 वर्षाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. दावे दाखल करण्याची मुदत संपल्यावर किंवा त्या संदर्भातील दावे आले नाही तर ते अतिक्रमण आहे असे आपण गृहीत धरून ते काढण्याची कार्यवाही सुरु करतो. या प्रकरणीसुध्दा वन विभागाने कार्यवाही केलेली आहे. एप्रिल 2014 पर्यंत वनक्षेत्रावर 107 हेक्टर 33 आर अतिक्रमण होते, त्यापैकी 69.18 हेक्टर अतिक्रमण हटविण्यात आलेले आहे. अन्य अतिक्रमण हटविण्यासाठी तीन महिन्यांची मुदत दिलेली आहे. या तीन महिन्यांत निश्चितपणे अतिक्रमण हटविण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, 132 हेक्टर 53 आर क्षेत्रावर अतिक्रमण झालेले आहे त्यापैकी 69.18 हेक्टर क्षेत्रावरील अतिक्रमण हटविण्यात आल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1685....

श्री.विक्रम काळे....

69 हेक्टर 18 आर इतक्या जमिनीवरील अतिक्रमण हटविलेली जागा वन विभागाच्या ताब्यात आली आहे काय, त्या जागेला तारेचे कुंपण घातले आहे काय ? शासनाने 132 हेक्टर 53 आर वनक्षेत्रापैकी 69 हेक्टर 18 आर वनक्षेत्रावरील अतिक्रमण हटविले आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, उर्वरित क्षेत्रावरील अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही किती दिवसांत पूर्ण करण्यात येईल ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही तीन महिन्यांत पूर्ण करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न वन विभागाच्या जागेला तारेचे कुंपण घालण्याबाबत विचारलेला आहे. मी सांगू इच्छितो की, वन क्षेत्र हे मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे प्रत्येक वन क्षेत्राला तारेचे कुंपण घालणे शक्य नाही. तसेच अतिक्रमित जागा शासनाच्याच नावे आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अतिक्रमण हटविणे हे वन विभागाचे काम निश्चितच आहे. परंतु अनेक क्षेत्रात आणि आपल्या विभागात काही एन.जी.ओ. जबरदस्तीने लोकांना वन जमिनीवर अतिक्रमण करण्यास प्रोत्साहित करीत आहेत. वन हक्क कायदा-2006 नंतर अशा प्रकारचे अतिक्रमण करता येत नाही. गरज पडल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करू. परंतु माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांना अशा प्रकारचे अतिक्रमण होत असल्याचे दिसल्यास त्यांनी त्या बाबतची माहिती वन विभागाला दिली तर, ते अतिक्रमण वन विभागाच्या माध्यमातून वेळीच हटविण्यात येईल. एकूण भूभागाच्या 19.94 टक्के भूभाग हा वन क्षेत्राने व्यापलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, ता.प्र.क्र.1183. परंतु या ठिकाणी विभागाचे माननीय मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती** : मी आपल्याला ता.प्र.क्र.1685 वर उप प्रश्न विचाण्यास संधी दिली होती. परंतु आपण त्याचा गैरफायदा घेतला आहे.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून एक अतिशय महत्त्वाचा आणि गंभीर मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. हा विषय राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सागू इच्छितो की, औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी मी वेगळा वेळ देणार आहे. त्यावेळी आपण हा मुद्दा मांडावा.

श्री.भाई जगताप : ठीक आहे.

------------

**नियम 93 च्या सूचनांची निवेदने तसेच अर्धा तास चर्चा वेळेवर होत नसल्याबाबत पॉईंट ऑफ प्रोसीजर**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी हा मुद्दा काल सुध्दा माननीय उप सभापतींच्या निदर्शनास आणून दिला होता. आज 19 तारीख आहे. हे अधिवेशन दिनांक 8 डिसेंबर पासून सुरु झालेले आहे. आम्ही 8 डिसेंबरपासून विहित मुदतीत व नियमानुसार नियम 93 अन्वये सूचना देत आहोत. परंतु मी सादर केलेल्या सूचनांपैकी केवळ एका सूचनेवर शासनाच्या माध्यमातून निवेदन करण्यात आलेले आहे. वास्तविक पाहता म.वि.प. नियमावलीनुसार नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने सहा दिवसांच्या आत होणे गरजेचे आहे. परंतु संबंधित विभागांकडून जाणीवपूर्वकरित्या वेळेवर निवेदन केली जात नाहीत. या बाबतीत त्यांच्या काही अडचणी असू शकतील किंवा तो विषय चर्चेला येऊ नये असे सुध्दा असू शकते. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सर्व निवेदने आल्यास त्यावर चर्चा करता येणार नाही. त्यामुळे संबंधित विभागांना ताकीद देऊन, प्रलंबित निवेदने तातडीने करण्याची आवश्यकता आहे, हे मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार सभागृहात आहेत. नियम 93 अन्वये विरोधी पक्षाचे आमदार सूचना देत असतात. अशा सूचना दाखल झाल्यानंतर त्यावरील निवेदने तातडीने पाच दिवसात संबंधित विभागाकडून विधिमंडळाला प्राप्त झाली पाहिजेत आणि त्यानंतर ते निवेदन सभागृहात केले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या माध्यमातून मांडलेला मुद्दा योग्य आहे. शासनाकडून पाच दिवसांत प्रत्येक सूचनेचे निवेदन आले पाहिजे आणि विधिमंडळाच्या माध्यमातून ते सभागृहात झाले पाहिजे. या दृष्टीने

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

मंत्री महोदयांनी संबंधित विभागांना सूचना द्याव्यात की, नियम-93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनांवरील निवेदने 5 दिवसांत सादर करणे गरजेचे आहे. आज नियम-93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने केवळ तीन निवेदने प्राप्त झालेली आहेत. निवेदने वेळेवर होण्यासाठी आम्ही आमच्याकडून सुध्दा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांना सांगतो की, आपण संबंधित विभागांना या बाबतीत सूचना द्याव्यात.

श्री.सुधीर मुनगंटीवार : होय.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, दुसरी बाब अशी की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मराठी भाषेच्या नियम पुस्तिकेमध्ये नियम-93 अंतर्गत (1) आणि (2) असे उप नियम नमूद केलेले आहेत. परंतु इंग्रजी भाषेच्या पुस्तिकेमध्ये उप नियमांचा अंतर्भाव केलेला नाही.

स**भापती** : ठीक आहे. आपण निदर्शनास आणून दिलेली बाब मी तपासून घेतो.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, हे अधिवेशन सुरु झाल्यापासून आजपर्यंत एकाही अर्धा-तास चर्चेवर चर्चा झालेली नाही. अनेकदा विशेष बैठकीमध्ये 10-15 अर्धा-तास चर्चा कामकाजपत्रिकेवर दर्शवून त्या संपविल्या जातात. परंतु असे केल्यामुळे त्या विषयाला न्याय मिळत नाही किंबहुना ज्या हेतूने ती चर्चा उपस्थित केलेली असते त्या हेतूला बगल दिली जाते.

**सभापती** : या अनुषंगाने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, कोणतीही अर्धा-तास चर्चा किंवा लक्षवेधी सूचना मी लॅप्स केलेली नाही. मी ज्यावेळी आमदार होतो त्यावेळी एखादी लक्षवेधी सूचना किंवा कधीही न येणारे इन्स्ट्रुमेंट लॅप्स झाल्यानंतर किती दु:ख होते याचे चटके मी व्यक्तिगत सोसलेले आहेत. मध्यंतरी मी अशी प्रथा सुरु केली होती की, एखाद्या-दुसऱ्या दिवशी विशेष बैठक घेऊन त्यामध्ये 10-15 लक्षवेधी सूचना किंवा अर्धा-तास चर्चा संपवायच्या. या बाबतचा अनुभव आपणास अनेक वेळा आला असेल. या अधिवेशनातील लक्षवेधी सूचना आणि अर्धा-तास चर्चा आपण पूर्ण करणार आहोत. वास्तविक पाहता यापूर्वीच ती प्रथा सुरु करावयास हवी होती. परंतु आपल्या सभागृहात राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे अभ्यास वर्ग भरत असल्यामुळे सकाळी सभागृहाची विशेष बैठक घेणे शक्य नव्हते. आता ते अभ्यास वर्ग संपलेले असल्यामुळे, परवापासून विशेष बैठक घेण्यात येईल.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितले की, विधान परिषदेच्या मराठी भाषेतील नियम पुस्तिकेत (1) व (2) उप नियम नमूद करण्यात आलेले आहेत, परंतु इंग्रजी भाषेतील पुस्तकामध्ये ते उप नियम नमूद करण्यात आलेले नाहीत. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, या सभागृहात येणाऱ्या प्रत्येक सन्माननीय सदस्यांना मराठी अनिवार्य असल्यामुळे ते व्यवस्थित समजावे म्हणून मराठी भाषेच्या पुस्तिकेमध्ये उप नियम व्यवस्थित नमूद करण्यात आलेले आहेत. इंग्रजी भाषेचे पुस्तक हे कदाचित बाहेरच्या अभ्यासकांसाठी असेल. त्यामुळे कदाचित इंग्रजी भाषेतील पुस्तकात सविस्तररित्या उप नियम नमूद केलेले नसावेत. परंतु जाहिरनाम्यातील ही प्रिंटींग मिस्टेक नसावी असा माझा अंदाज आहे.

--------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्रीमती विद्या ठाकूर (महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत" या विषयावरील श्री.सतिश चव्हाण व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 49066 ला दिनांक 14 जून, 2014 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा अनुक्रमे पन्नासावा व एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार (वित्ती व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "लोकलेखा समितीच्या सन 2001-2002 या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्र.1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारशींनुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी सन 2013-2014 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद आणि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, मुंबई यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या कलम-6(1) नुसार सन 2014-15 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माझी एक विनंती आहे की, सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सादर करावयाचा माझा विषय क्रमांक 3 वर आहे. अतिरिक्त खर्चाच्या मागण्या विधानसभेत सादर केल्याशिवाय विधानपरिषदेत सादर करता येणार नाहीत. सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या विधानसभेत सादर केल्यानंतर या सभागृहात सादर करण्यात येतील.

**सभापती** : ठीक आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मॉयल लिमिटेड, नागपूर, यांचा सन 2013-2014 या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. विजय शिवतारे (जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन 2011-2012 या वर्षाचा अलग लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक वित्तीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी "नाशिक येथील गोदावरी तिरावर असलेली ऐतिहासिक काझी गढी कोसळण्याच्या स्थितीत असून संरक्षक भिंत बांधण्यासाठी शासनाच्या जलसंपदा विभागाकडून दिरंगाई व टाळाटाळ केली जात असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी "लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमध्ये बंद पडलेल्या वर्ग तुकड्यांचे समायोजन इतर शाळांमध्ये होणे, 262 प्राथमिक शाळांच्या वर्ग तुकड्यांवरील शिक्षकांना नियुक्त्या देण्यात येणे, या सर्व बाबींमुळे शिक्षकांचा काही दोष नसतानाही त्यांचे वेतन थांबविणे व त्या सर्व वर्ग तुकड्या नियमबाह्य पध्दतीने अनुदानावरून विनाअनुदानित करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नससल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दीपकराव साळुंखे यांनी "श्रीक्षेत्र पंढरपूर तीर्थक्षेत्र येथील चंद्रभागा नदीत धार्मिक विधीच्या नावाखाली रक्षा व निर्माल्य विसर्जन, मलमूत्र, विसर्जन, जनावर आणि वाहनांची सफाई यामुळे चंद्रभागा नदी प्रदूषित होत असल्यामुळे तिच्या शुध्दीकरणासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी "राज्यात 1100 आदिवासी आश्रमशाळा असून त्यात 544 शाळा राज्य सरकार व 556 शाळा खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जातात. परंतु, शासनाकडून प्रती माह 3500 रूपये मिळणे तर खाजगी संस्थेकडून प्रती माह 930 रूपये मिळत असल्याने सुविधा पुरविणे अडचणीचे होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती ....**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी "गेवराई (जि. बीड) तालुक्यात वीज वितरण व्यवस्थेत कंत्राटदार व अधिकारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची पिळवणूक होत असून कामे मंजूर करण्यासाठी शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी होणे, विद्युत खांब, तारा वगैरे कामे शेतकऱ्यांकडून करून घेत असल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी "दिनांक 1 जानेवारी, 1995 पूर्वीच्या झोपडपट्टीधारकांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे शासनाचे धोरण असूनही गेवराई (जि.बीड) शहरातील संजयनगर सह इतर भागातील झोपडपट्टीधारकांचे प्रमाणपत्र देण्यास नगर परिषदेकडून विलंब होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी "राज्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांवर वचक रहावा व प्रशासनासह शासनाच्या गैरकायदेशीर कामावर अंकुश ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्यात लोकायुक्त व उप लोकायुक्त पदांची निर्मिती करणे परंतु सदरची दोन्ही पदे रिक्त असल्यामुळे ती तत्काळ भरण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी "मराठा व मुस्लिम समाजाला आरक्षण धोरणानुसार शालेय प्रवेश मिळाला असला तरी हे आरक्षण धोरण अद्याप अंमलात न आल्यामुळे (ESBC) विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी माफी व शिष्यवृत्ती देण्याबाबतचा निर्णय शासनाने अद्याप घेतला नसल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी माफी व शिष्यवृत्ती मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती ....**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "सेवाज्येष्ठतेच्या प्रचलित नियमानुसार सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा विभागांतर्गत सन 1994 ते सन 1996 मध्ये लागलेल्या अभियंत्यांना सेवाज्येष्ठता देण्यात यावी व दिनांक 8 जुलै, 2009 च्या नियमावलीमध्ये तसे संशोधन करावे व नोव्हेंबर, 2014 मध्ये प्रसिद करण्यात आलेल्या ज्येष्ठता सूचीस स्थगिती देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "राज्यामध्ये क्रीडा विभागामार्फत खेळाडूच्या नोकरीसाठी राबविण्यात येणाऱ्या 5 टक्के आरक्षणांतर्गत प्रकरणे प्रलंबित असून नोकरीमध्ये अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडुंकडे प्रमाणपत्र असूनही त्यांना नोकरीत अपात्र ठरविल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी "पुणे शहरात वाहतुकीच्या दळणवळणाचा प्रश्न गंभीर असून शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी नदीच्या पात्रात रस्ता बनविण्याची कल्पना सन 1987 च्या विकास आराखड्यात केलेली असूनही अद्यापपर्यंत नदीपात्रातून रस्ता बनविण्याच्या कामात होत असलेल्या विलंबाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी "मुंबई भांडूप येथील चार वर्षीय शालेय मुलीवर तिथल्याच कर्मचाऱ्याने केलेला पाशवी बलात्कार, या प्रकरणी भांडूप पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करूनही कार्यवाही न होण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती ....**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये यांनी "सूर्या समुहाचे संचालक श्री. समीर जोशी, श्री. वासनकर, इन्स्पेक्टर, सात्विक ग्रूपचे श्री. अमोल ढाके या तिघांनी लाखो ठेवीदारांची कोट्यवधी रकमेची फसवणूक केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. उर्वरित सूचना मी दालनात नाकारल्या आहेत.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझ्याकडे नियम 93 च्या सूचनांवरील 3 निवेदने आली आहे. प्रत्येक निवेदनावर 1 प्रश्न विचारण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : जलसंपदा विभागातील सहायक अभियंता श्रेणी-2 या पदाकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेतून पात्र अभियंत्यांना 9 महिने होऊनही नियुक्ती न दिल्याबाबत श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. विजय शिवतारे (जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 24 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, 558 पात्र उमेदवारांचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. माझा प्रश्न असा आहे की, संवर्ग विभाजनानंतर बी ॲण्ड सीमध्ये किती उमेदवारांना पाठविले व जलसंपदा विभागामध्ये किती उमेदवारांना पाठविले ? बी ॲण्ड सी कडून सर्वांच्या ऑर्डर्स निघाल्या आहेत. फक्त जलसंपदा विभागाकडे ज्या उमेदवारांना देण्यात आले आहे, त्यांच्या ऑर्डर्स 9 महिन्यांपासून प्रतिक्षेत आहेत, त्या ऑर्डर्स केव्हा काढण्यात येणार आहेत, आपण त्या संदर्भात काय प्रयत्न करणार आहात ?

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, दिनांक 31 डिसेंबरपर्यंत ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. 558 उमेदवांराच्या नियुक्तीसाठी आवश्यक कागदपत्रे, अहवाल विभागास प्राप्त झाले आहेत. दिनांक 31 डिसेंबरच्या आत यांचे सर्व नियुक्ती आदेश विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : आंतरराष्ट्रीय बाजारात दुधाच्या पावडरचे दर कमी झाल्यामुळे दुधाच्या भावात घट होणे, त्या मानाने पशु खाद्य व वैरण आदिंचे भाव कमी न होणे, यामुळे सुमारे 30 लाख दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडणे याबाबत श्री. दीपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 25 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, दुधाचे दर अतिशय कमी झाले आहेत. पूर्वीच्या काळी उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी अशी म्हण होती. दुष्काळी पट्ट्यातील भरडलेल्या शेतकऱ्यांचा दुधाचा व्यवसाय प्रमुख आहे. दुधाचे दर 5-7 रूपयांनी कमी झाल्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. दुधाच्या पावडरची निर्यात होत होती, त्याला राज्य शासन 5 टक्के अनुदान देत होते.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपकराव साळुंखे......

सध्या दूध पावडरची निर्यात थांबविलेली आहे. या गोष्टींचा विचार करता शेतकऱ्याला दुधाचा दर परवडत नसल्यामुळे सरकार दर वाढवून देणार आहे का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दुधाच्या दरासंबंधी विधानसभेच्या अध्यक्ष महोदयांच्या दालनात सर्वपक्षीय नेते, दूध उत्पादक सहकारी संस्थांचे प्रतिनिधी आणि व्यापारी यांच्यासमवेत एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये असे ठरले की, दूध उत्पादक सहकारी संस्थाकडे येत असलेल्या 100 टक्के दुधाची विल्हेवाट शासन लावेल. पावडर किंवा अन्य मार्गाने त्याची विल्हेवाट लावेल. तसेच, त्यांना चांगला दर देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तथापि, खाजगी दूध उत्पादकांचे दूध घेणे सरकारला शक्य होणार नाही.

सभापती महोदय, मागील वर्षी दुधाच्या भुकटीच्या निर्यातीसाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून 5 रुपये अनुदान दिले जात होते. हे अनुदान 10 रुपयांपर्यंत वाढवून द्यावे, अशा प्रकारचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल.

सभापती महोदय, दूध उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे. दूध उत्पादक सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांना दुधाचे दर वाढवून दिले पाहिजेत, दूध उत्पादकांनाही अधिकचा दर मिळाला पाहिजे आणि ग्राहकांनाही स्वस्त दराने दूध उपलब्ध झाले पाहिजे. दूध उत्पादकांकडून 20 रुपये प्रति लिटर या दराने दूध घेतले जाते आणि ग्राहकांना मात्र ते 40 ते 55 रुपये प्रति लिटर या दराने विकले जाते. यामध्ये साधारणपणे 20 ते 35 रुपयांची तफावत आहे. नफा, दलाली किंवा वितरणाचा खर्च यामुळे ग्राहकालाही फायदा होत नाही आणि दूध उत्पादकालाही दर मिळत नाही. म्हणून असे आवाहन करण्यात आले की, गेल्या दोन महिन्यात डिझेलचे दर 10 रुपयांनी कमी झाले आहेत. पर्यायाने वाहतुकीचा आणि चिलिंगचा खर्च कमी झाला आहे. हे लक्षात घेऊन ग्राहकांना सध्या 40 ते 55 रुपये दराने मिळणाऱ्या दुधाचा दरही कमी झाला पाहिजे. त्याचप्रमाणे दूध उत्पादकांनाही लिटरमागे 2 ते 4 रुपये वाढवून मिळाले पाहिजेत. ग्राहकांना स्वस्त दराने दूध उपलब्ध झाले तर दुधाचा खपही वाढणार आहे. दूध उत्पादकांकडून कमी दराने दूध घ्यायचे आणि ग्राहकांना मात्र जास्त दराने विकायचे, यामुळे दुधाची विक्री वाढत नाही.

..2....

श्री.एकनाथराव खडसे.........

सभापती महोदय, दुधाची भुकटी तयार करण्याला काही मर्यादा आहेत. त्या मर्यादेपलीकडे आपण भुकटी तयार करु शकत नाही. आता आपण भुकटी तयार करणाऱ्या प्लँटचे पुनरूज्जीवन करणार आहोत आणि ते नव्याने सुरु करणार आहोत.

सभापती महोदय, दूध उत्पादकांना आणि ग्राहकांना न्याय मिळेल, असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. कोणत्याही दूध उत्पादक सहकारी संस्थांकडे येणारे दूध शासन स्वीकारणार आहे आणि त्याची पावडर करणे किंवा विकणे, अशी व्यवस्था राज्य शासनाकडून होणार आहे.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3.....

**पृ.शी./मु.शी.** : वीज निर्मिती केंद्रामुळे चंद्रपूर येथे निर्माण झालेल्या प्रदूषणाच्या समस्या याबाबत श्री.हेमंत टकले, आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 27 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, चंद्रपूर हे देशातील सर्वात अधिक प्रदूषण असलेल्या शहरांमधील एक शहर झाले आहे. कोळशापासून वीज निर्मिती केली जाते. कोळशाच्या दर्जानुसार त्या परिसरात होणाऱ्या पर्यावरणीय परिणामांचे किंवा हानीचे प्रमाण ठरते. शासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती लेखी निवेदनात दिलेली आहे. निवेदनात असे म्हटले आहे की, "पाण्याअभावी माहे एप्रिल, 2010 ते जुलै, 2010 मध्ये सहा संच बंद करण्यात आले होते. तथापि, त्या कालावधीत चंद्रपूर शहरातील ॲम्बीएंट एअर क्वॉलीटीच्या सरासरीमध्ये त्या आधीच्या वर्षाच्या ॲम्बीएंट एअर क्वॉलीटीच्या तुलनेत काहीही फरक पडलेला नव्हता. म्हणजेच केवळ विद्युत निर्मिती केंद्रामुळेच वातावरण प्रदूषित होत आहे, असा निष्कर्ष काढणे उचित ठरत नाही." ॲम्बीएंट एअर क्वॉलीटीत काहीही फरक पडत नाही, अशा निष्कर्शाप्रत शासन आले असेल तर मग वातावरण प्रदूषित होण्यास अन्य काही कारणे कारणीभूत असू शकतील. त्यासंदर्भात कोणती खबरदारी आपण घेतली आहे का आणि अन्य घटकांबाबतचा अभ्यास झाला आहे का ?

सभापती महोदय, वीज निर्मितीसाठी असलेला कोळसा आणि त्यामधून निर्माण होणारी राख यावर नियंत्रण ठेऊनही जर ॲम्बीएंट एअर क्वालीटीमध्ये काही सुधारणा होणार नसेल तर आणखी कोणते घटक यास कारणीभूत आहेत ?

सभापती महोदय, चंद्रपूर हे इको सेन्सिटिव्ह शहर आहे. त्या ठिकाणी तात्कालिक आजार आणि दीर्घ काळ परिणाम करणारे आजार, अशा प्रकारे माणसाच्या आरोग्यविषयक गंभीर समस्या उभ्या राहणार आहेत. तथापि, लेखी निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, "मागील तीन वर्षात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील प्रदूषणामुळे कोणत्याही प्रकारच्या आजारात वाढ किंवा घट झाल्याचा निष्कर्ष काढता येत नाही." मला असे वाटते की, शासनाने आणि या विभागाने प्रदूषण नियंत्रण मंडळाला बरोबर घेऊन अधिक तत्परतेने, वेगळ्या स्तरावर किंवा जागतिक स्तरावर उपलब्ध असलेले आधुनिक तंत्रज्ञान आणून चंद्रपूर प्रदूषणापासून मुक्त करणारा विचार करावा, अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे. तशा प्रकारचा विचार शासन करणार आहे का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केली आहे. ही गोष्ट खरी आहे की, काही उपाययोजना करून प्रदूषण थांबविण्याचा प्रयत्न शासन करीत आहे.

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रशेखर बावनकुळे..........

सभापती महोदय, विद्युत निर्मितीसाठी 34 टक्क्यांपेक्षा कमी राख निर्माण करणाऱ्या कोळशाची आवश्यकता असते. कारण, सर्वात जास्त प्रदूषण निर्माण करण्यामध्ये कोळशाचा भाग मोठा असतो. डब्ल्युसीएलकडून कमी प्रमाणात कोळसा उपलब्ध होतो आणि उपलब्ध होणारा कोळसा निकृष्ट प्रतीचा असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे. हे प्रदूषण थांबविण्याकरिता इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर हे सयंत्र बसविण्यात आले आहे. राखेसोबत निघणारे धुळीकण व इतर उत्सर्जित होणारे सल्फरडॉय ऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाण प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमून दिलेल्या मर्यादेत रहावे, याकरिता कायम स्वरुपी अमोनिया फ्ल्यु गॅस कंडीशनिंग सिस्टिम बसविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे डस्ट एक्सट्रॅक्शन ॲण्ड सप्रेशन, वॉटर स्प्रिंकलिंग सिस्टिमचा वापर करण्यात येत आहे. तथापि, या सर्व उपाययोजना करुनही प्रदूषण होत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केली आहे. काही दिवस संच बंद असताना रोज प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि वीज निर्मिती केंद्राकडून मॉनिटरिंग करण्यात येत असते. तेव्हाचे प्रमाण आणि संच सुरु असतानाचे प्रमाण सारखे असते. जेव्हा पॉवर जनरेशन सुरु असते तेव्हा प्रदूषण रोखणाऱ्या सिस्टिम्स सुरु असतात. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण होत असते. ज्यावेळी जनरेशन बंद असते त्यावेळी या सिस्टिम्स बंद असतात. तथापि, सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात जो अभ्यास केला आहे आणि ज्या सूचना केल्या आहेत, त्या देखील महत्त्वाच्या आहेत. जागतिक स्तरावर प्रदूषण रोखणाऱ्या सर्वात उत्कृष्ट संस्था, उपाययोजना किंवा यंत्रसामुग्रींचा आम्ही अभ्यास करु आणि त्या ठिकाणी होत असलेले प्रदूषण रोखण्याचा नक्की विचार करु. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा शासन विचार करणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

---------------

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, देशाच्या आणि राज्याच्या दूरगामी विकासाला चालना देणाऱ्या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला केंद्र आणि राज्य शासनाची मंजुरी असून हा प्रकल्प सुरु करण्यासाठी तत्कालीन शासन अग्रेसर होते.

सभापती महोदय, अणुऊर्जा निर्मिती करुन देशात ऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य पावले टाकत असताना जैतापूर प्रकल्प होऊच देणार नाही, असे वक्तव्य राज्याच्या माननीय पर्यावरण मंत्र्यांनी दिनांक 16/12/2014 रोजी नागपूर येथील एका वर्तमानपत्र समुहाला भेट दिली असताना केले आणि त्याबाबतच्या बातम्या वर्तमापत्रात छापून आल्या आहेत.

सभापती महोदय, जैतापूर प्रकल्पाबाबत राज्य शासनाची नेमकी भूमिका काय आहे, हे सुध्दा शासनाकडून अद्याप स्पष्ट करण्यात आले नसताना माननीय पर्यावरण मंत्र्यांनी जाहीरपणे वक्तव्य केल्यामुळे संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली असून जागतिक पातळीवरील या प्रकल्पासंबंधी शासनाचे दुटप्पी धोरण स्पष्ट झाले आहे. त्यामुळे राज्यातील जनतेमध्ये अनुचित पडसाद उमटत आहेत. या सर्व परिस्थितीत जैतापूर प्रकल्पाबद्दल राज्य शासनाने नेमकी भूमिका स्पष्ट करावी, अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे. या संदर्भातील वृत्तपत्र कात्रणांची प्रत देखील मी आपल्याकडे पाठवीत आहे.

सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. लोकांमध्ये, देशामध्ये, आंतरराराष्ट्रीय स्तरावर चुकीचा मेसेज गेलेला आहे. त्यामुळे जैतापूर प्रकल्प होणार आहे किंवा नाही, याबाबतचा खुलासा शासनाने आता करावा.

**उप सभापती** : औचित्याच्या मुद्यावर चर्चा होत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या पूर्वी सुध्दा औचित्याच्या मुद्याबाबत शासनाने खुलासा केलेला आहे. सत्तारुढ पक्षाचे सन्माननीय सदस्य विरोधी पक्षात असताना त्यांनी उपस्थित केलेल्या

...7....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त............

औचित्याच्या मुद्याबाबत तत्कालीन शासनाने सभागृहात खुलासा केलेला आहे. कारण, हा खुलासा केला गेला नाही तर समाजामध्ये हा प्रकल्प बंद करण्यात येणार आहे, असा चुकीचा मेसेज जाईल. त्यामुळे शासनाने आताच याबाबत खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

यानंतर श्री.मा.शिगम....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संदर्भात नागपूर सत्र न्यायालयामध्ये एक जनहित याचिका दाखल झालेली आहे. मुख्यमंत्र्यांनी निवडणुकीच्या काळामध्ये जे ॲफेडेव्हिट फाईल केले त्यामध्ये चुकीची माहिती दिल्यासंबंधीची ही जनहित याचिका आहे. ही जनहित याचिका केवळ चुकीच्या माहितीसंबंधी नसून त्यांच्यावर असलेल्या गुन्ह्यांसंबंधी देखील आहे. जवळपास 22 गुन्ह्यांचा उल्लेख जनहित याचिकेमध्ये आहे. ही बाब औचित्याच्या माध्यमातून या सभागृहामध्ये उपस्थित करण्याची मला संधी दिली असली तरी ही बाब अतिशय गंभीर आहे. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि शासनाने खुलासा करणे आवश्यक आहे. राज्याचे मुख्यमंत्री अशा प्रकारे माहिती दडवत असतील तर त्यांच्या मुख्यमंत्री पदाबद्दल निश्चितच प्रश्नचिन्ह निर्माण होते. खरे तर मुख्यमंत्र्यांनी चुकीची माहिती दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यायला पाहिजे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून
एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांचा औचित्याचा मुद्दा सभागृहासमोर आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्य सरकारने नागपूर विमानतळ केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे घेण्यात येणे, मात्र गत पाच वर्षात विमानतळाच्या सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने कोणतीच कार्यवाही न झाल्याने तसेच इतर आवश्यक बाबींची पूर्तता न केल्यामुळे आंतरराष्ट्रीय उड्डाने बंद झाली, आणखी काही एअर कंपन्यांनी आपल्या फेऱ्या बंद करण्याचा घेतलेला निर्णय, राज्य शासनाने विमानतळ ताब्यात घेऊन एमआयएलकडे सोपविणे, परंतु एमआयएलने कोणतीही विकास कामे केली नसल्यामुळे उत्पन्न घटले. एमआयएलकडे एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाचे सुमारे 58 कोटी रुपये थकीत असणे, यावर उपाययोजना करुन उक्त विमानतळाचा कारभार पूर्ण क्षमतेने चालविण्यात यावा, असे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ AKN/ AKN/ KTG/ पूर्वी श्री. रोझेकर 12:30

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आपण विदर्भातील अधिवेशनामध्ये विदर्भामध्ये सगळया क्षेत्रात काय परिस्थिती आहे याचा आढावा घेत असतो. एक गोष्ट अशी निदर्शनास आलेली आहे की, 3 वर्षापूर्वी गडचिरोलीला गोंडवाना विद्यापीठाची स्थापना झाली. 3 वर्षापूर्वी विद्यापीठाची स्थापना होऊन सुध्दा आजपर्यंत या नव्या विद्यापीठात मराठी भाषेचा विभागच अस्तित्वात नाही. या विद्यापीठाच्या अखत्यारीत चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयातील महाविद्यालयांचा समावेश होतो. तेथील सर्व विद्यार्थी मराठी भाषिक असून मराठी भाषेबाबत अशा प्रकारचा दुजाभाव असणे हे दुर्दैव आहे. ज्या विद्यापीठाच्या कक्षेत ही महाविद्यालये येतात त्या ठिकाणी कुणाला मराठी विषयामध्ये उच्च शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्यासाठी या विद्यापीठात 3 वर्षानंतर अजूनही सोय केली गेली नाही. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये आणि विशेषत: विदर्भासारख्या क्षेत्रामध्ये एखाद्या नव्या विद्यापीठाची ही अवस्था असणे ही मराठी या राजभाषेच्या दृष्टीने अत्यंत अपमानास्पद बाब असून याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष पुरविले पाहिजे. नेहमी असे उत्तर येते की, सर्व विद्यापीठांचे कुलपती राज्याच्या राज्यपालांच्या अखत्यारीत येतात. पण अशा प्रकारची सबब न सांगता मराठी भाषेचा योग्य सन्मान राखण्यास आणि त्या विषयाचे शिक्षण देण्यास गोंडवाना विद्यापीठाला भाग पाडण्यासाठी तातडीने कारवाई करावी आणि याबाबत शासन काय निर्देश देणार आहे ते अधिवेशन संपण्यापूर्वी या सभागृहामध्ये जाहीर करण्यात यावे.

--

...4..



श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समाजातील महत्वाचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारितेकडे बघितले जाते. लोकशाहीमध्ये आणि एकूणच समाजव्यवस्थेमध्ये पत्रकारितेचे अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे शासन मान्य यादीतील सर्व वृत्तपत्रांना महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे शंभर टक्के दरवाढ तातडीने देण्यात यावी. प्रासंगिक जाहिराती दैनिके व साप्ताहिकांना देण्याबाबत तातडीने निर्णय करावा. शासनाच्या जाहिराती माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडून वितरित करण्याबाबत तातडीने अंमलबजावणी करावी. अधिकृत वर्तमानपत्राच्या संपादकांना वयाच्या 60व्या वर्षानंतर दरमहा निवृत्ती वेतन देण्यात यावे, राज्यातील पत्रकारांवर होत असलेल्या हल्ल्यासंदर्भात कडक धोरण अवलंबून पत्रकार संरक्षण कायदा तातडीने करावा अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

--

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) J-5

MSS/ AKN/ AKN/ KTG/ पूर्वी श्री. रोझेकर 12:30

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्य सरकारने नागपूर विमानतळ केंद्र सरकारकडून राज्य शासनाकडे घेण्यात येणे, मात्र गत पाच वर्षात कुठलाही मोठा प्रकल्प सुरु न झाल्यामुळे महसूलात वाढ न होणे, त्याच बरोर विमानतळाच्या सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने कोणतीच कार्यवाही न झाल्याने तसेच इतर आवश्यक बाबींची पूर्तता न केल्यामुळे आंतरराष्ट्रीय उड्डाणे बंद होणे, यामुळे काही एअर कंपन्यांनी आपल्या फेऱ्या बंद करण्याचा घेतलेला निर्णय, राज्य शासनाने विमानतळ ताब्यात घेऊन एमआयएलकडे सोपविणे, परंतु एमआयएलने कोणतीही विकास कामे केली नसल्यामुळे उत्पन्न घटले. एमआयएलकडे एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाचे सुमारे 58 कोटी रुपये थकीत असणे, यावर उपाययोजना करुन विमानतळाचा कारभार पूर्ण क्षमतेने चालविण्यात यावा, असे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे निदर्शनास आणून देत आहे.

---

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

पुणे शहरातील सिटीप्राईड, ई-स्क्वेअर, आयनॉक्स, गोल्ड ॲडलॅब, मंगला व गोल्ड बिग सिनेमा या मल्टिप्लेक्स थिएटर्सना करमाफी असतानाही प्रेक्षकांकडून करमणूक कराच्या रुपाने 68 कोटी 65 लाख रुपयांचा करमणूक कर मल्टिप्लेक्स मालकांनी घेतलेला असल्याची बाब करमणूक कर विभागाच्या निदर्शनास आलेली असणे, करमणूक कर अधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी या सहा मल्टिप्लेक्सना त्यांनी शासनाचा बुडविलेला कर तातडीने भरण्याची नोटीस दिलेली असणे, परंतु मल्टिप्लेक्स मालकांनी तत्कालीन महसूल मंत्री महोदयांकडे विनंती करुन या कर वसुलीस स्थगिती मिळविलेली असणे, शासनाने मल्टिप्लेक्स मालकांनी कर वसुलीवर आणलेली स्थगिती रद्द करुन सर्व मल्टिप्लेक्स मालकांकडून शासनाचा बुडविलेला 68 कोटी 65 लाख रुपयाचा करमणूक कर व्याजासह लवकरात लवकर वसूल करावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिभाऊ राठोड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, निसर्गाच्या प्रकोपामुळे विदर्भातील यवतमाळ, वर्धा, अमरावती, बुलढाणा, नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांनी अवैध सावकाराचे पैसे परत न केल्यामुळे कोर्टात केसेस दाखल केल्या असल्याचे आढळून येणे, विदर्भातील 100 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर कोर्टात चालू असलेली अवैध सावकारी प्रकरणे शेतीशी संबंधित असल्याने या संदर्भात जिल्हा स्तरावर चौकशी समिती नेमून अशा कच्च्या स्टॅम्प पेपरवर शेतकऱ्यांची चालू असलेली प्रकरणे निकालात काढण्यात यावीत. शासनाने 370 कोटी रुपयांची सावकारी कर्जे माफ करण्यासाठी पॅकेजची घोषणा केली आहे. शासनाने या निर्णयाबाबत फेर विचार करावा अशी माझी विनंती आहे. शेतकऱ्यांनी 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर जमिनी गहाण ठेवल्या आहेत त्यामुळे त्या जमिनी सावकारांच्या पाशातून मुक्त करण्यात याव्यात, जेणेकरुन शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाहीत अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, गेवराई तालुक्यात वीज वितरण व्यवस्थेचे कंत्राटदार व अधिकारी यांच्या संगनमतामुळे मोठया प्रमाणात शेतकऱ्यांची पिळवणूक होणे, मंजूर कामे करताना शेतक-यांकडे पैशाची मागणी होणे, विद्युत खांब, तारा वगैरेची कामे शेतकऱ्यांकडून करुन घेण्यात घेणे, विद्युत जनित्र व इतर साहित्य मिळण्यासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागणे, अनेक शेतकऱ्यांना जादा देयके देऊन वसुलीसाठी तगादा लावण्यात येणे, अनामत रक्कमा भरुनही अनेक गावात वीज जोडणी व इतर कामे करण्यास विलंब होणे, लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनास पोहोच न देता त्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ करणे, विहित मुदतीत कंत्राटदार काम करीत नसल्यामुळे 7-7 दिवस गावे अंधारात राहणे, महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे शेतकरी व ग्राहक त्रस्त होणे, मुदतबाह्य कामाची चौकशी करुन तालुक्यातील वितरण व्यवस्था सुरळीत करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

---------------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सर्वसामान्य नागरिकांना स्वत:चे घर घेत असताना बोगस जाहिराती व फसव्या बिल्डरांपासून संरक्षण मिळावे याकरिता शासनाने गृहनिर्माण कायदा केला आहे. मात्र अद्यापपर्यंत त्याची अंमलबजावणी रखडली असणे, गृहनिर्माण नियामक प्राधिकरण आणि गृहनिर्माण अपील लवादावरील नियुक्त्या या दोन्हीसाठी प्रशासकीय कार्यालयाबाबत ठोस हालचाली प्रशासनाकडून दिसून येत नसणे, गृहनिर्माण विभागाकडे अद्यापर्यंत 1200 हून अधिक सूचना व हरकती प्राप्त झाल्या आहेत. मात्र केंद्राकडून असा कायदा करण्याचे प्रयत्न होत असल्याने भविष्यात राज्यातील गृहनिर्माण कायदा लागू ठेवणार का असा प्रश्न सर्वसामान्य लोकांकडून उपस्थित केला जात आहे. सर्वसामान्य जनतेसाठी हा कायदा लवकरात लवकर लागू होणे गरजेचे आहे. आज डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ या भागामध्ये 3 लाखामध्ये घर, 10 लाखामध्ये घर देणाऱ्या जाहिराती प्रसिध्द केल्या जात आहेत. सर्वसामान्य लोकांकडून फसवणूक करणाऱ्या जाहिरातीच्या माध्यमातून लाखो रुपये ॲडव्हान्स म्हणून घेण्यात आले आहेत. यासंदर्भात पोलीस विभागाच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रारी करुनही त्यांना न्याय मिळत नाही. या बाबीकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

-----------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मराठवाडा, विदर्भ आणि राज्यातील इतर विभागांमध्ये तीव्र दुष्काळाची स्थिती असणे, दुष्काळग्रस्त भागाला, शेतकऱ्यांना मदत मिळत नसल्याने राज्यभरात ठिकठिकाणी आंदोलने होत असणे, जालना येथे बुधवार, दिनांक 17 डिसेंबर, 2014 रोजी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने शेतकऱ्यांसमवेत लोकशाही मार्गाने आंदोलन करीत असताना आंदोलनकर्ते व शेतकरी यांचे निवेदन स्वीकारण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी नकार देणे, त्यामुळे पोलीस प्रशासनाने आंदोलनकर्त्यांना मारहाण करुन फरफटत ओढून पोलीस वाहनामध्ये कोंबणे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी प्रशासनाकडून देण्यात येणारी वागणूक अतिशय निंदनीय आहे. या घटनेची चौकशी करुन आंदोलनकर्ते व शेतकरी यांना मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

----------

5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाने सन 1999 मध्ये देशातील विद्यापीठे आणि शाळांमध्ये पर्यावरणाचा अभ्यासक्रम राबविण्याचे आदेश दिले होते. मात्र देशातील किंवा राज्यातील ऊर्जा, खाद्य, जल व वन या संदर्भातील माहिती तसेच देशातील जैव विविधता, वायू प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण या संदर्भात पर्यावरणीय नैतिक मूल्यासारख्या गोष्टींचा समावेश असलेला अभ्यासक्रम राज्यातील शाळांमध्ये सुरु केला आहे. मात्र विद्यापीठांनी अद्याप सुरु केलेला नाही. सदर पर्यावरण विषयक अभ्यासक्रम विद्यापीठांमध्ये सुरु करण्याचे आदेश शासनाने विद्यापीठांना द्यावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

----------

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, नागपूर येथील आमदार निवासाच्या तीन इमारती आहेत. या तीनही इमारतींची देखभाल करण्यासाठी कक्षसेवा, लिफ्टमन, कारपेंटर, प्लंबर, वीज तंत्री, सफाई कामगार, सुरक्षा रक्षक या सेवांची आवश्यकता आहे. आमदार निवासामध्ये येणारे लोकप्रतिनिधी व आगंतुक यांना सर्व सेवा योग्यप्रकारे मिळत नाही. त्यात त्रुटी असल्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांना लोकप्रतिनिधींच्या रोषाला बळी पडावे लागते. आमदार निवासातील तीनही इमारतीमध्ये तीन शिफ्टमध्ये कर्मचारी काम करतात. स्वागत कक्ष, कक्ष सेवक याकरिता 18 कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. असे असताना केवळ 6 कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेतले जात आहे. नागपूर आमदार निवासातील तीनही इमारतींकरिता 40 टक्के कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. आवश्यक असलेले कर्मचारी नेमण्याबाबत शासनाने प्रयत्न करावा आणि आमदार निवासाचे व्यवस्थापन उत्कृष्टपणे करावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

----------

...7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागातील शाळांमध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शाळा 100 टक्के अनुदानावर आल्याने शासनाकडून वेतन मिळते. शालेय शिक्षण विभागाने प्लॅन आणि नॉन प्लॅन असे दोन भाग पाडले आहेत. या सर्व प्लॅन किंवा नॉन प्लॅनमधील शाळांना शासनाकडून वेतन दिले जाते. तथापि प्लॅनमधील शाळांना सहा सहा महिने वेतन मिळत नाही.

नंतर एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .. .............

नॉन प्लॅनच्या शाळांना नियमितपणे वेतन मिळते म्हणून शासनाने हा प्लॅन आणि नॉन प्लॅन असा भेदभाव संपुष्टात आणावा व 100 टक्के अनुदानावर असलेल्या शाळा व वर्ग तुकड्यांना वेतन मिळावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करतो.

त्याचबरोबर आणखी एक बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, चार दिवसांपूर्वी मी विधान भवन परिसरातील शासकीय उपहारगृहासाठी जागा कमी पडत असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला असता आपण त्या अनुषंगाने सचिवांना तसे निर्देशही दिले होते. त्यासंदर्भात अद्याप काहीच हालचाल नाही.

**उप सभापती** : आज सायंकाळी प्रत्यक्ष सचिवांना पाहणी करण्याच्या सूचना देतो त्यांनी पाहणी केल्यानंतर मी त्याच्याकडून माहिती घेतो.

-----------

............2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : मी आपल्या अनुमतीने माझा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, या सभागृहात पत्रकार व मिडिया हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याची चर्चा आपण अनेक वेळा केलेली आहे. त्या अनुषंगाने मी सभागृहाचे लक्ष या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून वेधू इच्छिते.

महोदय, गेल्या तीन दिवसांपासून संपूर्ण राज्यात शेतकऱ्यांच्या संदर्भात दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रात अग्रलेखाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या वाईट परिस्थितीबद्दल व शेतकऱ्याच्या मानसिकतेबद्दल तसेच शेतकऱ्यांचे कष्ट व हाल या अनुषंगाने ज्या आत्महत्या होत आहेत त्याबाबत काहीतरी दिलासा मिळावा म्हणून दोन्ही सभागृहांच्या माध्यमातून आपण उपाय शोधत आहोत. अशा वेळी एका वर्तमानपत्राच्या अग्रलेखाचा विषय कोणता असावा हा संपूर्ण अधिकार त्या त्या वर्तमानपत्राच्या संपादकाचा अधिकार असतो. तरी देखील या माध्यमातून खास करुन "सभागृहाचे सभासद संवेदनशील आहेत की नाही, तसेच आमदार बधीर झाले आहेत काय, आमदार संवेदनहीन झाले आहेत काय" असे प्रश्न विचारले जात आहेत. तसेच विदर्भात व संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या संदर्भात वस्तुस्थितीच्या विपरित वर्णन अग्रलेखातून जे दिले जाते त्याबद्दल मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून असहमती व्यक्त करते.

-----------

............3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो

सॅमसन एज्युकेशन अँण्ड चॅरिटेबल ट्रस्ट संचलित सेंट पिटर्स हायस्कूल, वावटेवाडी, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता. वसई, जि. ठाणे या शाळेत संस्थेचे विश्वस्त श्री. जॉयसन सॅबॅस्टीन पिटर हे नियमबाह्य व एकतर्फी कारभार चालवित असून शाळेत 90 ते 95 टक्के विद्यार्थी हिंदू व अन्य धर्माचे असून देखील विद्यार्थ्यांवर ख्रिश्चन धर्माचा जबरदस्ती प्रभाव पाडण्याचा प्रयत्न होत आहे. सदर शाळा अल्पसंख्यांक दर्जा असलेली शाळा नसून देखील ख्रिश्चन या एकाच धर्माची शिकवणूक व त्यांचे आचार इच्छा नसतानाही विद्यार्थ्यांना मनात बिंबविले जात असून त्यापोटी प्रत्येक कार्यक्रमास चर्चचे फादर बोलावणे, शाळेमध्ये ख्रिश्चन संतांच्या मुर्तीची पालखी काढणे, प्रत्येक मुलांना सक्तीने ख्रिसमस क्राईब दाखविले जाणे, शासनाच्या शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या सुट्टयांचे काटेकोरपणे पालन न करता अतिरिक्त सुट्टया व साजरे करावयाचे दिवस देखील स्वत:च ठरवून विश्वस्त मनमानीपणे कारभार करीत आहेत.

त्याचप्रमाणे शालेय शिक्षण विभागाच्या संच मान्यतेपेक्षा अधिक लोकांच्या नियमबाह्य नियुक्त्या केल्या असून त्यांच्या पदोन्नती व अनुषंगिक बाबींसंदर्भात शासन निर्णयाचे पालन न करता वेळोवेळी स्वत:च्या मर्जीने एकतर्फी निर्णय घेतला जात आहे. या सर्व बाबींमुळे शाळेतील शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा शालेय कामकाजाचा अतिरिक्त वेळ विनाकारण खर्च होऊन विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर त्याचा विपरित परिणाम होत आहे व बहुतांशी विद्यार्थी नापास होऊन पालकांमध्ये सदर बाबतीत तीव्र असंतोष व संतापाची लाट असून इतर जन सामान्यांमध्ये सदर जाचामुळे धार्मिक तेढ व त्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच या सर्व घटनांची सखोल चौकशी व शाळेचे विश्वस्त श्री. जॉयसन सॅबॅस्टीन पिटर यांच्यावर कठोर कारवाई करण्याकरिता मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधत आहे.

------------

............4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ AKN/ AKN/ KTG/ ST/ पूर्वी श्री. भोगले............ 12:50

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो :

" सन 2014-15 या शैक्षणिक वर्षासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेतलेल्या (ESBC) आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील हजारो विद्यार्थी-विद्यार्थीनींनी फी माफी व शिष्यवृत्ती मिळावी म्हणून संबंधित महाविद्यालयाकडे विहित नमुन्यातील अर्ज सादर करुनही अनेक खाजगी महाविद्यालयांनी सदरचे फॉर्म स्विकारण्यास नकार दिल्याचे माहे ऑक्टोबर,2014 वा त्यासुमारास निदर्शनास येणे, यापूर्वी विद्यार्थ्यांना दरवर्षी फी माफी व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असताना यावर्षी मात्र शासनाच्या, मराठा व मुस्लिम समाजाच्या आरक्षण धोरणानुसार शालेय प्रवेश मिळाला असला तरी हे आरक्षण धोरण अद्याप अंमलात न आल्यामुळे या (ESBC) विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी माफी व शिष्यवृत्ती देण्याबाबतचा निर्णय शासनाने अद्याप घेतला नसल्याचेही माहे ऑक्टोबर,2014 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास येणे, सदर विद्यार्थ्यांना एकीकडे ESBC ची शिष्यवृत्ती नाही तर दुसरीकडे समाज आरक्षणाचा देखील लाभ नाही, त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊन त्यांच्यावर अन्याय झाल्याचे संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांनी शासनाकडे तक्रारी केल्याचे माहे नोव्हेंबर,2014 वा त्याच सुमारास निदर्शनास येणे,

सदरहू विद्यार्थ्यांना यापूर्वीपासूनच दरवर्षी फी माफी व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असताना आता मात्र दिनांक 18 डिसेंबर, 2014 रोजीच्या तारांकित प्रश्न क्र.934 च्या उत्तरामध्ये, "ईएसबीसी प्रवर्गास शिष्यवृत्ती/शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू केल्यास शासनावर येणारा आर्थिक भार विचारात घेऊन वित्त विभागाच्या सहमतीने पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे नमूद करुन एकप्रकारे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधकारमय होण्याची निर्माण झालेली परिस्थिती." या सर्व संबंधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी माफी व शिष्यवृत्ती मिळण्यास येणाऱ्या अडचणी व त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची निर्माण झालेली भिती, याबाबत हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे. हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होऊ नये म्हणून या औचित्याच्या मुद्यामार्फत मी शासनाकडे न्याय मागत आहे.

...........5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : हा प्रश्न अतिशय गंभीर स्वरूपाचा असून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडीत असल्याने याबाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालून सोमवार दि. 22 डिसेंबर, 2014 रोजी या विषयावर निवेदन करावे, असा मी निदेश देतो.

----------

.........6

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. राहूल नार्वेकर यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. राहूल नार्वेकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो :

मुंबईमध्ये जानेवारी महिन्यात मकरसंक्रांत हा सन साजरा करण्यात येतो. त्यावेळी ठिकठिकाणी शहरात पतंग मोठ्या प्रमाणात उडविले जातात. पतंगासाठी जो मांजा वापरण्यात येतो तो मांजा चायनावरुन मुंबईत मोठ्या प्रमाणावर व्यापारी मागवितात. सदर मांजाला घातक असे केमिकल वापरण्यात येत असून त्या केमिकलमुळे पतंगाचा मांजा हाताळल्यानंतर हाताला विशिष्ट प्रकारचा त्वचा रोग उद्‌भवणे, तसेच पतंगाचा मांजा झाडावर अडकल्यामुळे त्यात पक्षी अडकून त्यांचा मृत्यू होणे, त्यामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान पाहता या पतंगाच्या घातक व विषारी मांजाच्या निर्यातीवर तात्काळ बंदी घालण्याची गरज आहे असे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

---------

.........7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. आनंद ठाकूर यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. आनंद ठाकूर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो :

दि. 1 ऑगस्ट, 2014 रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा अस्तित्वात येणे, नवीन जिल्ह्याचे कामकाज पालघर येथील प्रशासकीय भवनात सुरु करण्यात आले असले तरी त्या कामाला गती न मिळणे, जात पडताळणीचे कार्यालय अस्तित्वात नसल्याने एस.सी., एस.टी. आणि ओबीसी इ. प्रवर्गातील लोकांना ठाणे जिल्ह्याला अर्ज करावा लागणे, सदरचे अर्ज ठाणे, कोकण भवनमध्ये जात पडताळणीसाठी पाठविण्यात येत असल्याने शासकीय कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी वर्ग व जनतेला होणारा नाहक त्रास, सोसावा लागणारा आर्थिक भुर्दंड यामुळे त्यांच्यात पसरलेले असंतोषाचे वातावरण, जात पडताळणीचे कार्यालय तत्काळ नवीन जिल्ह्याच्या (पालघर) प्रशासकीय इमारतीमध्ये सुरु करण्यात यावे, अशी मागणी या औचित्याच्या माध्यमातून करतो.

यानंतर श्री. भारवि ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी पालघर येथील आदिवासीसंबंधातील औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. आज जात पडताळणीसंबंधी विद्यार्थ्यांची खूप अडचण होत आहे. विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र एक महिन्यामध्ये मिळण्यासंबंधी आपण शासनाला निदेश द्यावेत.

**उप सभापती** : हा प्रश्न देखील अत्यंत महत्त्वाचा, योग्य असल्यामुळे यासंबंधात नेमकी कार्यवाही करण्यासंबंधातील निवेदन शासनाने येत्या सोमवारी करावे.

श्री.रामनाथ मोते : धन्यवाद.

====

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत देशपांडे यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.श्रीकांत देशपांडे : सभापती महोदय, माझा औचित्यादा मुद्दा आहे. आपण मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. अकोला जिल्हा परिषदेतील जिल्हा परिषदेच्या उपकरातून 100 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना अंडी उबविण्याचे यंत्र,संच पुरवणे आणि शेळी पालनाकरिता शेळ्या पुरविणे, जिल्हा परिषदेच्या सन 2014-2015 च्या अंदाजपत्रकामध्ये पुनर्नियोजन प्रस्ताव ऐन वेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी तो प्रस्ताव त्यांच्याशी संबंधित नसताना देखील घाईघाईने दाखल केला. दिनांक 16.7.2014 रोजीच्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ऐन वेळी विषय सादर केला. जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी सादर केलेले दोन विषय हे संपूर्णत: जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्या अखत्यारितील आहेत. असे असताना देखील चुकीच्या पद्धतीने सभेच्या दिवशी ऐन वेळी सभा सचिव यांच्याकडे परवानगी नसताना विषय दाखल केला. उपरोक्त प्रस्ताव विषय समितीची मान्यता न घेता, विषय सूचीमध्ये विषय न ठेवता, वित्त समितीची मंजुरी न घेता, वित्त विभागाने सचिवांच्या नस्तीवर दिलेल्या लेखी अभिप्रायाची दखल न घेता, विषय आर्थिक बाबीशी संबंधित असताना सुद्धा घाईघाईने विषय ऐन वेळी सभागृहात ठेवला. या सर्व गंभीर बाबी प्रशासकीय दृष्ट्या योग्य नाहीत. सर्व नियम धाब्यावर बसवून सदर प्रस्ताव सादर करणे योग्य नाही. जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी हे प्रकरण सादर केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला, यांनी दिनांक 28.10.2014 अन्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे केली आहे. पण त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे माझी आपणाला विनंती आहे की, आपण शासनाला यासंबंधात ताबडतोब स्थगिती देण्याची सूचना द्यावी.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण औचित्याचे मुद्दे मांडायला अनुमती दिली. ते सर्व प्रश्न महत्वाचे होते याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. या सदनामध्ये दोन औचित्याचे मुद्दे मांडलेले होते. देशाच्या व राज्याच्या दृष्टीने जैतापूर प्रकल्पासंबंधी औचित्याचा मुद्दा मांडण्यात आला होता. यासंबंधी शासनाला खुलासा करण्यासंबंधीचे आपण निदेश दिले तर त्यासंबंधातील माहिती सदनाला ज्ञात होईल. तसेच, माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात न्यायालयाने नोटीस दिलेली आहे. त्यांच्याबद्दल काही संशय राहू नये. या विषयी त्यांचे मत आले पाहिजे. त्यासंबंधी देखील आपण खुलासा मागवून घेतला पाहिजे.

**उप सभापती** : यासंबंधी शासनाचे जे काही मत असेल ते अधिवेशन संपण्यापूर्वी व्यक्त करावे अशी मी सूचना करीत आहे.

.....

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मध्य गोदावरी खोऱ्यातील 18 टीएमसी पाणी वापराचा बृहत आराखडा मंजुरीसाठी प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असणे

**मु. शी.** : मध्य गोदावरी खोऱ्यातील 18 टीएमसी पाणी वापराचा बृहत आराखडा मंजुरीसाठी प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असणे यासंबंधी सर्वश्री. अमरसिंह पंडित,सतीश चव्हाण,धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मध्य गोदावरी खोऱ्यातील १८ टी.एम.सी पाणी वापराचा बृहत आराखडा मंजुरीस्तव प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असणे, प्रस्तावित आराखड्यातील प्रकल्पांना मंजुरी न मिळाल्यामुळे मध्य गोदावरी खोऱ्यातील पाणी आंध्रप्रदेशात वाहून जाणे, सतत दुष्काळ व टंचाईग्रस्त मराठवाड्यातील जनता या सिंचन प्रकल्पाकडे आस लावून असणे, मराठवाडयाचा सिंचन अनुशेष दिवसेंदिवस वाढत जाणे, बृहत आराखडयातील प्रस्तावित २५० हेक्टरपेक्षा जास्त क्षमतेच्या प्रकल्पांना मान्यता देण्याचा ठराव मंत्रिमंडळाने करून मा.राज्यपालांकडे पाठविण्यात येणे, १८ टी.एम.सी बृहत आराखडयातील बीड जिल्ह्यातील प्रकल्प भूसंपादन व इतर बाबींसाठी किफायतशीर असणे, सदरहू पाणी अडविण्यासाठी मराठवाडयातील जनतेने तीव्र आंदोलनाची भूमिका घेणे, या भूमिकेकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे मराठवाडयातील विशेषत: मध्य गोदावरी खोऱ्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे (जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, गेल्या आठवड्यामध्ये राज्यात पडलेल्या दुष्काळावर चर्चा करीत असताना मी मराठवाड्यातील एक विषय अतिशय गांभीर्याने सांगितला होता की, दिवसेंदिवस आमचे सिंचनाचे क्षेत्र कमी कमी होत चालले आहे. केवळ सिंचनाचे क्षेत्रच नव्हे तर कसण्यालायक जमीन देखील कमी होत चालली आहे. याला साधन-सुविधांचा अभाव हेच एकमेव कारण आहे. मराठवाड्यात गेल्या तीन वर्षापासून सातत्याने दुष्काळ पडत आहे. मुख्य अभियंता, जल विज्ञान, नाशिक यांनी 18.33 टीएमसी पाणी नवीन प्रकल्पांसाठी उपलब्ध करून दिले होते. त्यामळे साधारणपणे 210 लघु प्रकल्प मराठवाड्यामध्ये निर्माण होणार होते. मी दुष्काळावरील चर्चेत भाग घेताना सांगितले होते की, गेवराई व बीड जिल्ह्यात 27000 हेक्टर जमीन या नवीन प्रकल्पांमुळे पाण्या खाली येणार होती. शाश्वत शेती निर्माण करण्यासाठी 18.33 टीएमसी पाण्यावर जे नवीन प्रकल्प होणार आहेत त्यास मान्यता द्यावी अशी देखील मी विनंती केली होती. हे 18 टीएमसीचे प्रकल्प तातडीने निकाली काढण्यासाठी मंत्रिमंडळाचा ठराव झाला. त्यानुसार आपण माननीय राज्यपालांना कळविले देखील. पण त्यासंबंधातील निकाल आणि निर्णय होणे बाकी आहे. उत्तराच्या शेवटच्या ओळीमध्ये एक विशेष उल्लेख झालेला आहे. प्रस्तावित 26 प्रकल्पांच्या योजनांचे मा.राज्यपाल महोदयांच्या सन 2014-2015 च्या निदेशान्वये प्रकल्प घेण्यास मान्यता देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी मा.राज्यपाल महोदयांना विनंती केली आहे. यात मराठवाड्यातील 26 प्रकल्पांचाच कसा काय उल्लेख आला हे मला कळत नाही. 173 प्रकल्प असताना आपण राज्यपाल महोदयांकडे फक्त काही मर्यादितच प्रकल्प पाठविलेले आहेत. त्यामुळे मी मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचार आहे. या 18 टीएमसी पाण्यावर जे मूळ 173 प्रकल्प प्रस्तावित होते ते 26 वर कसे काय आले आहेत ? हे 26 प्रकल्प मराठवाड्यातील कोणकोणत्या जिल्ह्यातील आहेत यासंबंधात अतिशय स्पष्टपणे उत्तर द्यावे. तसेच, मंत्री महोदयांचे उत्तर आल्यानंतर मला अजून दोन पूरक प्रश्न विचारण्यासाठी अनुमती द्यावी अशी माझी विनंती आहे.

...7

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, मध्य गोदावरी खोऱ्यातील 102 टीएमसी पाण्याचा एकत्रितपणे वापर होणे अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्या प्रमाणे 18.33 टीएमसी पाणी बाकी आहे. त्यासंबंधी कार्यवाही करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने दिनांक 4.11.2011 रोजी घेतला. त्या अनुषंगाने आपण 269 प्रकल्पांचे प्रयोजन केले होते. या 269 प्रकल्पांना दिनांक 1.8.2013 रोजी मंत्रिमंडळाने तत्त्वत: मान्यता दिली होती. कॅश फ्लोमुळे नवीन प्रकल्प घेण्यावर राज्यपाल महोदयांनी बंदी घातली आहे याची आपणा सर्वांना कल्पना आहे. मंत्रिमंडळाने संपूर्णत: बंदी न घालता अवर्षण प्रवण भागांना लाभ होण्याच्या दृष्टीने छोट्या प्रकल्पांना मान्यता देण्याची विनंती राज्यपाल महोदयांना केली. त्यानुसार 600 हेक्टरच्या आतील छोटे प्रकल्प घेण्यास राज्यपाल महोदयांनी तत्त्वत: मान्यता दिली आहे. ही तत्त्वत: मान्यता देताना माननीय राज्यपालांनी एक महत्त्वाची अट घातली आहे. ती अट अशी आहे की, सध्या सुरू असलेल्या प्रकल्पांच्या कॅश फ्लोंना कुठल्याही प्रकारची बाधा न येता काम करावे. याचा अर्थ असा की, आपल्याला छोट्या प्रकल्पांसाठी स्वतंत्ररित्या साधनसामुग्री उभी करावी लागेल. ते प्रकल्प तीन वर्षाच्या आत पूर्ण होत असतील तरच त्याचे काम करण्यास माननीय राज्यपालांनी परवानगी दिली आहे. आपण 18.33 टीएमसी पाण्यावरील प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. आज कॅश फ्लोची अडचण आहे हे सर्वांनाच माहीत आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यामध्ये 1.8 टीएमसी पाण्यावर 26 प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे. सन्माननीय सदस्यांनी कोणत्या जिल्ह्यामध्ये किती प्रकल्प घेतले आहेत असा स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यात आपण 7 प्रकल्प घेतले आहेत. बीड पाटबंधारे मंडळ, परळी यांच्या माध्यमातून 8 प्रकल्प घेतले आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय शिवतारे......

नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्या माध्यमातून 12 प्रकल्प घेतले आहेत. 26 प्रकल्पापैकी 11 प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. राज्यपाल महोदयांनी आपल्या कंडिशनमध्ये पाणी उपलब्धतता प्रमाणपत्र अत्यावश्यक केलेले आहे. 15 प्रकल्पांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्रांचा प्रस्ताव तयार करुन आता तो देण्यात आलेला आहे. 11 पाणी उपलब्धता प्रमाणपत्रा पैकी 7 प्रकल्पांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र शासनास सादर झालेले आहेत. 4 प्रकल्पांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र लवकरच शासनास सादर होणार आहे. 26 प्रकल्पांपैकी ज्यांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र तयार आहे अशांचा साकल्याने विचार केला जात आहे. जलसंपदामध्ये राज्यपाल महोदय आणि सुप्रमाचे बंधन आहे. परंतु जे प्रकल्प 250 एमसीएफटीचे असतील आणि त्यांनी क्रॉप पॅटर्न बदलला तर या प्रकल्पांचे काम जलसंधारणाच्या माध्यमातून केले तर दुष्काळग्रस्त भागातील जनतेला आणि शेतकऱ्यांना आपण न्याय देऊ शकू. 250 एमसीएफटी चे प्रकल्प असतील त्या ठिकाणच्या क्रॉप पॅटर्नमध्ये थोडासा बदल केला तर या प्रकल्पांची कामे आपल्याला जलसंधारणाच्या माध्यमातून पूर्ण करता येऊ शकतील त्यामुळे तशा प्रकारच्या सूचना मी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी गावांचा आणि जिल्हानिहाय किती प्रकल्प होत आहेत याचाही उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. परंतु यासाठी कोणते निकष लावले या खोलात मी जाणार नाही. बीड जिल्हा सातत्याने तीन वर्षापासून दुष्काळाला सामोरे जात असताना बीड जिल्हयातील असे जे प्रस्तावित प्रकल्प असतील त्या प्रकल्पांना न्याय देण्याच्या हेतूने आपण धोरण बदलणार आहात की, नाही ? असल्यास बीड जिल्हयातील बहुतांश प्रकल्प 250 एमसीएफटीच्या आतील आहेत. त्यामुळे 26 प्रकल्पांची संख्या वाढवून घेण्याच्या संदर्भातील आपले धोरण बदलून दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्याचे सामर्थ्य या लोकांमध्ये निर्माण व्हावे, या ठिकाणच्या शेतकऱ्यांमध्ये शेती करण्याचे धाडस निर्माण करण्यासाठी आमच्या नशिबात शाश्वत शेती पहावयास मिळावी या हेतूने आपण आपले धोरण बदलून त्यासंदर्भातील निर्णय करणार आहात की, नाही ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे उत्तर मी अगोदरच दिलेले आहे. तांत्रिकदृष्या 250 एमसीएफटी पर्यंत किंवा त्याच्या आतील जे प्रकल्प आहेत ते आपल्याला जलसंधारण विभागाच्या माध्यमातून घेता येतात. जलसंधारणाला जादा जाचक अटी आणि शर्ती नसल्यामुळे हे प्रकल्प आपल्याला तातडीने जलसंधारणाच्या माध्यमातून घेता येतील. जे प्रकल्प 250 एमसीएफटीच्या आतील आहेत अशा प्रकल्पांची कामे जलसंधारण विभागाच्या माध्यमातून निधी जस जसा उपलब्ध होईल त्या प्रमाणे पूर्ण केली जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, गोदावरी पाण्याच्या वाटपासाठी लवादाची नियुक्ती करण्यात आली होती व लवादाच्या माध्यमातून पाण्याचे वाटप झाले होते. मुळात हे पाणी 2004 च्या आत सर्व ठिकाणी उपलब्ध व्हावयास पाहिजे होते परंतु ते मिळाले नाही. आज सर्वात जास्त दुष्काळी परिस्थिती मराठवाडा आणि विदर्भातच आहे. खरे म्हणजे अजूनपर्यंत सिंचन हा विषय महत्वाचा झालेला नाही. भविष्यात अशा प्रकारचा दुष्काळ पडू नये यासाठी मराठवाडा आणि विदर्भासाठी लागणारा निधी दिला जाणार आहे काय ? मोठया प्रकल्पांची कामे आयुष्यभर होतच राहणार असून आमच्यावर अन्यायच होतच राहणार आहे. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, मराठवाडा आणि विदर्भाचा दुष्काळ संपवण्याकरिता स्पेशल निधी देऊन आमच्या हक्काचे पाणी आम्हाला मिळाले पाहिजे याकरिता सरकार काही प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भातील जो अवर्षणप्रवण भाग आहे तेथे लवकरात लवकर सुविधा देण्याचा प्रयत्न करणार आहे. मुख्यमंत्री महोदयांनी जलयुक्त शिवार अभियान जाहीर केले असून त्यामध्ये प्रत्येक भागाचे वॉटर ऑडीट केले जाणार आहे. त्यामुळे जलसंवर्धनासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : अंधेरी येथील पोलीस निरीक्षक श्री.नरेश कासले यांनी मद्यधुंद अवस्थेत लोकप्रतिनिधींशी केलेले असभ्य वर्तणूक

**मु. शी**. : अंधेरी येथील पालीस निरीक्षक श्री.नरेश कासले यांनी मद्यधुंद अवस्थेत लोकप्रतिनिधींशी केलेले असभ्य वर्तणूक यासंबंधी ॲड. अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वांद्रे (पूर्व) येथील लोकप्रतिनिधी काही कामानिमित्त स्थानिक पोलीस ठाण्यात गेले असतांना अंधेरी येथील पोलीस निरीक्षक श्री. नरेश कासले यांनी मद्यधुंद अवस्थेत लोकप्रतिनिधींशी असभ्य वर्तवणूक करुन उडवाउडवीची दिलेली उत्तरे, पोलीस निरीक्षक यांना लोकप्रतिनिधींनी आपण आमदार असल्याची जाणीव करुनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन अरेरावीची उत्तरे देणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ मे, २०१४ रोजी पोलीस आयुक्त तसेच पोलीस उपायुक्त यांचेशी पत्रव्यवहार करुन ६ ते ७ महिन्यांचा कालावधी उलटून देखिल अद्याप कोणतीच कारवाई न होणे, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन दोषी पोलीस निरीक्षकांवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

डॉ.रणजित पाटील ( गृह राज्यमंत्री(शहरे) ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, जनतेचे प्रश्न लोकप्रतिनिधी या सभागृहात मांडत असतात. परंतु हा प्रश्न माझ्याशी निगडित आहे. अधिकारी रात्री कशा प्रकारे काम करतात हे आम्ही वारंवार या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणून दिलेले आहे. एका कंपनीच्या प्रकरणामध्ये मी उपायुक्तांना भेटलो होतो व त्यांना हेही सांगितले होते की, हे प्रकरण क्रिमिनल नसून सिव्हील आहे. त्यांनी सांगितले होते की, आमच्याकडे तक्रार आली आहे. यासंदर्भात पूर्ण चौकशी केली जाईल. तोपर्यंत कोणाला ॲरेस्ट केले जाणार नाही. चौकशी अंती हे प्रकरण सिव्हिल असल्याचे आढळून आले तर तशा प्रकारचे आदेश दिले जातील. त्यांना मी कल्पना दिली होती की, ज्या दिवशी तुम्ही एफआयआर दाखल कराल त्या दिवशी छोटया छोटया लोकांना बोलावले तर पैशांची मागणी होईल. जे डिस्ट्रीब्युटर होते त्यांना त्यांच्या फॅमिली बरोबर परदेशात जावयाचे होते परंतु असे असतानाही त्यांना रात्री 12.00 वाजता पोलीस स्टेशनमध्ये आणले गेले. त्यावेळेस मी स्वत: पोलीस स्टेशनला गेलो होतो. त्यावेळेस तेथील अधिकाऱ्यांना मी सांगितले की, या विषयाच्या संदर्भात माझे उपायुक्तांशी बोलणे झालेले आहे, अटक करणार नाही याबाबत त्यांच्याशी बोलणे झालेले आहे. वाटले तर आपण उपायुक्तांशी बोलून चर्चा करा. या प्रकरणात संबंधितांची एकदा चौकशी झालेली आहे. त्यावेळेस रात्री 12.00 वाजता पोलीस स्टेशनमध्ये नरेश कासले नावाचे अधिकारी होते, ते दारूच्या नशेत होते तसेच त्यांना उभे राहण्याची सुध्दा शुध्द नव्हती. त्यांनी माझ्याशी अतिशय अरेरावीची भाषा केली. त्यांनी सांगितले होते की, मी तुमचे काही ऐकू शकत नाही. अटक करण्याचे अधिकार मला वरिष्ठांनी दिलेले आहे. तुम्हाला बोलायचे असेल तर माझ्या वरिष्ठांशी बोला. त्यांना मी विचारले की, कोणत्या वरिष्ठांशी बोलू, त्यावेळेस त्यांनी मला आयुक्तांचा फोन आला पाहिजे असे सांगितले. मला नाइलाजास्तव रात्री 1.00 वाजता पोलीस आयुक्त श्री. राकेश मारिया साहेबांना फोन करावा लागला. आम्ही रात्री कितीही वाजता त्यांना फोन केला तरी ते आमचे म्हणणे ऐकतात त्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. श्री. मारिया साहेबांनी या प्रकरणाची शहानिशा केल्यानंतर संबंधितांना जाऊ दिले.

सभापती महोदय, हे प्रकरण गंभीर असून यामध्ये दोन कंपन्यांचे भांडण आहे. यामध्ये छोटया छोटया लोकांना बोलावून त्यांच्याकडून मागणी केली जाते. पैसे दिले जात नाही म्हणून त्यांच्यावर कारवाई केली जाते, त्यांना दोन-दोन, तीन-तीन दिवसांचा रिमांड दिला जातो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब .. ..

सभापती महोदय, आम्ही हे प्रकरण उच्च न्यायालयात नेले आहे. हे प्रकरण सिव्हील आहे की, क्रिमिनल आहे, यामध्ये कोण दोषी आहे याची संपूर्ण चौकशी होण्याची आवश्यकता आहे. परंतु मी एक जबाबदार लोकप्रतिनिधी या नात्याने अधिकाऱ्यांना सांगितले होते की, माझे उपायुक्तांशी बोलणे झालेले आहे. अशा वेळेला मला कोणत्याही प्रकारे दाद न देता अरेरावीची उत्तरे दिली गेली. उत्तरात म्हटले आहे की, या प्रकरणाची चौकशी झालेली आहे. मी स्वत: तक्रारदार आहे. मी माझ्या आमदारकीच्या करिअरमध्ये कोणत्याही पोलिसाची लेखी तक्रार केलेली नाही. पोलिसांचा मार खाऊन खाऊन मी आमदार झालो आहे. असे असतानाही आम्ही कोणत्याही पोलिसाची लेखी तक्रार केली नाही. परंतु अशा मद्य धुंद अवस्थेत केवळ पैसे मिळत नाही म्हणून छोटया छोटया लोकांना त्रास देण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये बोलावले जाते. अशा गरीब लोकांसाठी आम्ही पोलीस स्टेशनमध्ये जातो त्यावेळेला आम्हा लोकप्रतिनिधींना अशा प्रकारची वागणूक दिली जाते. उत्तरात चौकशी सहाय्यक आयुक्तांनी केली असून चौकशीचा रिपोर्ट सादर केला आहे असा उल्लेख आहे. ज्यावेळेस उपायुक्तांनी अगोदरच्या अधिकाऱ्याकडचा तपास काढून दुसऱ्या अधिकाऱ्याला दिला परंतु पुन्हा दबाव आणून पुन्हा पहिल्या अधिकाऱ्याकडे तपास आला. या प्रकरणामध्ये मी तक्रारदार असल्यामुळे माझे साधे स्टेटमेंटसुध्दा घेण्यात आलेले नाही. असे असताना चौकशी कशी काय पूर्ण होऊ शकते ? चौकशी झाली असेल तर संबंधित व्यक्ती दोषी आहे की, निर्दोष आहे ? आपण ही जी चौकशी केली आहे ती कोणत्या अनुषंगाने केली आहे ? चौकशीचे कोणते निकष लावले गेले आहेत ? चौकशीमध्ये आपण कोणते साक्षीदार तपासले, जे लोक माझ्या बरोबर होते त्यांचे तुम्ही स्टेटमेंट घेतले होते काय ? केवळ तोंडाला पाणे पुसण्याचे स्टेटमेंट देण्यात आलेले आहे. त्यामुळे अशा मुजोर अधिकाऱ्याला निलंबित करून या प्रकरणाची चौकशी उच्च अधिकाऱ्यांमार्फत केली जाणार आहे काय ?

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये शेवटी असे म्हटले गेले आहे की, योग्य तो निर्णय घेऊन माननीय आमदारांना लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

लक्षवेधी सूचना सभागृहात दाखल करण्यात येते त्यावेळी ती सभागृहाची प्रॉपर्टी होते. तो प्रश्न एका सदस्यांपुरता मर्यादित राहत नसून तो सभागृहाचा प्रश्न होतो. निवेदनामध्ये जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे. तेव्हा आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि त्या संदर्भातील सविस्तर उत्तर आल्यानंतर ही लक्षवेधी सूचना घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, यापूर्वी सभागृहात कायदा आणि सुव्यवस्था प्रश्नावर चर्चा झाली त्यावेळी दोन्ही बाजूकडून पोलिसांची बाजू घेण्यात आलेली आहे. 26.11 ला जो हल्ला झाला त्यावेळी आम्ही पोलीस अधिकाऱ्यांची नावे घेऊन त्यांनी आपल्या जीवावर उदार होऊन त्यांनी लढा दिला होता असे सांगितले होते. त्यांच्याकरिता हा हल्ला नव्हता तर ते युद्ध होते असेही दोन्ही बाजूकडून सांगण्यात आले होते. मुंबई पोलीस विभागामध्ये काही अधिकारी चांगले आहेत तर काही अधिकारी असे का वागतात ते समजत नाही. मी देखील पोलिसांच्या असभ्य वर्तनाचा अनुभव घेतलेला आहे. लोकप्रतिनिधी पोलिसांना भेटायला गेल्यावर ते प्रथम भेट कशी टाळता येईल ते पाहतात. काही वेळा फोन केल्यानंतर मी मिटींगमध्ये आहे असे सांगितले जाते. मी एका पोलीस अधिकाऱ्याला फोन केला तेव्हा त्याने सांगितले की, मी मिटींगला आहे. कर्मधर्म संयोगाने मी त्या परिसरात असल्यामुळे तेथे गेलो असता ते महाशय आपल्या दालनात असल्याचे दिसून आले होते. ते आपल्या दालनात काय करीत होते ते डिगिंग करण्यासारखे आहे. मी संपूर्ण पोलीस विभागाबाबत बोलत नाही. पोलीस आयुक्त श्री.राकेश मारिया, श्री.सुधांशू रॉय या सारख्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना रात्री दोन-तीन वाजता फोन केला तरी ते फोनवर उपलब्ध होतात असा मी अनुभव घेतलेला आहे. असे अनेक अधिकारी पोलीस विभागात आहेत. परंतु आम्ही जेव्हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक यांच्याशी फोनवर बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ते आपणास कसे टाळता येईल हे पाहतात. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांना 10-10 वेळा फोन केल्यानंतरही ते फोनवर येत नाहीत. मग आम्ही लोकांचे प्रश्न घेऊन त्यांच्याकडे जायचे कसे ? शासनामार्फत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक यांना वाहन दिले जाते, इतर सर्व सुविधा त्यांना दिल्या जातात, असे असताना ते काम करणार नसतील तर त्यांच्यावर काहीतरी कारवाई करणे आवश्यक आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो प्रकार सांगितला तो आपल्या अनेकांच्या बाबतीत घडलेला आहे. दोन दिवसापूर्वी मी विमानतळाच्या संदर्भातील लक्षवेधी सूचनेच्या वेळी असा विषय मांडला होता. आज अशी परिस्थिती आहे की, लोकप्रतिनिधींनी फोन केल्यावर काम होणार नाही परंतु एखाद्या बिल्डरने फोन केल्यास लगेच काम होते. पोलीस विभागात चांगले अधिकारी देखील आहेत. परंतु जे अधिकारी आपले काम करीत नाहीत, लोकप्रतिनिधींशी असभ्य वर्तन करतात त्यांच्यावर वचक ठेवण्यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आज मी शासन म्हणून काम करीत असलो तरी मी सुद्धा एक सदस्य म्हणून काम केलेले आहे. सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना, राजकीय क्षेत्रात काम करीत असताना आपणास पोलीस स्टेशनला जावे लागते, पोलीस अधिकाऱ्यांना भेटावे लागते. या सर्व गोष्टींचा मला अनुभव नाही असे कृपया आपण समजू नये. कोठे काय चालते ते मला देखील माहीत आहे. सन्माननीय सदस्य पोलीस स्टेशनला गेले होते त्यावेळी मध्यरात्र उलटून गेली होती. सदरची घटना 10 तारखेची आहे. मी त्या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी देखील बोललो आहे. सन्माननीय सदस्यांनी 14 तारखेला पत्र दिले ते पत्र देखील मी वाचले आहे. त्यांनी पत्रात जे सांगितले त्या सर्वांचा एकत्रित उल्लेख करुन त्याबाबत एक सखोल चौकशी डी.सी.पी.यांच्यामार्फत सुरु आहे. त्या चौकशीला देखील पाच महिने उलटून गेले आहेत. त्या चौकशीचा अहवाल अंतिम टप्प्यात आलेला नाही. या तक्रारीची चौकशी सहाय्य पोलीस आयुक्त करीत आहेत. ती चौकशी अंतिम टप्प्यात आहे. सहाय्यक पोलीस आयुक्तांचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे. या अहवालात काही त्रुटी राहिल्यामुळे सहाय्यक आयुक्तांना सूचित करण्यात येईल की, या सर्व प्रकरणामध्ये सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब आणि त्यांच्यासोबत जे जे लोक होते त्यांची साक्ष सुद्धा नोंदविण्यात यावी. त्यानंतर अंतिम अहवाल द्यावा. पोलीस अधिकारी झोपलेले होते, मद्यधुंद अवस्थेत होते या सर्व गोष्टींची साकल्याने चौकशी करण्यात येईल. जर ते दोषी आढळले तर त्यांना निलंबित देखील करण्यात येईल. आधीच्या सरकारकडून सन्माननीय सदस्यांचा अवमान व अपमान झालेला आहे परंतु या सरकारकडून आपणास न्याय मिळेल एवढेच मी सांगतो.

..3..



AJIT/ AKN/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जी लक्षवेधी सूचना दिली होती त्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने देण्यात आलेले निवेदन फक्त दोन ओळींचे आहे. आपण या ठिकाणी वस्तुस्थिती विशद केली ती निवेदनात येणे अपेक्षित होते, परंतु ती आलेली नाही. ही फार मोठी चूक किंवा त्रुटी यामध्ये राहिलेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी सांगितले की, ते पोलीस अधिकारी मद्यधुंद अवस्थेत होते. आपण त्या संदर्भातील चौकशी आज कशी करणार ? आपण त्याचवेळी त्यांच्या रक्ताची तपासणी केली असती तर त्याने मद्य प्राशन केले होते किंवा कसे हे समजले असते. मी आपल्या चौकशीबद्दल काही बोलत नाही. चौकशी कधी होणे आवश्यक होते हे महत्वाचे आहे.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी देखील काही मुद्दे उपस्थित केले. आपण नेहमीच पोलिसांनी केलेल्या कामगिरीबद्दल त्यांची पाठ थोपटत आलो आहोत. आपण नेहमी त्यांचे मनोधैर्य वाढवित आलो आहोत. महाराष्ट्रातील जनता तसेच लोकप्रतिनिधी नेहमीच पोलिसांबद्दल आदर ठेवून आहे. परंतु आदर ठेवणाऱ्या लोकप्रतिनिधींना देखील वाईट आणि कठोर अनुभव आलेले आहेत. परंतु हे अनुभव आपल्या जमेस न ठेवता त्यावर ताबडतोब शासन होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना जो अनुभव आला त्याबाबत आपण चौकशी करणार आहात असे सांगितले. आपणास ही चौकशी करायची असेल तर ती सहायक पोलीस आयुक्त यांचेमार्फत न करता ती अतिरिक्त पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्यामार्फत करावी. ही चौकशी अत्यंत नि:स्पृहपणे करण्यात यावी. त्यामध्ये पोलिसांना कोणत्याही प्रकारे फेव्हर करण्यात येऊ नये.

मला निवडणुकीच्या काळात आलेला अनुभव सांगतो. राज्य कोणाचे होते, सत्ता कोणाची होती हा महत्वाचा भाग नाही. ठाणे शहर पोलीस विभागात एका पोलीस उपायुक्ताची नेमणूक झाली होती. त्या पोलीस उपायुक्तांनी निवडणुकीच्या रात्री इतके अक्षम्य वर्तन केले होते की, त्याबाबत कार्यकर्त्यांनी लेखी तक्रार केली होती, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर हे देखील उपस्थित होते. त्यांनी एका उमेदवाराच्या गाडीत 35 लाख रुपयांची रक्कम पकडली आणि ती गाडी 10 लाख रुपये घेऊन सोडून दिली. मी हे आज सांगत नाही तर प्रत्यक्ष घटना घडली

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ......

त्यावेळी निदर्शनास आणून दिले होते. ते पोलीस उपायुक्त आज देखील ठाणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये काम करीत आहेत. माझ्या पदाचा गैरवापर न करता मी त्याबाबत पुन्हा काही चौकशी केली नाही. कारण मला माहीत होते की, चौकशी चालू आहे, चौकशी झाल्यानंतर आपणास कळविण्यात येईल असे काही उत्तर येईल. आपण असताना अशी परिस्थिती होऊ नये अशी माझी प्रांजळ इच्छा आहे.

सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी दाखल केलेल्या तक्रारीबाबत आपण पाऊल उचलेले असल्यामुळे त्याबाबत कारवाई करण्याचे निर्देश मी देत नाही. परंतु अशाप्रकारचे अक्षम्य वर्तन करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला निश्चितपणे शासन करावे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे ही चौकशी अतिरिक्त पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्याकडे सोपविण्यात यावी. या संदर्भातील अहवाल दोन-तीन दिवसांत येणे शक्य नसल्यामुळे पुढील अधिवेशनात तो सादर करावा.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाचे पालन करण्यात येईल. तसेच भविष्यात सन्माननीय सदस्यांच्याबाबतीत असे होऊ नये म्हणून पोलिसांकडून काही संहिता पाळली जावी हे सुद्धा शासनातर्फे त्यांना कळविण्यात येईल.

**उप सभापती** : आपण ठाणे येथील घटनेची देखील चौकशी करावी.

--------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या रुक्मिणीबाई हॉस्पिटलमध्ये अपुऱ्या सुविधांमुळे रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसणे

**मु. शी.** : कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या रुक्मिणीबाई हॉस्पिटलमध्ये अपुऱ्या सुविधांमुळे रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसणे, यासंबंधी श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने 120 खाटांचे रुक्मिणीबाई हॉस्पिटल बांधले असणे, या हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्ष भेट दिली असता हृदयविकार, क्षयरोग, मधुमेह, डायलेसिस इत्यादी रोगांवर तपासण्या करणाऱ्या मशिन्स बंद असणे, तेथे ऑपरेशनसाठी कुशल नर्सेस, डॉक्टर नसणे, परिणामी अत्यंत गरीब रुग्णांना योग्य उपचार सुविधा व अत्यंत आवश्यक वैद्यकीय सेवा न मिळणे, राज्य सरकार वा केंद्र सरकारच्या अनेक योजनांचा लाभ मिळत नसणे, यासंदर्भात वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यासोबत चर्चा केलेली असणे, गेल्या 2 ते 3 वर्षापासून कल्याण महानगरपालिकेचे सुमारे 66 अधिकारी व तत्सम डॉक्टर, तंत्रज्ञ, नर्सेस, वॉर्डबॉय इत्यादींच्या नियुक्त्या करण्याची नगरविकास विभागाकडे मागणी केलेली असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मान्य करण्यात आले आहे की, त्या ठिकाणी रेडीओलॉजीस्ट् उपलब्ध नाही. मी विचारु इच्छितो की, त्या रुग्णालयात एक्स-रे मशिन आहे, परंतु तेथे एक्स-रे मशिन ऑपरेटर आहे काय ? तसेच लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मान्य केले आहे की, हृदयरोग आणि डायलिसीसच्या रुग्णांना सुविधा देण्यात येत नाही. सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महापालिका हा परिसर आपल्या मतदारसंघात सुध्दा येतो. त्या शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन त्या रुग्णालयातून लोकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, त्या ठिकाणी अशा प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येईल काय ? तसेच दुसरी बाब अशी की, कल्याण-डोंबिवली महापालिकेने शासनाकडे 90 पदे भरण्यासाठी परवानगी मागितली आहे काय, असल्यास, शासन ती पदे भरण्याची परवानगी किती दिवसात देणार आहे ? महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, प्रशासनामध्ये डॉक्टर, नर्सेस, वॉर्डबॉयची पदे भरण्यासाठी जाहिराती दिल्या होत्या. परंतु उमेदवार मिळाले नाहीत. महोदय, ही पदे कंत्राटी पध्दतीने भरली जात असतील तर निश्चितपणे कोणीही येणार नाही. त्यामुळे मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, ही पदे कायमस्वरुपी भरण्यात येतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अतिशय मूलभूत प्रश्न विचारले आहेत. महोदय, सुरुवातीला सदरहू रुग्णालय नगरपालिकेचे होते. परंतु तद्नंतर कल्याण-डोंबिवली महापालिकेने 1999 मध्ये या रुग्णालयाचा विस्तार करुन 120 खाटांचे रुग्णालय सुरु केले. पूर्वी ती केवळ जनरल डिस्पेन्सरी होती, त्यानंतर आपण त्यामध्ये काही स्पेशालिटी समाविष्ट केल्या. त्या ठिकाणी कॅज्युल्टी आहे, इनडोअर सर्व्हीस आहे आणि काही बेसिक सर्जरी सुध्दा त्या ठिकाणी होतात. ते स्पेशालिटी सेंटर नसल्यामुळे तेथे सर्व सर्जरी होत नाहीत. त्या ठिकाणी बेसिक सर्जरी होणे अपेक्षित आहे. त्या रुग्णालयात अनेक उपकरणे आहेत. हे खरे आहे की, त्या ठिकाणी डायलिसीसची सुविधा देण्यात येत नसल्यामुळे संबंधित मशिनरी नाहीत. परंतु ते युनिट देणे शक्य नाही. कारण तो

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

हायली स्पेशलाईज्ड जॉब आहे. त्यामुळे तेथे ते होऊ शकत नाही. तेथे डायलिसीसचे युनिटच नसल्यामुळे ते बंद पडण्याचा प्रश्नच नाही. हे खरे आहे की, त्या रुग्णालयात हार्टची तपासणी होते. हार्टची तपासणी ब्लड प्रेशरच्या तपासणीपासून सुरु होते. ती तपासणी त्या ठिकाणी केली जात आहे. तपासणीमध्ये हार्टचा रुग्ण आढळून आला तर त्याला इतरत्र उपचारासाठी रेफर केले जाते. पिडीयाट्रीक आणि गायनेकॉलॉजिचे युनिट म्हणून ते चालविले जाते. तेथे एलएससीएस सुध्दा होतात आणि पिडीयाट्रीकसाठी जो स्टाफ लागतो तो तेथे आहे. त्या रुग्णालयात 24 वैद्यकीय अधिकारी आहेत. त्यामध्ये दोन भूलतज्ज्ञ, दोन गायनॉकॉलॉजिस्ट आणि एक पिडीयाट्रीक आहे. त्यामध्ये स्पेशालिस्टची पदे कंत्राटी स्वरुपाची आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे स्थायी स्वरुपाची आहेत. त्याला सपोर्टींग स्टाफ सुध्दा 40-50 लोकांचा आहे. तेथे एक्स-रे मशिन आहे. पॅथॉलॉजीची व्यवस्था आहे. सोनोग्राफी मशिन ऑपरेट करण्यासाठी कंत्राटी पध्दतीवर रेडीऑलॉजीस्ट घ्यावा हे शासनाला मान्य आहे. 1960 पासून 90 पदांना मंजुरी आहे. परंतु या ठिकाणी खर्चाचा प्रश्न येतो. कारण कोणत्याही महापालिकेच्या आस्थापना खर्च 35 टक्क्यांच्या वर जाता कामा नये. विधानसभा सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या अधिवेशनात या बाबतीत आश्वासन दिले हाते. त्यांनी सांगितले होते की, सदरहू रुग्णालय महापालिकेकडून शासनाकडे हस्तांतरित केले पाहिजे. महापालिकेकडून तसा प्रस्ताव आला तर त्यास मान्यता देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले होते. म्हणजे या ठिकाणी दोन पर्याय आहेत. एक म्हणजे या पदांना स्थायी स्वरुपाची परवानगी देणे किंवा दुसरा म्हणजे सर्व रुग्णालय शासनाकडे हस्तांतरित करणे होय. कारण हा प्रपंच महापालिकेकडून होऊ शकत नाही. या रुग्णालयात सुविधा द्यावयाच्या असतील तर त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येतो. परंतु हा खर्च महापालिकेच्या कक्षेबाहेरचा आहे. त्यामुळे नगर विकास विभागाने माननीय मुख्यमंत्र्यांकडे सदर रुग्णालय शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्व बाजू तपासून पाहत आहे. शासन त्या पदांना मान्यता देईल किंवा रुग्णालय हस्तांतरित करुन देईल. ज्याप्रमाणे भिवंडी येथील इंदिरा गांधी रुग्णालय शासनाकडे हस्तांतरित करण्यात आले,

..4..



SJB/ AKN/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 13:30

डॉ.रणजित पाटील...

त्याच प्रमाणे हे रुग्णालय सुध्दा हस्तांतरित करण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी किती खर्च येईल किंवा अन्य सर्व बाजू तपासून त्या नंतर या बाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

**उप सभापती** : या बाबतीत मी माननीय राज्यमंत्र्यांना विनंती करतो की, मी त्या भागात स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रतिनिधी म्हणून काम करतो. या विषयी महापालिकेकडे चौकशी केली असता प्रशासनाने सांगितले की, जर राज्य सरकार रुग्णालयाच्या हस्तांतरणाची प्रक्रिया त्वरित करीत नसेल तर, राज्य सरकारने महापालिकेने पाठविलेल्या कर्मचारी वर्गाला मान्यता देण्याच्या प्रस्तावाला परवानगी दिली तर यातून काही तरी मार्ग निघेल. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, शासन महिनाभरात अशा प्रकारची परवानगी देऊ शकेल काय ?

डॉ.रणजित पाटील : होय.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, महापालिका रुग्णालयाचा खर्च भागवू शकत नसल्यामुळे महापालिका सदरहू रुग्णालय चालवू शकत नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ज्या महापालिकांची आर्थिक क्षमता अमुक इतकी असेल त्याच महापालिका रुग्णालय चालविण्यास पात्र ठरतील असा धोरणात्मक निर्णय शासन घेईल काय ? कारण महापालिकेच्या पैशातून रुग्णालयाचे बांधकाम केले जाते. परंतु अनेक ठिकाणी रुग्णालयच सुरु होत नाही. अनेक रुग्णालयाच्या इमारती बंद राहतात. त्या ठिकाणी डॉक्टर, नर्सेस किंवा अन्य पदे पुरवू शकत नाही. त्यामुळे महापालिकेची इन्व्हेस्टमेंट डेड इन्व्हेस्टमेंट म्हणून वर्षानुवर्षे पडून राहते. म्हणून या संदर्भातील धोरणात्मक निर्णय शासन घेणार काय ? तसेच सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, रिक्त पदे भरण्यासाठी जाहिराती देऊनही उमेदवार मिळत नसल्यामुळे पदे भरता येत नाहीत. मी त्यांना विचारतो की, अशा जाहिराती किती वेळा दिल्या ? महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "जाहिरातीला प्रतिसाद मिळत नसल्याने, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेशी संपर्क साधून बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत सदरची कमतरता भरुन काढण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे." म्हणून मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, या माध्यमातून असे किती अधिकारी त्या रुग्णालयात नियुक्त केले आहेत ?

..5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या शेवटच्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगतो की, हे धोरण गेल्या दोन वर्षांपासून सुरु आहे. बंधपत्रित उमेदवाराला पेरीफेरल आणि रूरल एरियामध्ये सुध्दा पाठविण्यात येते अनेक महापालिकेत अस्थायी पदांची जाहिरात देऊनही काम करण्यासाठी कोणी पुढे येत नाही. त्यामुळे अशा बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा घेण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न जाहिरातींच्या बाबतीत विचारलेला आहे. परंतु सध्या माझ्याकडे त्या बाबतची माहिती उपलब्ध नाही.

महोदय, मी 24 वर्षे वैद्यकीय क्षेत्रात काम केलेले आहे. त्यापैकी 13 वर्षे आरोग्य सेवेमध्ये काम केले आहे. त्यामुळे मला या बाबतचा अनुभव आहे. उदाहरणार्थ एखाद्या शहरात प्रायव्हेट प्रॅक्टीशनर तेथे प्रायव्हेट प्रॅक्टीस करीत असेल आणि महापालिकेच्या रूग्णालयात अस्थायी सेवा देत असेल तर, महापालिकेच्या रूग्णालयात जेवढी सेवा द्यायला पाहिजे त्यापेक्षा प्रायव्हेट प्रॅक्टीसमध्ये जास्त सेवा देतो. त्याची खाजगी रूग्णालयातील प्रॅक्टीस वाढली की, तो महापालिकेच्या सेवेकडे दुर्लक्ष करतो. असा माझा सुध्दा अनुभव आहे. त्याला तेथील मोबदला सुध्दा हवा असतो. महोदय, या संदर्भात दोन-तीन वेळा जाहिराती देऊन कोणी पात्र उमेदवार मिळाले नाहीत. त्यामुळे बंधपत्रित उमेदवारांकडून बंधपत्रावर लिहून घेतले जाते की, शासनाची सेवा 1-2 वर्षे करणार आहोत. ते उमेदवार लर्निंग फेजमध्ये असतात. ते ॲकॅडेमिकमधून नुकतेच आलेले असतात. त्यांचा जास्तीत जास्त फायदा गरीब रूग्णांना व्हावा म्हणून आपण हे धोरण निश्चित केले होते. बंधपत्रित उमेदवार किती घेतले याची माहिती घेऊन सांगतो. सर्व महापालिकांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय होऊ शकत नाही. काही महापालिका चांगल्या पध्दतीने रूग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय चालवित आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मागणी केली त्यानुसार सरसकट राज्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे योग्य होणार नाही. भौगोलिक परिस्थितीनुसार डोंगराळ आणि आदिवासी भाग असेल तर त्या ठिकाणी निश्चित वेगळे धोरण ठेवावे लागेल. कारण त्या ठिकाणी डॉक्टर जाण्यास तयार होत नाहीत. पण मुंबई महापालिकेच्या रूग्णालयांसाठी वेगळे धोरण ठेवावे लागेल. त्यामुळे राज्यभरात या बाबतीत सरसकट धोरण करु शकत नाही.

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : महोदय, कल्याण-डोंबिवली महापालिका शहराच्या दृष्टीने हा अतिशय महत्त्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे. माननीय राज्यमंत्री चांगल्या प्रकारे उत्तर देत आहेत. परंतु स्थानिक परिस्थिती मात्र वेगळी आहे. त्यांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मान्य केले आहे की, काही ठिकाणी यंत्रे आहेत, परंतु ती यंत्रे चालविणारा स्टाफ नाही.

नंतर श्री.कांबळे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव)**

श्री. संजय दत्त ....

तसेच, काही ठिकाणी स्टाफ आहे तर यंत्रणा नाही. मूळ अडचण अशी आहे की, कल्याणमध्ये सुपरस्पेशॅलिटी हॉस्पिटल नाही. बऱ्याच वर्षांपासून तेथे सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटलची मागणी आहे. लक्षवेधी सूचनेत या संदर्भातील मागण्या उपस्थित करून सन्माननीय सदस्यांनी सर्व बाबी निदर्शनास आणून दिल्या आहेत. माझेही तेच प्रश्न होते. तत्कालीन मुख्यमंत्री साहेबांनी कबूल केले होते की, कल्याणमध्ये सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल असले पाहिजे. शासनाचे त्याबाबत काय धोरण व भूमिका राहील, अमुक एका कालमर्यादेत त्याबाबत निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल का ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी या संदर्भात आधीच सांगितले आहे की, हेच हॉस्पिटल जे अगोदर नगरपालिकेचे होते ते आपण विस्तारित केले आहे. आता येथे इन्फ्रास्ट्रक्चर आहे. आपला हेच हॉस्पिटल हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, तेथे पूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर नाही.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, आपण तेच हॉस्पिटल पुढे सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल म्हणून डेव्हलप करू शकतो. पहिल्यांदा हस्तांतरण होऊ द्यावे. शासनाकडून तसा विचार करण्यात येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हस्तांतरणाच्या संदर्भात काही कालमर्यादा देण्यात येणार आहे का ? आपण कार्यवाहीच्या संदर्भात एक महिन्याचा कालावधी द्यावा.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी पहिल्यांदाच तो दिला आहे. मी पहिल्यांदा या संदर्भात बोललो आहे. मी हस्तांतरणाचे बोललेलो नाही. सर्व बाबी तपासून सर्व विभागाशी विचारविनिमय करावा लागतो. त्यामुळे त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. एक महिन्यात धोरण ठरविता आले तर तसा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, तेथील प्रशासनाने, आयुक्तांनी वेळोवेळी मंत्रालयामध्ये याबाबत सूचना केली आहे. मात्र त्यांना प्रतिसाद मिळाला नाही आणि म्हणून हा प्रश्न निर्माण झाला आहे. आपण त्या संदर्भात कालमर्यादा ठरविली पाहिजे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझाही तोच प्रश्न आहे. कल्याण-डोंबिवली मनपाच्या रुक्मिणी रुग्णालयाचा विषय आहे. रुग्णालयामध्ये जाणारे लोक सर्वसामान्य नागरिक आहेत. श्रीमंत माणसे खाजगी रुग्णालयात जातात. सर्वसामान्यांना आरोग्याच्या सुविधा मिळणे क्रमप्राप्त आहे, तो त्यांचा हक्क, अधिकार आहे. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न सुटला तरी सुध्दा या लक्षवेधी सूचनेचा उद्देश सफल होऊ शकतो. रुक्मीणी हॉस्पिटल चालविणे, त्याची देखभाल करणे, योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देणे हे महानगरपालिका प्रशासनाच्या आवाक्याच्या बाहेरचे आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये त्रुटी आहेत. शासनाने यापूर्वीच घोषित केले आहे की, या संदर्भातील प्रस्ताव कल्याण-डोंबिवली मनपा प्रशासनाने शासनाला दिला तर आम्ही नक्की हस्तांतरण करण्याच्या संदर्भातील निर्णय घेऊ. उत्तरात सांगितले आहे की, आम्ही तो प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रशासनाडून शासनाकडे प्रस्ताव आलेला आहे. मला वाटते की, सर्वसामान्य लोकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रस्ताव तातडीने मंजूर करणे हाच एक योग्य प्रर्याय होऊ शकेल. माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भातील कार्यवाही शासन तातडीने प्राधान्याने करणार आहे का आणि किती दिवसांत करणार आहे ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, मार्च, 2013 मध्ये अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. नगरविकास खात्याकडून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे प्रस्ताव जावा लागतो आणि त्यानंतर त्यातील सर्व बाबी समजून घेऊन शक्य तितक्या लवकर याबद्दल निर्णय होईल. सदर बाबतीत निर्णय घ्यायचा की नाही हा विषय नाही. सदर विषयाच्या संदर्भात सर्व बाबी समजून घेऊन पूर्ण होमवर्क करून निर्णय घेतला जाईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने कल्याण-डोंबिवलीतील नागरिकांच्या उपलब्ध असलेल्या आरोग्य व्यवस्थेची बरीच चर्चा झाली आहे, माननीय मंत्र्यांनी त्या बाबतची सविस्तर उत्तरेही दिलेली आहेत. परंतु, प्रत्येक प्रश्नाचे जनरलायझेशन केले की, तो प्रश्न मोठा आणि व्यापक होतो. आपण प्रश्नाचे भाग करावेत आणि त्यातील काही गोष्टींची प्रायोरिटी ठरवावी. उदा. डायलेसिस. आज डायलेसिसची गरज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. खाजगी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

ठिकाणी डायलेसिसचा खर्च सर्वसामान्यांना परवडण्यासारखा नाही. डायलेसिसचे तंत्रज्ञान आता इतके विकसित झाले आहे की, अनेक ठिकाणी एनजीओंच्या माध्यमातून डायलेसिस सेंटर सुरू करण्यात आली आहेत. आपल्या व्यापक आराखड्याप्रमाणे हस्तांतरण, सुपरस्पेशॅलिटी या गोष्टी होतील आणि त्याला कालावधी बराच लागेल. मधल्या कळात डायलेसिससारख्या उपाययोजनासाठी आवश्यक ती पूर्तता करण्याच्या संदर्भात ठरविले तर ते फार अवघड आहे अशातील भाग नाही. कदाचित आपले नियम असतील. हे हॉस्पिटल आहे आणि येथे डायलेसिसची यंत्रणा उपलब्ध आहे. ती कोणाला तरी विशिष्ट पध्दतीने व्यवस्थित चालविण्यास दिली तर एका तरी स्पेसिफिक विषयाच्या संदर्भात उपचाराची व्यवस्था करून देणे मला तरी अशक्य वाटत नाही. एक-एक विषय घेऊन तो मार्गी लावण्याच्या दृष्टीने फक्त आपली इच्छाशक्ती असली पाहिजे. आपण असा वेगळा पायंडा पाडू शकाल का ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे अतिशय मौलिक असे विचार आहेत. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये डायलेसिस करणार असे म्हटलेले नाही. कारण तेथे डायलेसिस यंत्रणा नाही. त्यामुळे ते उपकरण बंद पडण्याचे काही कारणच नाही. तुम्ही संदेश दिला की, राज्यात बरीच हॉस्पिटल्स आहेत जेथे इन्व्हेस्टिगेशन करणारे किंवा उपचार देणाऱ्या फॅसिलिटी उपलब्ध आहेत, पण सर्व्हिसेस नाहीत, मग कारण काही असेना. मला आपल्या म्हणण्याचा मथितार्थ लक्षात आला. मी सांगू इच्छितो की, रुग्णालयांत जर कोणी चालवायला असेल किंवा एनजीओंच्या मार्फत चालविले गेले किंवा काही कॉंट्रिब्यूशनने होत असेल तर त्या इक्विपमेंटचा फायदा सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यास या पॉलिसीमध्ये थोडे रिलॅक्सेशन जरी आणावे लागले तरी ते करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, एकाही प्रश्नाचे अजूनही उत्तर मिळाले नाही. रुक्मिणी रुग्णालयामध्ये रेडिओलॉजिस्ट या पदावर उमेदवार उपलब्ध झालेले नाही असे सांगितले. मनपाने 90 पदांची मागणी केली आहे, त्या संदर्भातही उत्तर दिलेले नाही. माननीय मंत्री म्हणाले की, मुंबई मनपामध्ये चांगल्याप्रकारे रुग्णालये सुरूआहेत. मला सांगायचे आहे की, मुंबई मनपाच्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

रुग्णालयांमध्ये अनेक मोठमोठी उपकरणे आणतात पण ती वापरात येत नाहीत, पडून राहतात. एमआरआय, स्कॅनिंग किंवा इतर टेस्ट खाजगी हॉस्पिटलमध्ये 5-6 हजार रुपये घेऊन केल्या जातात. अनेक लोक अशा टेस्ट करण्यासाठी मुंबई मनपाच्या हॉस्पिटलमध्ये येतात. पण त्यांचा नंबर 200-250 असल्यामुळे 2-2 महिने त्यांच्या टेस्ट होत नाहीत. आपण सदर ठिकाणी लोकांना लवकरात लवकर टेस्ट करुन मिळण्यासाठी प्रयत्न करणार का ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या कक्षेच्या बाहेरचा हा प्रश्न आहे. पण मी उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. आपण सोनोग्राफी मशिन बाबत विचारले. मी मान्य केले होते की, सोनोग्राफी मशिन तेथे आहे. पण सर्व्हिसेस देण्यासाठी आमच्याकडे कोणत्याही प्रकारचे स्पेशॅलिस्ट्स नाहीत. उत्तरात या संदर्भात सांगण्यात आले आहे. आपण सांगितले की, खाजगीमध्ये 5-6 हजार रुपये घेऊन या टेस्ट केल्या जातात. मी सांगू इच्छितो की, आम्ही स्पेशॅलिस्ट मिळण्यासाठी 4 वेळा जाहिराती दिल्या आहेत. आपण एमआरआय संदर्भात बोललात. आपण त्यासाठी काही ठिकाणी पब्लिक-प्रायव्हेट पार्टिसिपेशन करार केले आहेत. काही कामे आपण करणार आहोत तर काही कामे ते करणार आहेत. फक्त गरीब लोकांसाठीच वेटिंग नाही तर खाजगी लोकांना देखील वेटिंग असते. साध्या शहरात जेथे जास्त मशिन्स आहेत, तेथे सुध्दा वेटिंग असते. अपॉईंटमेंट घेऊन दुसऱ्या, तिसऱ्या दिवशी नंबर देण्यात येतो. मी पुन्हा सांगू इच्छितो की, जे चालले आहे ते व्यवस्थित आहे. आपण सांगितले ते सजेशन फॉर ॲक्शन.

----

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवरील उर्वरित लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सादर करणे.

श्री. दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सभागृहाला सादर करीत आहे.

**तालिका सभापती** : सन 2008-2009 या वर्षांच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. सदरहू अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांच्या प्रती सन्माननीय सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणाद्वारे वितरित करण्यात येत आहेत.

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**पृ.शी./मु.शी.** : महाराष्ट्र आरक्षण कायदा, 2001 हा कायदा मॅट न्यायालयाने घटनाबाह्य असल्याचा निर्णय नुकताच दिल्याने गेल्या 8 वर्षांपासून कर्मचारी व अधिकाऱ्यांना मिळालेल्या पदोन्नती काढून पदावनत व्हावे लागेल या भीतीने भटक्या विमुक्त समाजावर मोठा आघात व अन्याय होत असल्याची भावना निर्माण झाल्यामुळे या निर्णयाच्या विरोधात माननीय सर्वोच्च न्यायालयात जाऊन विमुक्त भटक्यांच्या पदोन्नतींना संरक्षण देणे याबाबत श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र आरक्षण कायदा, 2001 हा कायदा मॅट न्यायालयाने घटनाबाह्य असल्याचा निर्णय नुकताच दिला असल्यामुळे मागासवर्गीयांमध्ये पसरलेली निराशा, गेल्या 8 वर्षांपासून कर्मचारी व अधिकाऱ्यांना मिळालेल्या सर्व पदोन्नती काढून पदावनत व्हावे लागेल याबाबतची त्यांच्यात निर्माण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड ....

झालेली भीती व चिंता, यामुळे सामाजिक न्यायाला तडा जाण्याची शक्यता विशेषत: भटक्या विमुक्त समाजावर झालेला मोठा आघात आणि अन्याय, यामुळे त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने या निर्णयाच्या विरोधात माननीय उच्च न्यायालयात जाऊन विमुक्त भटक्यांच्या पदोन्नतींना संरक्षण देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

सभापती महोदय, महाराष्ट्र आरक्षण कायदा 2001 नुकताच मॅटने रद्दबातल ठरविला आहे. त्यामुळे मागासवर्गीयांवर फार मोठा अन्याय झाला आहे आणि त्यांच्यामध्ये एक प्रकारची निराशा पसरलेली आहे. यापूर्वी मागासवर्गीयांचे प्रमोशन झाले होते ते सर्व subject to the outcome of the decision of the High Court असे असेल तर गेल्या 8 वर्षांमध्ये ज्या कर्मचारी, अधिकारी यांना प्रमोशन मिळाले आहे त्यांना पदावनत करावे लागेल.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड..........

गेल्या वर्षीच्या या निर्णयाला मॅटने स्थगिती दिली. या निर्णयामुळे सामाजिक न्यायाला तडा जाण्याची शक्यता आहे. यामुळे भटक्या व विमुक्त समाजावर अन्याय झाला असून त्याबाबत तीव्र असंतोषाची भावना पसरलेली आहे. शासनाने मॅटच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात अपिल करणे आवश्यक आहे. याबाबत सामाजिक न्याय विभागाने तातडीने कार्यवाही करावी. हा सामाजिक न्यायाचा फार मोठा निर्णय आहे. त्यामुळे फार मोठा बदल होईल. भटका व विमुक्त हा दुर्लक्षित समाज आहे. त्यांचे आरक्षण काढून घेण्यात आले आहे. सरकारने याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, अशी विनंती करतो आणि थांबतो.

--------------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : भांडूप (मुंबई) येथील शाळेत चार वर्षाच्या विद्यार्थिनीवर शाळेतील कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प. स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, भांडूप (मुंबई) येथील एका खाजगी शाळेत चार वर्षाच्या विद्यार्थिनीवर शाळेतील कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. भांडुपच्या सावित्रीबाई फुले व घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात उपचारासाठी या बालिकेला दाखल करण्यात आले. सर्व प्रकार समजूनही रुग्णालयाने या गुन्ह्याची माहिती पोलिसांना दिली नाही. या प्रकाराची संतप्त प्रतिक्रिया होऊन परिसरातील रहिवाशांनी शाळेत तोडफोड केली. लहान मुलींवर होणाऱ्या अत्याचारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून ही अतिशय अस्वस्थ करणारी घटना आहे. याबाबत शासनाने त्वरित उपाययोजना करावी, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : बीड जिल्ह्यातील ग्रुप ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करण्याबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील अनेक ग्रुप ग्रामपंचायतीचे विभक्तीकरण करण्याची मागणी ग्रामस्थांनी करणे, इर्ला-डुब्बा ग्रुप ग्रामपंचायतीतील दोन गावे वेगवेगळ्या तालुक्यात असणे, संपर्कासाठी त्यांना रस्ताही नसणे, अशा प्रकारची स्थिती अनेक ठिकाणी असणे, त्यामुळे गावांच्या प्रशासकीय व विकास कामात अनंत अडचणी निर्माण होणे, ग्राम पंचायत विभक्तीकरणासाठी ग्रामस्थांनी तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारणे, जिल्ह्यातील या ग्रामपंचायतींचे विभक्तीकरण करण्यात यावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे."

------------

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी**. : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे रायपाटण येथे 100 विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह बांधण्याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सन 2011 मध्ये शासनाने मागासवर्गीय विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृह इमारतीची योजना जाहीर करणे, त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे रायपाटण येथे 100 विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह बांधण्यात येऊन त्यासाठी रक्कम रुपये 5 कोटी मंजूर करण्यात येणे, तसेच सदर काम पुण्यातील स्कायलार्क कंपनीला देण्यात येणे, तथापि, सदर वसतिगृहाच्या इमारत बांधकामाला तीन वर्षापूर्वी सुरुवात होऊनही अद्यापि सदरची इमारत अपूर्णावस्थेत असल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या हक्काचा निवाऱ्याचा प्रश्न निर्माण होणे, या योजनेसाठी आवश्यक असलेला निधी सामाजिक न्याय विभागामार्फत मंजूर करुन तो संबंधित शासकीय यंत्रणेकडे दोन वर्षापूर्वीच सुपूर्द करण्यात येणे, असे असताना सामाजिक न्याय विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी नकारात्मक भूमिका स्वीकारल्यामुळे सदर इमारतीचे काम अद्यापही ठप्प असणे, परिणामी दोन्ही विभागाच्या नकारात्मक भूमिकेमुळे रायपाटण पंचक्रोशीवासियांमध्ये/स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व संताप व्यक्त होणे, रायपाटण गावी मंजूर झालेल्या 100 मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाची इमारत त्वरित बांधण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाकडे करीत आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्याच्या नवीन तहसील कार्यालयाची जागा बदलण्याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

प्रा.जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, साकोली जिल्हा भंडारा येथील नवीन तहसील कार्यालय शहरापासून लांब निर्जनस्थळी करण्यात येत आहे. रहदारी नसलेल्या निर्जन व जनतेच्या अत्यंत गैरसोईच्या असलेल्या जागेवर नवीन तहसील कार्यालयाची इमारत बांधण्याचा प्रयत्न शासनातर्फे केला जात आहे.

सभापती महोदय, या विरुध्द साकोली शहर व तालुक्यातील जनतेमध्ये अत्यंत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहर व तालुकावासीयांनी तहसील कार्यालय इमारत जुन्याच ठिकाणी करावी आणि जनतेला गैरसोईपासून वाचवावे, अशी साकोली शहर व तालुक्यातील जनतेची मागणी आहे. या मागणीसाठी सर्वपक्षीय नागरिक कृती समितीतर्फे धरणे, आंदोलन व साकोली बंदचे आवाहन दिनांक 9 डिसेंबर, 2014 रोजी केले होते. जनतेच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने हे आंदोलन यशस्वी झाले. परंतु, या शांततापूर्ण आंदोलनातील श्री.कैलास गेडाम हे दलित कार्यकर्ते असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पेशल फोरमचे जिल्हा संघटक व पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे जबाबदार कार्यकर्ते आहेत. साकोलीचे पोलीस निरीक्षक श्री.खारतोडे यांनी एखाद्या आरोपीसारखे त्यांच्या मानगुटीला धरुन शिवीगाळ करीत पोलीस गाडीत बसविले व पोलीस ठाण्यात आणल्यानंतर त्यांना मारहाण करुन पोलीस कस्टडीमध्ये डांबून ठेवले. पोलीस निरीक्षक श्री.खारतोडे यांच्या या गुंडगिरी विरुध्द सर्व आंदोलनकर्ते पोलीस ठाण्यात एकत्र आले व खारतोडे ठाणेदाराच्या या बेकायदेशीर दडपशाहीचा निषेध करुन संबंधित ठाणेदाराने माफी मागावी, अशी मागणी केली. परंतु, मस्तवाल ठाणेदार श्री.खारतोडे यांनी माफी मागण्यास नकार देऊन कार्यकर्त्यांस नाहक अटक केली. पोलीस निरीक्षक श्री.खारतोडे यांचेविरुध्द कठोर कारवाई करुन

...6....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...........

साकोलीतील जनतेला दिलासा द्यावा आणि साकोली येथील जनभावनेचा आदर करुन नवीन तहसील कार्यालय गैरसोयीच्या ठिकाणी न करता जनतेच्या सोयीसाठी जुन्याच जागी तहसील कार्यालयाची इमारत बांधावी. पिपल्स रिपब्लिकन पक्षाचे भंडारा जिल्हा कार्याध्यक्ष श्री.विजय रामटेके व सर्वपक्षीय नागरिक कृती समितीने राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद फडणवीस यांचेकडे ठाणेदार श्री.खारतोडे यांना निलंबित करण्याची मागणी केलेली आहे. माननीय गृहमंत्री यांनी या प्रकरणी दखल घेऊन अरेरावी करणाऱ्या मस्तवाल ठाणेदाराला त्वरित निलंबित करावे, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

----

...7....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यभरातील न्यायालयांचा कारभार मराठीत चालविण्याबाबत ॲड.राहुल नार्वेकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.राहुल नार्वेकर ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने अधिनियम, 1964 मध्ये राज्य शासनाचा सर्व कारभार मराठी भाषेत करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मात्र अद्यापही राज्यभरातील न्यायालयातील कारभार इंग्रजी भाषेतून चालत असणे, त्यामुळे सर्वसामान्य राज्यभरातील मराठी बांधवांना ज्ञान नसल्याने न्यायालयीन न्यायनिवाड्याचा अर्थबोध न होणे, त्यामुळे न्यायालयात जास्त प्रमाणात इंग्रजी भाषेचा वापर होत असल्याने, त्यांची मोठ्या प्रमाणात अडचण होणे, न्यायालयीन कामकाज मराठीतून करण्यात यावे, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : अंशकालीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, या राज्यातील माध्यमिक शाळेतील संच मान्यतेचे काम सुरु झाले. सन 2013-2014 ची संच मान्यता झाली. सन 2013-2014 च्या संच मान्यतेमध्ये संबंधित शाळेत काम करणाऱ्या अर्धवेळ कर्मचाऱ्यांची किंवा अंशकालीन कर्मचाऱ्यांची सेवा 10 ते 15 वर्षे होऊन सुध्दा शासनाने त्यांना सेवेतून कमी करण्याचे आदेश दिलेले आहेत. शासनाच्या म्हणण्यानुसार अर्धवेळ कर्मचाऱ्यांना संरक्षण नाही. या संदर्भात माननीय उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल झाली. मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्टपणे शासनाला आदेश दिलेले आहेत की, अर्धवेळ कर्मचाऱ्याची सेवा 2 वर्ष झाली असली तरी तोही समायोजनास पात्र आहे. या राज्यातील हजारो अंशकालीन कर्मचारी सेवेतून बाहेर पडलेले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानुसार, निदेशानुसार अंशकालीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यासंबंधी शासनाने कार्यवाही करावी, अशा प्रकारची विनंती मी आपल्या माध्यमातून शासनाला करीत आहे."

--------------

...9.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील शाळांमधील सुरक्षा व्यवस्था यासंबंधी श्री.संजय दत्त वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, पाकिस्तानमधील पेशावर येथील शाळेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये हाय अर्लट जाहीर केला असला तरी महाराष्ट्र राज्यातील शाळेमधील सुरक्षा व्यवस्था भक्कम नाही. बहुतांश शाळात सुरक्षा रक्षक आहेत. मात्र त्यांच्याकडे प्रतिकार करण्यासाठी कोणतीही आधुनिक साधने नाहीत.

यानंतर श्री.मा.शिगम........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ पूर्वी श्री. रोझेकर 14:00

श्री. संजय दत्त..

सुरक्षा व्यवस्था कमकुवत असून केंद्र सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन केले जात नाही. सर्वशिक्षा अभियानांतर्गत जिल्ह्यातील शाळांना कंपाऊंड वॉल नाहीत तर काही शाळा अनुदान नसल्याने कंपाऊंड वॉलच्या प्रतीक्षेत आहेत. इंटरनॅशनल स्कूलमध्ये सीसी टीव्ही कॅमेरे, रजिस्टर नोंद वही आणि हत्यारधारी सुरक्षारक्षक तैनात आहेत. परंतु काही शाळांना संरक्षक भिंती आणि गेटही नाहीत, काही शाळांना संरक्षक भिंती आहेत मात्र त्यांची अवस्था दयनीय आहे. कर्मचाऱ्यांसाठी हालचाल रजिस्टर नाही तर अनोळखी व्यक्तींच्या नोंदीसाठी रजिस्टर ठेवलेले नाही. बहुतांश शाळेची सुरक्षेची जबाबदारी शिपायांवर सोपविली आहे. महानगरपालिका, खाजगी आणि जिल्हा परिषदांच्या शाळांत कोणत्याही व्यक्तीने शाळेत प्रवेश करावा आणि पाल्याच्या नातेवाईक असल्याचे सांगून घेऊन जावे, अशी बिनदिक्कतपणे प्रवेश करण्याची खुली परवानगी आहे. राज्यात मराठी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमांच्या शाळा दिवसेंदिवस वाढत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संख्येतही वाढ होत आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांची सुरक्षा व्यवस्था ऐरणीवर आली आहे. राज्यातील शाळेतील सुरक्षेच्या प्रश्नाबाबत ठोस पावले उचलावीत यासाठी या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयावर मी विशेष उल्लेख सभागृहामध्ये उपस्थित करीत आहे."

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुंबईतील सर जे.जे.स्कूल ऑफ आर्टस् मधील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे,वि. प. स. यांनी दिलेली उल्लेखाची सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील कला संचालनालयांतर्गत मुंबईतील सर जे.जे.स्कूल ऑफ आर्टस्, जे.जे.अप्लाईड आर्टस्, स्कूल ऑफ आर्टस् औरंगाबाद आणि शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर अशी एकूण 4 शासकीय महाविद्यालये असून या चारही महाविद्यालयासाठी आवश्यक असणारे कला संचालक पद हे गेली अनेक महिन्यापासून रिक्त असणे, अधिष्ठात्याची दोन पदे, प्राध्यापकांची जवळजवळ 15 पदे रिक्त असणे, गेल्या 29 वर्षापासून अनेक अधिव्याख्याते पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असणे, नियमानुसार 12 वर्षाच्या सेवेनंतर त्यांना पदोन्नत करणे गरजेचे असताना याबाबत शासन गंभीर नसणे, परिणामी शासनाच्या दुर्लक्षामुळे या महाविद्यालयात शिक्षण घेणारे व शिक्षण घेऊन झालेले अनेक विद्यार्थी, कलावंत यांना मार्गदर्शन मिळत नसल्यामुळे त्यांच्या कलागुणांचे झालेले नुकसान, उक्त कला संचालनालयांतर्गत असलेली सर्व पदे तत्काळ भरण्याबाबत मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे".

मी स्वत: जे.जे.स्कूल ऑफ आर्टस्मध्ये गेलो होतो. ही अत्यंत नावाजलेली संस्था आहे. मुंबईची शान असे या संस्थेला एकेकाळी मानले जात होते. आता त्या ठिकाणी जे काही 60-70 टक्के प्राध्यापक शिकविण्यासाठी आहेत ते सर्व कॉण्ट्रॅक्टवर आहेत. कोणीही कायम नाही. या कॉलेजची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. याबाबतीत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

**पृ. शी./मु. शी.** : मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत श्री.ख्वाजा बेग, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"राज्यातील मुस्लिम, बौद्ध, शिख, पारसी, ख्रिश्चन या अल्पसंख्याक समाजाचा विकास व्हावा यासाठी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येणे, तसेच या महामंडळाचे तब्बल 500 कोटी रुपयाचे भागभांडवल असून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या महामंडळाची 30 कार्यालये आहेत. एका कार्यालयात किमान 7 कर्मचाऱ्यांची आवश्यकता असताना यवतमाळ जिल्हयात मंडळासाठी 1 कर्मचारी कार्यरत असणे, तसेच या महामंडळाच्या मुख्य कार्यालयासाठी 40 कर्मचाऱ्यांची आवश्यकता असताना कार्यालयाचा कारभार केवळ 17 कर्मचारी करीत असल्यामुळे सदर महामंडळातील सर्व पदे पूर्ण क्षमतेने भरण्यात यावी अशी आग्रहाची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील बंद पडलेल्या लॉईड मेटल व अन्य कंपन्या सुरु करण्याबाबत श्री. प्रकाश गजभिये,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"चंद्रपूर जिल्ह्यात लोखंडावर आधारित लॉईड मेटल, बी.एस इस्पात, गुप्ता मेटॅलिक, ग्रेस मेटॅलिक, सिद्धबली इस्पात, भूपानी आयर्न ॲण्ड पावॅर इंडिया प्रा.लि., चमन मेटॅलिक, राजूरी स्टील, पृथ्वी इंडस्ट्रीज, ग्रेटा इंडिस्ट्रीज इत्यादी सुमारे 10 कंपन्या गत 11 वर्षापासून सुरु होत्या. या कंपन्या सद्य:स्थितीत बंद आहेत. याकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने सुमारे 10 हजार लोक बेरोजगार झालेले आहेत. हा माननीय वित्त मंत्र्यांचा जिल्हा असल्यामुळे या बंद पडलेल्या कंपन्यांकडे जातीने लक्ष देऊन त्या सुरु होण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करावेत अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) S-5

MSS/ ST/ पूर्वी श्री. रोझेकर 14:00

**पृ. शी./मु. शी.** : म्हाडा व खाजगी जमीन मालक यांच्या घरांच्या संयुक्त

प्रकल्पास मान्यता मिळण्याबाबत श्री.अनिल भोसले,वि. प. स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या (म्हाडा) घरांच्या पुनर्विकासासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफएसआय) म्हाडा व खाजगी जमीन मालक यांच्यातील संयुक्त प्रकल्पाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे अडीच वर्षे पडून असणे, या प्रस्तावास मान्यता मिळाल्यास पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये 50 ते 60 हजार सदनिका तयार होऊन सर्वसामान्यांना कमी दरात घरे मिळू शकणे, राज्याच्या नगररचना विभाग व गृहनिर्माण विभागाने या प्रस्तावाला मान्यता दिलेली असणे, मात्र अद्याप या सुधारित प्रस्तावावर राज्य सरकारने निर्णय न घेणे, यामुळे गरीब घटकांतील सर्वसामान्यांना कमी दरात मिळणाऱ्या घरापासून ते वंचित राहणे, संयुक्त प्रकल्पाच्या प्रस्तावाला राज्य सरकारने तातडीने मान्यता देण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

---

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) S-6

MSS/ ST/ पूर्वी श्री. रोझेकर 14:00

**पृ.शी./मु.शी.**: विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. हेमंत टकले (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, (1) श्री.पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्र" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा. हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तींमुळे बहुजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण,

(2) सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. भाई जगताप व इतर सन्माननीय सदस्यांनी श्री. निखिल वागळे, संपादक, आय.बी.एन. लोकमत व श्री. राजीव खांडेकर, संपादक, ए.बी.पी. माझा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

उपरोक्त दोन्ही प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम 178 (1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी देखील बुलढाणा एस.पी.विरुध्द विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव दिलेला आहे. अद्यापि त्यासंदर्भात कार्यवाही सुरु झालेली नाही. ते प्रकरण तातडीने निकालात काढावे.

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.45 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.09 ते 2.45 मध्यंतर)

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**अशासकीय कामकाज (विधेयके)**

**पृ. शी.** : ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक.

**मु. शी.** :

L.C. BILL NO. XI OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.)

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 11 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प. वि. क्रमांक -11 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक

**मु. शी.** :

L.C. BILL NO. XII OF 2014

( A BILL TO PROHIBIT EVE-TEASING AND TO PROVIDE FOR CERTAIN OTHER MATTERS CONNECTED THEREWITH.)

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 12 स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करणे व त्यांच्याशी संबंधित विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प. वि. क्रमांक -12 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----------

नंतर यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XIII OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE SEEDS ACT, 1966 IN IT'S APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 13 - बियाणे अधिनियम, 1966 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 13 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

2............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक

L.C. BILL NO. XIV OF 2014

( A BILL TO PROVIDE FOR PAYMENT OF PENSION TO AGRICULTURISTS, ARTISANS AND LANDLESS LABOURERS IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 14, - महाराष्ट्र राज्यातील शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 14 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C. BILLL NO. XV OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE PRISONS ACT, 1894 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 15 - कारागृहे अधिनियम, 1984 हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 15 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बेकारी निर्मुलन विधेयक

L.C. BILL NO. XVI OF 2014

(A BILL TO PROVIDE FOR SCHEME FOR ERADICATION OF UNEMPLOYMENT FROM THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 16 - महाराष्ट्र राज्यातील बेकारीचे निर्मूलन करण्यासाठी योजनेची तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 16 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-------------------

..........5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : दारुबंदी (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XVII OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROHIBITION ACT, 1949.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 17 - मुंबई दारुबंदी अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 17 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-------------

..........6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XVIII OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE HINDU MINORITY AND GUARDIANSHIP ACT, 1956 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 18 - हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, 1956 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 18 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----------------

........7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक

L.C. BILL NO. XIX OF 2014

( A BILL TO PROVIDE FOR PROHIBITION OF ADVERTISEMENTS AND HOARDINGS WHICH TEND TO INSTIGATE VIOLENCE OR SEXUAL OFFENCES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 19 - महाराष्ट्र राज्यात हिंसाचारास व लैंगिक अपराधास प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 19 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : भ्रष्टाचार प्रतिबंधक (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XX OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF CORRUPTION ACT, 1988, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 20 - भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 20 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----------------

........9

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XXI OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GUNTHEWARI DEVELOPMENTS (REGULARISATION, UPGRADATION AND CONTROL) ACT, 2001.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 21 - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, 2001 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 21 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

------------

...........10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XXII OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973, IN ITS APPLICATIONN TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 22 - फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 ही महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 22 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-------------

........11

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन)
(महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XXIII OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE CHILD LABOUR (PROHIBITION AND REGULATION) ACT, 1986, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 23 - बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, 1986 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अमरसिंह पंडित : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 23 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----------------

..........12

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष

**मु.शी.**: विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष या विषयावर सर्वश्री सुनिल तटकरे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, जनार्दन चांदूरकर, धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेंद्र जैन, संजय दत्त, किरण पावसकर, अनंतराव गाडगीळ, प्रकाश गजभिये, रामहरी रुपनवर, ख्वाजा बेग, जोगेंद्र कवाडे, अनिल तटकरे, हरिसिंग राठोड, संदिप बाजोरिया, चंद्रकांत रघुवंशी, ॲड. हुस्नबानू खलिफे, सर्वश्री शरद रणपिसे, आनंदराव पाटील वि.प.स. यांचा म. वि. प. नियम 260 अन्वये प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु ........

श्री. माणिकराव ठाकरे : महोदय, सभागृहात कालपासून विदर्भाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. आता या चर्चेला सुरुवात होत आहे पण सभागृहात विदर्भाशी संबंधित एकही मंत्री उपस्थित नाहीत, किमान महसूल मंत्र्यांनी तरी उपस्थित राहणे आवश्यक आहे. मंत्री उपस्थित नसताना चर्चा करणे योग्य नाही. मंत्री महोदयांना देखील किती गांभीर्य आहे हे दिसून येते.

श्री. हेमंत टकले : महोदय, सभागृहात अत्यंत महत्वाची चर्चा ही विदर्भाशी संबंधित असून अपेक्षा इतकीच आहे की ज्यांना निर्णय घ्यावयाचा आहे निदान ते मंत्री महोदय तरी उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा या चर्चेला काहीच महत्व नाही तसेच सत्तारुढ पक्षाकडून उदासीनता दाखविली जाते की काय अशी शंका येते. म्हणून माझी विनंती आहे की, सभागृहाची बैठक किमान 10 मिनिटांसाठी स्थगित करावी.

डॉ. दीपक सावंत : महोदय, कॅबिनेट मंत्री म्हणून मी आणि माननीय श्री. गिरीष बापट हे देखील उपस्थित आहेत. तसेच मी सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे लिहून घेतो आणि सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार विदर्भाशी संबंधित मंत्री महोदयांना उपस्थित राहण्यासाठी निरोप पाठवितो, आपण चर्चा सुरु ठेवावी.

**उप सभापती** : आपण मुद्दे लिहून घेऊ शकता त्याबद्दल वाद नाही पण या विषयाच्या बाबतीत सभागृहाच्या बाहेरही जनतेच्या भावना तीव्र असल्याने सभागृहाबद्दल गैरसमज होऊ नये. एक सद्‌भावनेने विदर्भातील कोणत्याही एका मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित रहावे अशी विनंती करतो आणि सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 2.53 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली )

-------------

व्ही-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयवंतराव जाधव)**

**अशासकीय कामकाज घेण्याबाबत पॉईंट ऑफ प्रोसिजर**

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये मध्यंतरानंतर शासकीय कामकाज दाखविण्यात आले आहे व त्यानंतर अशासकीय कामकाज दाखविण्यात आले आहे. मध्यंतरानंतर सभागृहाचे कामकाज सुरू झाल्यानंतर अशासकीय विधेयक पुर:स्थापनार्थ घेण्यात आली. त्यानंतर अशासकीय विधेयके विचारार्थ होती. ती आपण का घेतली नाहीत हे कळलेले नाही. अशासकीय विधेयक पुर:स्थापनार्थ झाल्यानंतर आपण पुन्हा मागे गेला व नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला सुरुवात केली. तेव्हा अशासकीय विधेयक विचारार्थ आहेत त्याचे काय झाले, ती चर्चसाठी कधी घेण्यात येणार आहेत, ती चर्चेसाठी घेण्यात येणार असल्यास कधी घेण्यात येणार आहेत याबाबत आपण सभागृहाला अवगत करावे. आपण अर्धे अशासकीय कामकाज घेतलेले आहे. आपण कामकाजपत्रिकेच्या विरोधात जाऊन सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात केली आहे. अशासकीय कामकाज कधी होणार आहे याची आपण घोषणा केली असती तर बरे झाले असते.

**तालिका सभापती** : आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला सुरुवात होत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये मध्यंतरानंतर शासकीय कामकाज दाखविण्यात आले असून त्यानंतर अशासकीय कामकाज आहे. अशासकीय कामकाजासाठी आवश्यक ते माननीय मंत्री देखील सभागृहामध्ये येऊन बसले होते. अचानकपणे विदर्भाच्या विषयासंबंधातील नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव घेतला आणि सभागृहाचे कामकाज माननीय मंत्री नाहीत म्हणून स्थगित केले. असे करून कसे चालेल ? सभागृहाचे कामकाज हे कुठल्या नियमाने चालते. कार्यक्रमपत्रिकेमध्ये विषय नसला तरी तो आपण घेत आहोत, मी विदर्भातील मंत्र्यांना बोलवायला पाठवतो, असे आपण म्हटले पाहिजे होते. मग ते कामकाज सुरू

...2

श्री.विनोद तावडे...

करण्यास काहीही हरकत नव्हती. माननीय पीठासीन अधिकारी कार्यक्रम पत्रिकेमध्ये बदल करू शकतात हे मला मान्य आहे. एका महत्त्वाच्या विषयावर ज्येष्ठ नेते बोलत असतील तेव्हा कामकाजाचा क्रम बदलतो हे मला मान्य आहे आणि तसे करण्यास काहीही हरकत नाही. पण क्रम बदलल्यानंतर अमुक विभागाचे मंत्री नाहीत म्हणून कामकाज स्थगित करणे हे अन्यायकारक आहे. तसे आपण करूनका एवढीच आमची विनंती आहे. बाकी जेवढे आवश्यक आहे तेवढे आपण करावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विदर्भाच्या विषयावर आज चर्चा होणार हे सर्वश्रूत होते. माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांसमवेत जी काही चर्चा झाली त्यावेळी ही चर्चा आज घ्यावी असे ठरले. मंत्रिमंडळामध्ये विदर्भातील 5 मंत्री आहेत. त्यापैकी एकही माननीय मंत्री सदनामध्ये उपस्थित नव्हते हे विदर्भाचे दुर्दैव आहे.

**तालिका सभापती** : आता आपण नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरू करावी.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष

**मु.शी.**: विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष या विषयावर सर्वश्री.सुनिल तटकरे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, जनार्दन चांदूरकर, धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेंद्र जैन, संजय दत्त, किरण पावसकर, अनंतराव गाडगीळ, प्रकाश गजभिये, रामहरी रुपनवर, ख्वाजा बेग, जोगेंद्र कवाडे, अनिल तटकरे, हरिसिंग राठोड, संदिप बाजोरिया, चंद्रकांत रघुवंशी, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. शरद रणपिसे, आनंदराव पाटील वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरू.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विदर्भातील अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा होत आहे. त्यावर बोलण्याकरिता मी काल सुरुवात केली होती आणि त्या चर्चेवर बोलण्यासाठी मी पुन्हा उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये अधिवेशन होत असताना विदर्भाच्या विकासाच्या दृष्टीने ज्या ज्या समस्या आहेत त्यावर चर्चा व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. माननीय मुख्यमंत्री हे विदर्भाचे असून गेल्या अनेक वर्षांपासून ते विधिमंडळाचे सदस्य आहेत. माननीय मुख्यमंत्री विधिमंडळाचे सदस्य असल्यापासून सातत्याने विदर्भाच्या विकासाच्या चर्चेमध्ये भाग घेत आले असून अशा चर्चेच्या निमित्ताने त्यांनी काही सूचना देखील केल्या आहेत. विदर्भाच्या समस्या सोडविण्यासाठी, विदर्भाच्या विकासाच्या दृष्टीने कोणकोणती पावले कशा प्रकारे उचलणार आहेत याची माहिती विदर्भातील जनतेला व्हावी या दृष्टिकोनातूनच ही महत्त्वाची चर्चा आज उपस्थित करण्यात आलेली आहे.

संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर विभागीय असमोल निश्चित करण्यासाठी दांडेकर समितीची स्थापन करण्यात आली. या समितीने विदर्भासह अन्य भागांचा अनुशेष दूर करण्यासाठी उपाययोजना सुचवाव्यात अशी सूचना करण्यात आली होती. त्यानुसार राज्यातील एकूण बजेट पैकी 85 टक्के तरतूद विदर्भ आणि मराठवाड्याकरिता करावी व 15 टक्के तरतूद इतर भागासाठी असावी अशी सूचना केली होती.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .......

जेणेकरुन विदर्भाचा अनुशेष हळूहळू संपुष्टात येईल. कारण आता या सरकारने समान विकासाचे धोरण अंगीकारलेले आहे. त्या धोरणाप्रमाणे आपण पुढे जाऊ या. पूर्वी समान विकास धोरणाच्या माध्यमातून जो निधी मिळावयास पाहिजे होता तो मिळत नसल्यामुळे अनुशेष समजण्यासाठी दांडेकर समिती अस्तित्वात आली. या विषयाच्या संदर्भात चर्चा होऊन निर्णय झाला आहे. जर या देशातील एखादा भाग अविकसित राहिला असेल तर त्या भागाचा विकास करण्यासाठी राष्ट्रपती घटनेच्या 371 (2) नुसार डायरेक्शन देऊ शकतात. यासंदर्भात विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व आमदारांचे एकमत झाले आणि त्यावेळेला राष्ट्रपती महोदयांकडे सदनाचा ठराव एकमताने मंजूर करुन पाठवला. तद्नंतर अविकसित मराठवाडा व विदर्भासाठी राष्ट्रपती महोदयांनी 371/2 कलम लावावे असा ठराव पाठविल्यानंतर जवळ जवळ 10 वर्षानंतर राष्ट्रपती महोदयांनी या ठरावाला मंजूरी दिली. राष्ट्रपती महोदयांनी या भागाचा विकास करण्याची जबाबदारी दि. 9 मार्च 1994 राज्यपाल महोदयाकडे सोपवली. 1994 रोजी दांडेकर समितीच्या माध्यमातून जो बॅकलॉग काढण्यात आला होता तो व्यवस्थित काढला नसून दांडेकर समितीने काढलेल्या बॅकलॉगपेक्षा मोठया प्रमाणात प्रत्यक्षात बॅकलॉग असल्यामुळे विधर्भातील सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला होता. विदर्भाचा आर्थिक आणि भौतिक बॅकलॉग काढण्यासाठी 1994 रोजी अनुशेष निर्देशांक समितीची स्थापना करण्यात आली. अनुशेष निर्देशांक समितीचा रिपोर्ट राज्यपाल महोदयांकडे गेल्यानंतर या रिपोर्टला राज्यपाल महोदयांनी तसेच कॅबिनेटने सुध्दा मान्यता दिली. त्यानंतर सन 2000 सालामध्ये विदर्भाचा बॅकलॉग भरण्याची सुरुवात झाली. सिंचनाच्या संदर्भात विदर्भात फार मोठा बॅकलॉग असल्याचे महाराष्ट्रातील जनतेला दिसून आले. या विषयाच्या संदर्भातील उल्लेख मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी अनेक वेळा केलेला आहे. 11 लाख हेक्टर इतका विदर्भामध्ये सिंचनाचा बॅकलॉग असून मराठवाडा आणि इतर भागाचाही त्यामध्ये बॅकलॉग होता. बॅकलॉग काढण्याच्या संदर्भात अनुशेष निर्देशांक समितीने दोन पध्दतीने

श्री. माणिकराव ठाकरे .......

बॅकलॉग काढण्यास सुरुवात केली त्यावेळी 1994 मध्ये एक हेक्टरला सिंचनासाठी 50 हजार रुपये लागतील असा आधार घेऊन बॅकलॉग काढण्यात आला होता. परंतु हा बॅकलॉग भरुन सारखा वाढत गेला. नंतर विचार करण्यात आला की, अशा पध्दतीने बॅकलॉग काढला तर बॅकलॉग निघालेला दिसेल परंतु प्रत्यक्षात सिंचन कोठेही दिसणार नाही. जोपर्यंत भौतिक आधार धरत नाही तोपर्यंत वास्तव चित्र उभे राहू शकणार नाही. भौतिक आधारानुसार 11 लाख हेक्टरचा बॅकलॉग काढत असताना अगोदर एका हेक्टर सिंचनासाठी 50 हजार रुपये धरण्यात आले होते ती किंमत एका हेक्टरला 3 लाख रुपये झाली. त्यामुळे 3 लाखा प्रमाणे 11 लाख हेक्टरचा बॅकलॉग काढावयाचा म्हटले तर सात लाख कोटी रुपये बॅकलॉग काढण्यासाठी खर्च येईल व हा पैसा तिजोरीतून कसा आणावयाचा हा प्रश्न होता. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सुध्दा बॅकलॉग काढण्यासाठी सात लाख कोटी रुपये खर्च येईल असा उल्लेख केला होता. त्यावेळेस विदर्भाच्या बॅकलॉगची हेक्टरी किंमत 3 लाख रुपये धरण्यात आली होती परंतु आता त्यामध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. आता कशा प्रकारे बॅकलॉग काढला जाईल यासंदर्भातील उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनाला देणे आवश्यक आहे. सिंचनाच्या संदर्भात विदर्भ खूप मागे आहे. विदर्भामध्ये सिंचनाचे प्रकल्प आहेत परंतु कॅनॉल झाले नाहीत. विदर्भातील अनेक प्रकल्प पूर्णत्वाला आले आहेत परंतु त्यांना निधी न मिळाल्यामुळे प्रकल्प पूर्ण होऊ शकले नाहीत. काही प्रकल्पांना मदत मिळते आहे परंतु वन जमिनीच्या अडचणीमुळे प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाही अशा वेगवेगळया कारणाने विदर्भातील प्रकल्प खोळंबलेले आहेत. त्यामुळे विदर्भातील प्रकल्प पूर्ण होण्यासाठी वन विभागाचे प्रश्न असतील, प्रकल्पांना दर वर्षी किती पैसा देऊ शकतो, या प्रकल्पांना लागणाऱ्या पैशासाठी शासन कर्ज काढून, रोखे काढून पैसा उभारणार आहे काय यासंदर्भातील माहिती या सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील बऱ्याच प्रकल्पामध्ये पाणी साचलेले आहे परंतु सिचंन होत नाही त्यासंदर्भात शासनाने वेगळा प्रोग्राम हातामध्ये घेण्याची आवश्यकता आहे. अमरावती येथे सोफिया पॉवर प्रोजेक्ट येऊ नये अशी या ठिकाणच्या शेतकऱ्यांची

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .......

मागणी होती. अप्पर वर्धा सिंचन प्रकल्पाचे पाणी कॅनॉलच्या मार्फत शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत येण्यास सुरुवातही झाली होती. परंतु सोफिया प्रकल्पामुळे अमरावती,चांदूर रेल्वे, धामणगाव या ठिकाणी येणारे पाणी थांबले गेले. या भागाला आपण वेगळी व्यवस्था कशा प्रकारे करणार आहोत यासंदर्भातील उत्तर या ठिकाणी मिळण्याची आवश्यकता आहे. त्यावेळी आताचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते की, "जर या शेतकऱ्यांचे पाणी आपण पळवणार असू तर या ठिकाणच्या शेतकऱ्यांकडे आत्महत्येशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहणार नाही" अशा प्रकारचा प्रखर विरोध त्यावेळी त्यांनी केला होता.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

या संदर्भात त्यांची काय प्रतिक्रिया आहे हे सदनाला जाणून घ्यायचे आहे. त्या भागामध्ये कुठे सिंचनाचा पर्याय असेल तर आपणास ती व्यवस्था उभी करावी लागेल किंवा आपणास तसे धोरण ठरवावे लागेल. पॉवर प्रोजेक्टला मोठ्या प्रमाणावर पाणी दिल्यामुळे शेतकरी पाण्यापासून वंचित राहतात. तेव्हा त्यांना कशाप्रकारे सिंचन व्यवस्था उपलब्ध करून देऊ शकतो याबाबत धोरण ठरवावे लागेल. आज मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जात आहे, ते पाणी अडविले पाहिजे.

सभापती महोदय, कालव्याद्वारे किती पाणी द्यायचे याचा आपणास विचार करावा लागणार आहे. आज विदर्भात सूक्ष्म सिंचनाद्वारे शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचविण्याचा व्यापक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावा लागणार आहे. आपण कालव्याद्वारे एका मर्यादेपर्यंत पाणी देऊ शकतो. आज विदर्भामध्ये जे काही पाण्याचे साठे उपलब्ध आहेत त्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी आणि शेतीसाठी होतो. विदर्भामध्ये 56-57 लाख हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी जवळपास 35 लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे उर्वरित क्षेत्रासाठी आपण कशाप्रकारे व्यवस्था करणार आहात हा प्रश्न आपल्यासमोर आहे. आपण शेतकऱ्यांना पाणी उलपब्ध करून दिले नाही तर शेतकऱ्यांना शेती सोडून द्यावी लागेल किंवा त्यांना स्थलांतर करावे लागेल. आज नगर आणि मराठवाडा विभागामध्ये पाण्यासाठी जो वाद होत आहे तशा प्रकारचा वाद विदर्भातील प्रत्येक गावागावामध्ये झाल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा या संदर्भात सरकारने आजच निर्णय घेणे आवश्यक आहे. सूक्ष्म सिंचनाचा वापर मोठ्या प्रमाणात झाला पाहिजे. माननीय महसूल मंत्री महोदयांनी सूक्ष्म सिंचनांच्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येईल असा उल्लेख केला होता. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून ते धोरण म्हणून आणण्यात येईल, जर कोणी प्रकल्प घेत असतील तर त्यांना धरणाच्या साठ्यामधून जास्तीचा साठा उचलण्याचा परवाना देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले हाते. आज सहा टक्के पाणी मिळत आहे. मागच्या सरकारने 12 टक्क्यांचा जी.आर.काढला होता. तेव्हा या गोष्टीस प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आमच्या भागात बेंबळा प्रकल्प आहे. त्या प्रकल्पामध्ये टेहणी गाव आहे. ज्या भागामध्ये पाऊस पडत नाही त्या भागासाठी टेहणी प्रकल्पाच्या माध्यमातून 12-15 गावांना ठिबकद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. धरणातून 12 टक्के पाणी उचलून ते गावातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

लोकांना द्यायचे असा तो प्रकल्प आहे. 25 हजार एकराचा हा प्रकल्प आहे. एकाच ठिकाणी पपिंगद्वारे पाणी उचलून प्रत्येकाच्या शेतामध्ये पाणी पोहोचविले जाते. शेतकरी कोणते पीक घेणार आहे, त्यासाठी किती पाणी लागणार आहे ही सर्व व्यवस्था कम्प्युटराईज करण्याचा प्रयत्न केलेला आहे. एखाद्या शेतकऱ्याला पाण्याची आवश्यकता नसेल तर त्या शेतकऱ्याचे पाणी बंद करायचे, एखाद्या पिकाला जास्त पाणी लागत असेल किंवा एखाद्या पिकाला कमी पाणी लागत असेल तर तेवढेच पाणी सोडायचे असा हा एक चांगला प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. आपण हा पायलट प्रोजेक्ट म्हणून घेतला आणि महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात असा प्रकल्प राबवून पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न केल्यास विदर्भातील सर्व जमीन ओलिताखाली येईल. आपण या पद्धतीद्वारे विदर्भातील जास्तीत जास्त जमिनीला पाणी देऊ शकतो. तेव्हा अशाप्रकारचा वेगळा विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, लोअर वैनगंगा हा मोठा प्रकल्प आहे. विदर्भात गोसीखुर्द प्रकल्पानंतर लोअर वैनगंगा प्रकल्पाचा नंबर लागतो. लोअर वैनगंगेचा प्रकल्प जवळ जवळ मान्य झालेला आहे, परंतु मुख्यमंत्री महोदयानी घेतलेल्या बैठकीत काही सदस्यांची मतमतांतरे मांडली. लोअर वैनगंगा प्रकल्पामध्ये अत्यंत कमी किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साठा होणार आहे. या पाण्यातून 200 ते 300 गावांना ड्रीपद्वारे पाणी पुरवठा करण्याची देखील योजना आहे. या प्रकल्पातील काही पाणी आंध्रप्रदेशला जाणार आहे. तेव्हा लोअर वैनगंगा प्रकल्प हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित झाला तर आपणास केंद्र सरकारकडून आर्थिक मदत मिळेल. आज राज्यात गोसीखुर्द प्रकल्पानंतर दुसरा राष्ट्रीय प्रकल्प नाही. आपण या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध करुन घेतला तर राज्य शासनावरील खर्चाचा भार कमी होईल व प्रकल्प लवकर पूर्ण होईल. या प्रकल्पाच्या बाबतीत काहींनी सांगितले की, बॅरेजेस बांधा, प्रकल्प करु नका. या संदर्भात वेगवेगळी मते आहेत, त्याला देखील काही कारण आहेत. या प्रकल्पामध्ये आमची मोठ्या प्रमाणावर जमीन जात असताना आपण हा प्रकल्प कसा काय करीत आहात असे प्रश्न विचारण्यात येत आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, विदर्भातील पुनर्वसनाचे प्रश्न अजून सुटलेले नाहीत. त्यासाठी त्यांना मोर्चे काढावे लागत आहेत. शेतकऱ्यांनी जमिनी उपलब्ध करुन दिल्या नसत्या तर ते प्रकल्प झाले नसते. विदर्भामध्ये जे पाण्याचे साठे आहेत त्याचा संचय करुन ठेवण्याची गरज आहे. आज विदर्भातील शेतकऱ्यांकडून पाण्याची मागणी होत आहे. पुढील काळात पाण्यासाठी मोर्चे आल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, आमच्याकडे बेंबळा प्रकल्प झाला पण त्याच्या कालव्याचे काम झाले नसल्यामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. 15 वर्षापूर्वी अरुणावतीचा प्रकल्प पूर्ण झाला, परंतु त्यास कालवे काढलेले नाहीत, पाटचाऱ्या काढलेल्या नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचू शकत नाही. गोसीखुर्द प्रकल्पात बाधित झालेल्यांचे अजून पुनर्वसन झालेले नाही. त्यांचे पुनर्वसन झााल्याशिवाय तो प्रकल्प पूर्ण करता येणार नाही. त्याच्या कालव्याची काय व्यवस्था केलेली आहे, आपण टेलपर्यंत किती दिवसांत पाणी देऊ शकू या सर्व गोष्टींचें नियोजन करण्याची आवश्यकता आहे. आपण प्रकल्प उभे करताना ज्या ठिकाणी पाणी साठे आहेत त्याचा देखील योग्य प्रकारे वापर करणे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री विदर्भातील असल्यामुळे त्यांच्याकडून विदर्भातील जनतेच्या काही अपेक्षा आहेत. आपल्याकडे निधी मर्यादित स्वरुपात आहे. पाण्याचे साठे उपलब्ध आहेत त्याचा योग्य प्रकारे वापर करायचा आहे. प्रकल्प पूर्ण आहेत परंतु कालव्याची कामे अपूर्ण आहेत, ही कामे लवकर पूर्ण करण्यात यावीत. ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे तेथे कशाप्रकारे पाणी उपलब्ध करुन देता येईल याचा विचार केला पाहिजे. मग जीगावचा प्रकल्प असेल, अरुणावतीचा प्रकल्प असेल, गोसीखुर्द प्रकल्प असेल, बेंबळा प्रकल्प असेल, लोअर वैनगंगा प्रकल्प असेल हे सर्व प्रकल्प लवकर पूर्ण केले पाहिजेत. विदर्भात मोठ्या प्रमाणावर मध्यम प्रकल्प आहेत. आपणास मध्यम प्रकल्पाकडे लक्ष देण्याची गरज आहे, त्यातील पाणी साठा ठरवून देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

महोदय, कॅनॉल दुरूस्तीसाठी येणाऱ्या पैशामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. कॅनॉल दुरूस्तीसाठी पाठविलेला पैसा दुरूस्तीच्याच कामावर खर्च होतो काय, हे पहावे लागेल. जलसंपदा विभागात सर्वात जास्त भ्रष्टाचार कोणत्या बाबतीत होत असेल तर तो कॅनॉल दुरूस्तीच्या कामात होतो. कॅनॉल दुरूस्तीसाठी दरवर्षी निधी पाठविला जातो. अधिकारी आणि ठेकेदारांना माहीत असते की, शेतकरी कोणत्या भागातून पाणी घेणार नाही. ते त्या कॅनॉलची दुरूस्ती करीत नाही. पावसाळ्यामध्ये पाऊस पडला आणि त्या कॅनॉलमधून पाणी वाहायला लागले तर लोकांना वाटते की, त्या कॅनॉलची दुरूस्ती झाली आहे. अशाप्रकारचे प्रत्येक कॅनॉलच्या दुरूस्तीच्या कामातून दोन-तीन कोटी रूपयांचा भ्रष्टाचार केला जातो. जे ठेकेदार अशा प्रकारचा भ्रष्टाचार करतात त्यांना सोबत घेऊन काम करण्याची अधिकाऱ्यांची मानसिकता झाली आहे.

महोदय, आमच्या भागातील अरूणावती प्रकल्पाच्या कॅनॉल दुरूस्तीसाठी गेल्या 5-10 वर्षात किती निधी आला आणि प्रत्यक्षात तो निधी कोणकोणत्या कामांवर खर्च झाला हे समजणे गरजेचे आहे. माझ्या माहितीनुसार मुख्य कॅनॉलमध्ये मोठमोठी झाडे उभी राहिलेली आहेत. 10-20-50 वर्षांपासून ती झाडे उभी असतील तर त्या कॅनॉलची दुरूस्ती झाली असे वक्तव्य करणेच मुळात चुकीचे आहे. त्यामुळे कॅनॉल दुरूस्तीवर केलेल्या खर्चाचा आढावा घेण्यासाठी खोलवर चौकशी करण्याची गरज आहे. जलसंपदा विभागात कोणकोणत्या ठिकाणी भ्रष्टाचार होतो हे शोधून काढले पाहिजे आणि अशा प्रकारचा भ्रष्टाचार करण्याची ठेकेदाराची हिंमत होऊ नये या बाबतीत शासनाने पावले उचलली पाहिजेत, या बद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. कारण सिंचन हा भविष्याचा प्रश्न आहे. साठवलेल्या पाण्यातील थेंब थेंब शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे या दृष्टिकोनातून प्रकल्प केले जातात. त्यामुळे त्या प्रकल्पाचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे, असा दृष्टिकोन या नवीन सरकारचा असणे आवश्यक आहे.

महोदय, मी विजेच्या बाबतीत सांगतो. विजेशिवाय कोणताच विकास होऊ शकणार नाही. शेतकऱ्यांना विहिरीतून पाणी घ्यायचे असेल तर ते विजेशिवाय घेता येत नाही, नवीन उद्योग विजेशिवाय सुरु करता येत नाही. त्यामुळे वीज निर्मिती करून ती लोकांपर्यंत पोहचविली पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

शिवाय विजेचे दर अधिक न ठेवता मुबलक वीज उपलब्ध करुन देणे हे अत्यंत महत्त्वाचे काम शासनाच्या माध्यमातून झाले पाहिजे. महोदय, आपल्या राज्यात वीज निर्मिती किती होते ? राज्यात जेवढी वीज निर्माण होते, त्यापैकी 50-55 टक्के वीज एकट्या विदर्भात निर्माण होते. परंतु त्या तुलनेत विदर्भातील लोकांना फायदा मिळत नाही. ज्या भागात वीज प्रकल्प आहेत त्या भागात जाऊन बघितले तर दिसून येईल की, त्या प्रकल्पाचा तेथील जनतेला काहीच फायदा होत नाही. या प्रकल्पामुळे त्या भागात राख पसरलेली आहे. त्या प्रकल्पामध्ये स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळतो असेही नाही. कोळसा वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे त्या परिसरातील रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. महोदय, वनी परशरा खाणीचे दृश्य पाहिले तर, कोळसा घेऊन जाणाऱ्या ट्रॉलीमुळे त्या भागातील रस्तेच नव्हे तर जनजीवन खराब झाले आहे. त्या परिसरातील कोणत्याही गावात चांगल्या प्रकारचे रस्ते असतील अशी परिस्थिती नाही. त्या परिसरात राहणारी व्यक्ती रात्री झोपली आणि सकाळी उठली तर आपल्या घराच्या मागे कशाचा पहाड उभा राहिला हे त्याला समजत नाही. खाणी खोदल्यानंतर त्या भागात पहाड उभे राहतात. उघड्या खाणीच्या माध्यमातून गावांजवळ पहाड उभे केलेले आहेत. 50-60 चाकांच्या गाड्या सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेल्या रस्त्यावरुन धावायला लागल्या तर त्या रस्त्याची अवस्था काय होईल, याची आपल्याला कल्पना आहे. त्या भागातून वीज निर्मिती प्रकल्पामध्ये कोळसा वाहून नेला जातो. या निमित्ताने माझी मागणी आहे की, त्या भागातील रस्ते खराब होऊ नयेत म्हणून त्या भागात सिमेंट रस्ते किंवा 50-60 चाकाच्या वाहनांतील वजनाला पेलतील असे रस्ते तयार केले तरच त्या भागाला काही प्रमाणात न्याय दिल्यासारखे होईल. नाही तर त्या भागातील रस्ते खराबच होत राहणार, त्या भागातील लोकांना राख चाखायला मिळणार आणि प्रदूषण होत राहणार.

महोदय, आज चंद्रपूरमध्ये प्रदूषणाची जी मर्यादा ठरवून दिलेली आहे त्यापेक्षा जास्त प्रदूषण तेथे होत आहे. ही केवळ चंद्रपूरचीच परिस्थिती नाही तर, सर्वच वीज निर्मिती प्रकल्पाच्या भागातील परिस्थिती आहे. या अनुषंगाने सांगतो की, खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना वीज उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. किंबहुना राज्यातील सर्वच भागातील लोकांना वीज उपलब्ध करुन करुन देण्याची आवश्यकता आहे. उद्योगांना सुध्दा वीज देण्याची गरज आहे. महोदय, विजेच्या बाबतीत

..3..



SJB/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 15:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

मी मागे एक प्रस्ताव मांडला होता. वास्तविक पाहता विजेच्या बाबतीत सर्व राज्यात आणि देशात अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे विजेच्या संदर्भात केंद्र सरकारने 2003 मध्ये असा निर्णय घेतला होता की, आता राज्य सरकारने वीज विभाग आपल्याकडे ठेवता कामा नये, त्याचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. खाजगी व्यवसायिकांना त्यामध्ये आणले पाहिजे. यापूर्वी राज्य सरकारला महाराष्ट्र राज्य वीज मंडळ बरखास्त करावे लागले आणि विविध कंपन्या निर्माण कराव्या लागल्या. त्या अनुषंगाने तीन वीज कंपन्या निर्माण करण्यात आल्या. त्यावेळी माझी मागणी होती की, विदर्भात मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होत असल्यामुळे त्या ठिकाणचे शेतकरी, उद्योजक, घरगुती वीज ग्राहक यांच्या माध्यमातून जी वीज वापरली जाते व त्यातून जो महसूल मिळतो त्याचा शासनावर बोजा पडत नाही. विदर्भात विजेचे जेवढे उत्पादन होते तेवढाच खर्च करावा लागतो. परंतु इतर भागात फार इनबॅलन्स आहे. त्यामुळे त्याचा भार विदर्भावर पडतो. महोदय, ज्या भागात वीज निर्मिती होते त्या भागातील उद्योगधंद्यांना सवलतीच्या दरात वीज दिली पाहिजे. महोदय, विदर्भाचा विकास करायचा असेल तर, विदर्भातील उद्योगांना कमी दराने वीज पुरविली पाहिजे. या भागातील उद्योगांना कमी दराने वीज दिली तर जवळच्या भागातील उद्योग विदर्भाकडे आकर्षित होतील. मागच्या सरकारने घरगुती आणि उद्योगाच्या वीज बिलात 20 टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु नवीन सरकारने त्या सवलतीपोटी 700-800 रुपयांचा भार पडणार असल्यामुळे पूर्वीची सवलत देणार नाही असे ठरविले आहे. त्यामुळे विदर्भातील उद्योगांवर परत एकदा संकट आले आहे. जवळच्या राज्यात उद्योगांसाठी असलेल्या विजेच्या दरापेक्षा विदर्भात जास्त दर आहे. त्यामुळे विदर्भातील उद्योगांना सवलतीत वीज देण्याचा मागच्या सरकारने जो निर्णय घेतला होता, तो नवीन सरकारने सुरु ठेवावा.

महोदय, विदर्भावर चर्चा सुरु असल्यामुळे आपण वारंवार बेल वाजवून मला थांबवू नका, अशी मी विनंती करतो. राज्य सरकारने वीज मंडळ बरखास्त करुन वेगवेगळ्या कंपन्या निर्माण केल्या. या निमित्ताने मी विनंती करतो की, राज्य सरकारने विदर्भासाठी वेगळी वीज कंपनी केली तर या भागातील लोकांना आणि उद्योगांना कमी दराने वीज मिळू शकेल. हे खरे आहे की, वीज कंपन्या कशा स्थापन कराव्यात या बाबतीत बंधन आहे.राज्याच्या प्रत्येक विभागात वीज कंपन्या

..4..



SJB/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 15:30

श्री.माणिकराव ठाकरे....

केल्या तर विदर्भावर मोठ्या प्रमाणावर भार पडणार नाही आणि उद्योगांना स्वस्त दरामध्ये वीज मिळू शकेल. महोदय, वीज बिलामध्ये 20 टक्के सवलत देण्याचा निर्णय मागच्या सरकारने एक वर्षापूर्वीच घेतला होता. तो निर्णय नव्या सरकारने बदलू नये. नाही तर विदर्भातील उद्योजकांवर वीज बिलाचा मोठा भार पडेल. सध्या घरगुती वापराच्या बाबतीत सुध्दा मोठ्या प्रमाणावर वीज बिल येऊ लागले आहे. पूर्वीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर वीज बिल येत आहे. आम्ही लोकांना सांगितले की, हे सरकार सत्तेवर येऊन केवळ एक महिना झाला आहे. त्यामुळे आपण थोडा वेळ वाट बघावी.

नंतर श्री.कांबळे....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

अशा बऱ्याचशा बाबी आहेत, ज्या संदर्भात शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

महाराष्ट्र, विदर्भ यांच्या दृष्टीने उद्योग महत्त्वाचे आहेत. विदर्भात वेगवेगळ्या क्षेत्रात उद्योग आहेत, मग एमआयडीसी असेल किंवा मिहानचा प्रकल्प असेल. मिहानच्या प्रकल्पासाठी जवळजवळ सर्व जमीन शासनाने घेतली आहे. उद्योजक सुध्दा तेथे येण्यास सुरूवात झाली आहे. काही उद्योजक तेथे आले आहेत आणि चांगल्याप्रकारे प्रकल्प सुध्दा उभारले जात आहेत. टाटांचा प्रकल्प 54 एकरांमध्ये असून तो 1-2 महिन्यांत सुरू होण्याची शक्यता आहे. एअर इंडियाचा बोईंगचा प्रकल्प देखील 1-2 महिन्यांत सुरू होण्याची शक्यता आहे. मिहान प्रकल्पात कार्गो हब सुरू झाला पाहिजे. विदर्भाच्याच नव्हे तर आसपासच्या संपूर्ण परिसराच्या आणि महाराष्ट्राच्या, देशाच्या दृष्टीने अत्यंत मध्यभागी असलेला हा प्रकल्प आहे. राज्यातील, विदर्भातील जनतेच्या, शेतकऱ्यांच्या दृष्टीने त्यांचे भविष्य ठरविणारा, औद्योगिक क्षेत्रात संपूर्ण देश पातळीवर अत्यंत महत्वाचा असलेला हा प्रकल्प आहे. आम्ही याकरिता तेथे पहिली धावपट्टी केली. माननीय मंत्र्यांनी या सदर्भात फार चांगल्या पध्दतीने सहकार्य केले. माननीय मंत्र्यांचे सुध्दा या प्रकल्पाकडे लक्ष आहे. त्यामुळे मिहान प्रकल्प तत्काळ होण्याची गरज आहे. जोपर्यंत विदर्भात उद्योग आणत नाही, वेगवेगळ्या ठिकाणी असलेला माल येथे आणत नाही, येथून तो बाहेरच्या देशात पाठवित नाही किंवा हब तयार करीत नाही, त्या कामांना वेग देत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने औद्योगिक क्षेत्रात क्रांती दिसून येणार नाही.

सभापती महोदय, सदर बाबतीत जी काही पुनर्वसनाची कामे असतील, पैशाची नितांत गरज असेल तर त्याची तरतूद असेल या गोष्टी तत्काळ केल्या पहिजेत. माननीय मुख्यमंत्री या सबंधी विशेष लक्ष घालतील, याबद्दल खात्री आहे. विदर्भातील 2-3 गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. विदर्भातील को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल, साखर कारखाने जवळजवळ संपलेले आहेत. विदर्भात 16 साखर कारखाने होते, त्यातील 12 कारखाने खाजगी उद्योजकांना विकण्यात आले आहेत. आता काही 4-5 साखर कारखाने राहिले असतील. शासनाने मदत केली नाही, वेगळ्या पध्दतीने त्याकडे पाहिले नाही तर ते पाचही कारखाने राज्य बँक विक्रीस काढल्याशिवाय राहणार नाही. विदर्भात एक सुध्दा साखर कारखाना शिल्लक राहणार नाही. त्यामुळे कारखानदारीच्या संदर्भात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

कशा पध्दतीने सहकार्य करता येईल, या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे. विदर्भाच्या दृष्टीने टेक्सटाईल महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन कापूस, सोयाबीन, धान आहे. त्यामुळे त्यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी येथे असली पाहिजे. कापसाला योग्य भाव मिळाला पाहिजे. काही दिवसांपूर्वी या संदर्भातील फेडरेशन होते. त्याला वेगळ्या पध्दतीने पुनरूज्जीवित कसे करता येईल, हे पाहिले पाहिजे. कारण कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आधार मिळाल्याशिवाय त्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात आत्महत्या झाल्या आहेत, मग ते बाहेरच्या राज्यातील असो वा आपल्या राज्यातील असो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या कापूस बेल्टमध्ये मोठ्या प्रमाणात झाल्या आहेत, हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे. सोयाबीन उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांवर देखील संकट आले आहे. सोयाबीन उत्पादक शेतकरी देखील कापूस उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणे उद्ध्वस्त झाला आहे. आज आपण मापदंड तयार करीत आहात की, सदर ठिकाणी काय परिस्थिती झाली असेल. राज्यातील, विशेषतः विदर्भ व मराठवाडा येथील शेतकऱ्यांची अवस्था अतिशय वाईट झाली आहे, ते आत्महत्या करण्यासाठी मजबूर झाले आहेत. शेतकऱ्यांच्या व्यथा मोठ्या प्रमाणात कापूस, सोयाबीन यांच्या उत्पादनामध्ये लपल्या आहेत. शासनाने या शेतकऱ्यांना मदत सुध्दा दिलेली नाही. कापूस, सोयाबीन, धान उत्पादक करणारा शेतकरी असेल, तसेच कोरडवाहू शेतकऱ्यांना देखील मदत देण्याची गरज अहे. आपण फक्त काही शेतकऱ्यांना मदत दिली आहे. गारपीटग्रस्त भाग असेल, अवकाळी पाऊस असेल, तेथील शेतकऱ्यांना मदत दिली आहे मग या परिसराला पूर्णपणे का सोडले आहे, हे कळत नाही. संपूर्ण महारष्ट्रातील विशेषतः विदर्भातील उत्पादक हे कापूस, सोयाबीन उत्पादक आहेत, त्यांच्या संदर्भात असे होत असेल तर ते योग्य नाही. आपण त्या संदर्भातही लक्ष देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना आपल्या भागात गारपीट झाल्यामुळे थोडासा दिलासा मिळाला असे वाटले होते. शेतकऱ्यांना आपल्या भागात अवकाळी पाऊस झाला, म्हणून थोडासा दिलासा मिळाला असे वाटले. कापूस व सोयाबीन उत्पादन होणाऱ्या परिसरातील कोरडवाहू शेतकऱ्यांवर कर्ज थकलेली आहेत. शासनाने त्या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी कोणती पावले उचलली आहेत, ते शेतकरी अधिवेशन संपेपर्यंत पाहणार आहेत. मला सर्वांना विनंती करायची आहे की, कोण सत्तेवर आहे, कोण विरोधी पक्षात आहे, हे न पाहता त्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

शेतकऱ्यांना देखील मदत दिली पाहिजे. विदर्भातील, मराठवाड्यातील धान, कापूस, सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्यांवर संकट आले आहे. त्यांना संकटातून बाहेर काढण्याकरिता त्यांचे या वर्षीचे कर्ज पूर्णत: माफ केल्याशिवाय गत्यंतर नाही. अवकाळी पाऊस झालेल्या भागातील शेतकऱ्यांना, गारपीट झालेल्या भागातील शेतकऱ्यांना मदत केली त्याप्रमाणे कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांनाही मदत दिली पाहिजे. शासनाने कोणत्याही प्रकारे यांच्या बाबतीत दुजाभाव करू नये, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, अमरावती, यवतमाळ, अकोला येथील मेडिकल कॉलेजच्या 50 जागा सेंट्रली वाढवून दिल्या आहेत. त्यामुळे त्या संदर्भात काही आर्थिक तरतुदी करण्याची गरज आहे. तसे न केल्यामुळे उच्च न्यायालयाने मुख्य सचिवांना, आरोग्य विभागाच्या सचिवांना, मेडिकल कॉलेज सचिवांना, वित्त विभागाच्या सचिवांना नोटीस काढली आहे आणि विचारले आहे की, तुम्ही या ठिकाणच्या आवश्यक गरजा पूर्ण करणार की नाही, आवश्यक निधीची उपलब्धता करून देणार की नाही ? सदर बाबतीत 7 दिवसांच्या आत कळविण्याच्या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. शासनाने त्याही संदर्भात निर्णय घेण्याची गरज आहे. महाराष्ट्र शासनाने मेडिकल कॉलेजमध्ये डिप्लोमा कोर्सेस सुरू केले आहेत. पण त्यावर नियंत्रण ठेवलेले नाही. त्यामध्ये आरक्षण असले पाहिजे, शासनाचे नियंत्रण असले पाहिजे. आपण असे केले नाही तर खाजगी कॉलेजचे नियंत्रण त्यावर राहील आणि वाटेल तशा जागा भरायच्या, फी घ्यायची असे प्रकार घडण्याची शक्यता आहे. यावर अंकुश असण्याकरिता जागांच्या संदर्भातील आरक्षण निश्चित करून घेतले पाहिजे. सभापती महोदय, असे बरेच विषय आहेत. केळकर समितीचा अहवाल देखील सदनात मांडण्यात येणार आहे. अपेक्षा अशी आहे की, त्या अहवालात विदर्भाच्या विकासाच्या संदर्भात काही पावले उचलण्याच्या संदर्भात सूचना असाव्यात. कारण अहवालाच्या संदर्भात निर्देश देण्याचे अधिकार माननीय राज्यपालांना आहेत की नाहीत, येथपासूनची लढाई न्यायालयापर्यंत गेली. त्यामधून निगेटिव्ह काही येऊ नये आणि आले तरी आम्ही ते कदापि मानणार नाही, हे सुध्दा मी नमूद करू इच्छितो. सभापती महोदय, मला या संदर्भात बोलण्यास वेळ दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी उभी आहे. मी अनुशेषावर बोलणार नाही. आता मी अनुशेषावर बोलून थकले आहे. उरलेले शेष आहे ते आता नवीन सरकारने आम्हाला द्यावे व विदर्भाचा विकास करावा. नवीन शासन आम्हाला देईल, या आशेने मी माझे विचार मांडत आहे. पूर्वी विदर्भ सोन्याची कुऱ्हाड होती. आता मात्र शेतकऱ्यांकडून आत्महत्या होत आहेत. आता दारिद्र्याने ग्रासलेला, आत्महत्याग्रस्त, कर्जबाजारी, कुपोषित म्हणून विदर्भ प्रसिध्द आहे. अशा निरनिराळ्या उपाध्यांनी आता विदर्भाचे नाव घेतले जात आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस........

सभापती महोदय, एकेकाळी मध्य प्रदेशात असलेला वैभवशाली विदर्भ विभाग आज मात्र दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतो आहे, याचे आम्हाला दुःख होत आहे. जेव्हा चांगला पाऊस पडतो तेव्हा कृषी उत्पन्नाचा जीडीपी 4.0 असतो आणि कमी पाऊस पडला की, 1.0 किंवा -2.5 होतो अशी आकडेवारी आम्ही वर्षोनुवर्षे वाचत आलो आहोत. परंतु, कधीही असे दिसले नाही की, पाऊस पडला नाही तरी विदर्भातील शेतकऱ्यांना सिंचनाची व्यवस्था उपलब्ध आहे किंवा उत्पन्नाचे साधन मिळाले आहे. त्यामुळेच शेतकरी कर्जबाजारी होतो आणि त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येते. परंतु, शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा मुख्यत्त्वे करुन आपण त्याच्यासाठी आवश्यक असणारे सिंचन करु शकलो नाही, यामुळे आलेला आहे. आपण आजपर्यंत केवळ तात्पुरत्या मलमपट्टया करण्याच्या उपाययोजनांचा विचार केला आहे. त्यांचे दुःख कायमस्वरुपी निवारणाकरिता आणि त्याला कर्जातून मुक्त करण्याकरिता जे करायला हवे, ते आपण करु शकलेलो नाही.

सभापती महोदय, आज आपण पाहतो की, कृष्णा खोऱ्यातील पाण्यासाठी लोक भांडत आहेत, तापी खोऱ्यासाठी भांडत आहेत. पण लवादाने दिलेले गोदावरी खोऱ्यातील पाणी आम्ही गेल्या 28 ते 30 वर्षात अडवू शकलेलो नाही. या खोऱ्यातील 41 टीएमसी पाणी विदर्भाचे आहे. पण आज ते आंध्र प्रदेश राज्याला जात आहे. त्या राज्यात चेवेला धरण होत आहे, इचमपल्ली धरण होत आहे आणि आमच्यावर मात्र काठावर बसून उपाशी मरण्याची वेळ येत असेल तर हे दिवस आता बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्याला सिंचनाची अत्यंत आवश्यकता आहे. विदर्भात सर्व प्रकारची पिके होतात. केवळ अन्नधान्यच नाही तर ऊस, कापूस यासारखी म्हणाल ती पिके होतात. परंतु, त्या पिकांना, फळबागांना आवश्यक असणारे पाणी मात्र आम्ही देऊ शकत नाही, याचे दुःख आज आम्हाला आहे.

सभापती महोदय, विदर्भात सर्वात मोठ्या नद्या वाहतात. मराठवाड्यात नद्या नसल्यामुळे तेथे आपण पाणी अडवू शकत नाही. विदर्भात मात्र नद्यांचे जाळे आहे. वर्धा, वैनगंगा, पैनगंगा, गोदावरी, इंद्रायणी, प्राणहिता, अशा ज्या भौगोलिक नद्यांचा अभ्यास आपण प्राथमिक शाळेपासून

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस........

करीत आलो आहोत, त्या सर्व नद्या विदर्भात आहेत. परंतु, हे पाणी अडविण्याचे सामर्थ्य आजपर्यंतच्या सरकारमध्ये दिसले नाही. विदर्भाला न्याय देण्याचे धोरणही नव्हते. त्यामुळे नैसर्गिक मुबलकता असूनही आम्ही कर्मदरिद्री राहिलो, असे म्हणण्याची वेळ आमच्यावर आली आहे. परंतु, आता आलेले नवीन सरकार आम्हाला निश्चितपणे न्याय देईल आणि खऱ्या अर्थाने स्वाभिमानाने स्वत:च्या पायावर जगण्याचे बळ आमच्यामध्ये निर्माण करील, असा आम्हाला विश्वास आहे.

सभापती महोदय, विदर्भातील नद्या बारमाही वाहणाऱ्या नाहीत. या नद्या पावसाळ्यात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाहतात, अगदी नद्यांना पूर येतो आणि गावे वाहून जातात. परंतु, पावसाळा संपला रे संपला की मग मात्र पाणी धरून ठेवण्याचे सामर्थ्य येथील दगडांमध्ये नाही. या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात सैल, रेतीचा आणि मुरूमाचा दगड आहे. त्यामुळे पाणी टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य त्या नद्यांमध्ये नाही. म्हणून मी शासनाला अशी विनंती करणार आहे की, विदर्भात बारमाही वाहणाऱ्या नद्या नसल्यामुळे किंवा फक्त पावसाळ्यात वाहणाऱ्या नद्या असल्यामुळे पावसाळ्यानंतरच्या काळासाठी पाण्याचा साठा करून ठेवण्याकरिता तलावाच्या माध्यमातून किंवा बॅरेजेस बांधून वेगळी व्यवस्था केली तर पावसाळा गेल्यानंतर त्या पाण्याचा वापर आम्हाला शेतीसाठी करता येईल.

सभापती महोदय, पिकांच्या बाबतीत नापिकी आणि त्यामुळे येणारा कर्जबाजारीपणा विदर्भाच्या पाचवीला पुजलेला आहे. त्याच्या कारणांचाही आपण विचार केला पाहिजे. गोसीखूर्द प्रकल्पाच्या अतिरिक्त पाण्यावर वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प उभा राहणार आहे. या माध्यमातून 27.7 टीएमसी पाणी वळविण्याचा सरकारचा मानस आहे. गोसीखूर्द प्रकल्पातील अतिरिक्त पाणी वळविणे, असे नदीजोड प्रकल्पाच्या संदर्भातील धोरण आहे. प्रत्यक्षात गोसीखूर्द विभागाला पाण्याची किती गरज आहे, प्रत्यक्षात साठा किती आहे, त्या खाली बारमाही शेती किती आहे, पिण्यासाठी किती पाणी उपलब्ध होणार आहे, उद्योगाकरिता किती पाणी उपलब्ध होणार आहे आणि हे सर्व वजा करून किती अतिरिक्त पाणी राहणार आहे, याचा अभ्यास न करता विदर्भाचे पाणी अशा प्रकारे दुसरीकडे वळविण्याचा मानस असेल तर गोसीखुर्द प्रकल्पाचा पुन्हा

...3.....



SRR/ ST/ KTG/ प्रथम श्री.मंगेश........ 15:50

अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. प्रत्यक्षात गोसीखूर्द प्रकल्पाला 1634 टीएमसी पाण्याची गरज आहे. समस्प्रता अभ्यासातून 50 वर्षा पैकी 49 वर्षात गोसीखूर्दमध्ये पाण्याची तूट दाखविलेली आहे. हा सरकारचा अभ्यास आहे. अशी पाण्याच्या तुटीची परिस्थिती असताना 2707 टीएमसी पाणी वळविण्याचा प्रस्ताव मंजूर केला गेला असेल तर ते बरोबर नाही, त्याचा फेरविचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे, असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, अमरावती जिल्ह्यातील मेळघाटमध्ये आदिवासींची वस्ती आहे. सर्वात जास्त कुपोषण देखील या मेळघाटात आहे. तापी नदीचे 191.49 टीएमसी पाणी बॅरेजेस बांधून दुसरीकडे वळविले गेले आहे. त्यामुळे आज तेथे एकही प्रकल्प होऊ शकत नाही. म्हणून पश्चिम विदर्भ देखील आमच्या पूर्व विदर्भासारखा कोरडा आहे. म्हणूनच त्या ठिकाणी सिंचनाची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, वैनगंगा खोरे आणि मांजरा प्रकल्पाची परिस्थितीही काही वेगळी नाही. गडचिरोली जिल्ह्यातील खोब्रागडी नदीवर धरण बांधून ते पाणी गडचिरोली, चंद्रपूर मार्गे मांजराला नेणारा हा प्रकल्प आहे. ही वैनगंगेची उपनदी आहे. प्रत्यक्षात एनडब्ल्यूडीएने हा प्रकल्प फिजिबल नाही, असे म्हटले आहे. परंतु, पुन्हा फिजिबल करण्याचे दडपण त्या एजन्सीवर आणले गेले आणि झाडांचे दाट जंगल म्हणून नाकारण्यात आलेला हा प्रकल्प नंतर फिजिबल कसा झाला, याचाही अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वर्धा आणि वैनगंगा नद्यांच्या संगमावर, प्राणहिता नदीवर चेवेला प्रकल्प आहे. या चेवेला धरणाचे सर्व पाणी आंध्र प्रदेशला मिळणार असून आमच्या भागातील गावे बुडित क्षेत्रात येणार आहेत. आमची 25 गावे या चेवेला धरणात बुडणार आहेत. दुर्दैव असे की, या चेवेला धरणाचा अभ्यास कुणी केला तर तो आंध्र प्रदेश राज्याने केला आणि महाराष्ट्राचा एकही अधिकारी त्यामध्ये नव्हता. आमची किती गावे प्रकल्पात डुबणार आहेत, हे आंध्र प्रदेश राज्य सांगणार, बॅकवॉटर किती राहणार, हे आंध्र प्रदेश राज्य सांगणार, आम्हाला पाणी मिळेल की नाही, हे देखील आंध्र प्रदेश राज्य सांगणार. आम्ही एवढे निर्बल कसे झालो ? आम्ही एवढे दुसऱ्याच्या भरोशावर का म्हणून जगायचे ? महाराष्ट्र सक्षम नाही का ? आंध्र प्रदेशमध्ये चेवेला

...4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस........

धरण बांधत असताना धरण त्यांच्याकडे, पाणी त्यांच्याकडे आणि बुडिताचे क्षेत्र आमच्याकडे, अशी परिस्थिती आहे. आताचे तेलंगणा राज्य आणि आंध्र प्रदेश राज्य या दोन्ही राज्यातील जमीन ओलिताखाली आणणारा आणि गडचिरोली सारखा नक्षलवादी जिल्हा पूर्ण पाण्याखाली आणणारा हा प्रकल्प असेल तर तो महाराष्ट्राला आणि विदर्भाला न्याय देणारा प्रकल्प कसा ठरु शकेल ? अर्थात, हा काही आताचा निर्णय नाही. या प्रकल्पाला आम्ही विरोध केला आहे. आम्हाला चेवेला धरण नको आहे. या धरणाची उंची 152 मीटर असेल तर आमचा विभाग मोठ्या प्रमाणावर पाण्याखाली जाणार आहे.

सभापती महोदय, इचमपल्ली धरण देखील सिरोंचाच्या बॉर्डरवर आहे. त्या माध्यमातूनही आंध्र प्रदेश राज्याला पाणी मिळणार आहे. आम्ही मात्र पाणीच अडविले नाही. गोदावरी लवादा प्रमाणे आम्ही एकही थेंब पाणी अडविले नाही. त्यामुळे आमचे सर्व पाणी आंध्र प्रदेशमध्ये जाणार आहे. आंध्र प्रदेशने सांगितले आहे की, आतापर्यंत तुम्ही पाणी अडविले नसल्यामुळे आता तुमचा या पाण्यावर अधिकार नाही. इचमपल्ली धरणामधून हे पाणी अडविले जाणार आहे. वीजही आंध्र प्रदेशला मिळणार आहे. सिरोंचा तालुक्यात तंबाखूचे पीक होते, इतर चांगली पिके होतात, हा तालुका गोदावरी नदीच्या काठी आहे, येथे इंद्रायणी नदी आहे. अशा तालुक्यातील 100 गावे पाण्याखाली जाणार आहेत. म्हणून त्या लोकांनी विरोध केला आहे. मला असे कळले आहे की, पुन्हा तेलंगणा सरकारने या प्रकल्पासाठी मागणी केलेली आहे. ती मान्य होऊ नये, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, पर्यावरणाच्या गोष्टी आपण नेहमीच करतो. वने राखली गेली पाहिजेत, झाडे लावली पाहिजेत आणि पर्यावरणाचा डोलारा सांभाळला पाहिजे, असे सांगितले जाते आणि ते बरोबरही आहे. परंतु, हा डोलारा कुणी सांभाळायचा ? मुंबई, पुणे, मराठवाड्यात जंगल आहे का ? नसेल तर मग विदर्भानेच हा डोलारा राखायचा का ? आम्ही राखलेल्या जंगलावर तुम्ही पर्यावरणाच्या गोष्टी करणार आणि त्या करीत असताना आमच्याकडे मात्र जंगल आहे म्हणून एकही प्रकल्प होऊ देणार नाही. त्या भागात एकही सिंचन प्रकल्प होऊ देणार नाही, रस्ते होऊ

...5....

श्रीमती शोभा फडणवीस........

देणार नाही, उद्योग उभारु देणार नाही, एवढेच नाही तर त्या भागात असलेले खनिज काढण्याची परवानगी सुध्दा देणार नाही. हा कुठला न्याय आहे ? एका काठीखाली आम्हाला दाबून ठेवायचे आणि दुसरीकडे सुजलाम, सुफलाम करण्याच्या गोष्टी करायच्या, हे आजपर्यंतच्या सरकारचे धोरण आता बदलण्याची गरज आहे.

यानंतर श्री.मा.शिगम.........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

सभापती महोदय, आधीचे सरकार असताना मी बराच विरोध केलेला आहे. 0.4 घनता असलेले जंगल आम्हाला प्रकल्पासाठी मिळत नाही. त्यांनी सांगितले की, घनता जास्त असल्यामुळे ते प्रकल्पासाठी देता येणार नाही. त्यामुळे आमचे सर्व प्रकल्प थांबले. हुमन प्रोजेक्ट थांबला, तुलतुली प्रोजेक्ट थांबला. त्या ठिकाणी नक्षलवाद मोठया प्रमाणावर आहे. तेथील आदिवासींच्या मुलांना नक्षलवादाकडे ओढले जात आहे. कारण तेथील आदिवासी मुलांना आपण काम देऊ शकत नाही, त्यांना चांगले शिक्षण देऊ शकत नाही. त्या ठिकाणी मोठ्या झाडांचे दाट जगंल आहे. हे जंगल प्रकल्पासाठी वापरता आले पाहिजे अशी आमची मागणी आहे. 1980चा वनाचा कायदा केवळ आमच्यासाठीच आहे काय ? 1980चा कायदा झाला त्यावेळी महाराष्ट्रामध्ये 34 टक्के जंगल होते. त्यानंतर बफर झोन आला, व्याघ्र प्रकल्प आला, जंगल राखीव झाले. जंगलात जाता येणार नाही असा कठोर कायदा झाला. या कायद्यामुळे असे वाटले की, आता तरी जंगलामध्ये वाढ होईल. सन 2012-2013मध्ये वनाखाली केवळ 20.20 टक्के जमीन राहिली. 12 टक्के जमीन कुठे गेली ? सन 2013-14 चा जंगलाचा आराखडा मी वाचला त्यावेळी 19.19 टक्के जंगल असल्याची माहिती उपलब्ध झाली. या राज्याच्या पर्यावरणाचा समतोल राखावयाचा असेल तर 31 टक्के जंगल असले पाहिजे असा नियम आहे. पुण्याला लवासासाठी 20-20 कि.मी. जंगलाची तोड करण्यात आली. तेथील जंगलाची तोड करताना कोणताही कायदा आडवा आला नाही. विदर्भामध्ये आम्ही फक्त 4 एकर जमीन मागितली तर शासनाला पर्यावरणाच्या गोष्टी आठवतात. विदर्भामध्ये प्रकल्प होऊच नयेत, विदर्भावर अन्यायच करीत रहायचे, विदर्भातील लोकांनी आयुष्यभर लंगोटीवर रहावे असाच आधीच्या शासनाचा विचार होता काय ? माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, हा वनाचा कायदा शिथिल करणे नितांत गरजेचे आहे अन्यथा उद्या हातामध्ये कु-हाडी घेऊन जंगल साफ करण्याची वेळ आमच्यावर येईल. 19.19 टक्के जंगल आम्हीच राखायचे काय ? हे धोरण बदलण्याची गरज आहे.म्हणून शासनाने विदर्भामध्ये वन कायद्यामध्ये शिथिलता आणून आमचा विकास करावा अशी माझी मागणी आहे. दाट झाडांचे जंगल 0.4 टक्के आहे. वन विभागाने एफडीसीएमला जंगल देण्याचे ठरविले. म्हणजे अगदी दाट असलेले जंगल एफडीसीएमला देऊन शासनाला व्यवसाय करायचा आहे काय ? इकडे मात्र गरिबांच्या पोटाला चिमटा घेऊन जंगल

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

राखण्याची जबाबदारी गावकऱ्यांना देण्यात येणार असेल तर ते काही बरोबर होणार नाही. याबाबतीत कुठे तरी विचार करण्याची आवश्यकता आहे. धोरणामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. विदर्भामध्ये ख-या अर्थाने उद्योग वाढले पाहिजेत.

आम्ही प्रत्येक तालुक्याला एमआयडीसी दिलेली आहे. पंरतु प्रत्येक एमआयडीसीची परिस्थिती अशी झालेली आहे की, कुठे झाडे वाढलेली आहेत, कुठे रस्ते नाहीत, कुठे पाण्याची सोय नाही तर कुठे विजेची सोय नाही. मृतावस्थेतील एमआयडीसी आम्हाला दिसत आहे. विदर्भामध्ये एमआयडीसीला चांगले दिवस यावयाचे असतील तर त्यासाठी खनिज संपत्तीचा वापर करण्याची आवश्यकता आहे. ईश्वराने विदर्भामध्ये फार मोठ्या प्रमाणावर खनिज संपत्ती दिलेली आहे. परंतु आम्ही कर्मदरिद्री आहोत. विदर्भामध्ये काय नाही ? चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ याठिकाणी 5126.769 दशलक्ष टन कोळसा आहे. त्यातही एकटया चंद्रपूरला 2904.674 दशलक्ष टन कोळसा आहे. आम्ही सर्वांना कोळसा पुरवू शकतो. आम्ही सर्वांचे विद्युत प्रकल्प चालवू शकतो, सर्व उद्योगांना कोळसा पुरवू शकतो. परंतु वन आहे म्हणून कोळसा काढू नका, तो जमिनीत जळाला तरी चालेल, त्याचा वापर करता येणार नाही. हा कोळसा काढला जावा असे आमचा आदिवासी म्हणतो. कोळसा निघाला पाहिजे. कारण त्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर बेराजगारी आहे. लोकांनी नक्षलवादाकडे जायचे की उद्योगाकडे वळायचे, मजुरी करायची की नक्षलवादी फौजामध्ये सामील व्हायचे असा विचार पुढे येतो. हा कोळसा काढला तर कोळशावर आधारित उद्योग उभे करता येतील. जेव्हा उद्योग उभे रहातील त्याचवेळी बेरोजगारांना काम मिळेल. आयटीआय झालेली मुले, इंजिनिअर झालेली मुले, डॉक्टर झालेली मुले नोकरी व्यवसायासाठी कुठे जातील ? ही मुले जर मुंबईकडे गेली तर त्यांची लूटच होईल. त्यांना चांगले दिवस येणार नाहीत. आमचा भित्रा मुलगा मुंबईला जाण्याच्या मन:स्थितीत नसतो. जवळ काम करण्याची त्याची मानसिकता असते. विदर्भामध्ये चुनखडी मोठया प्रमाणावर आहे. नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ या ठिकाणी 1370.725 द.ल.टन चुनखडी आहे. एकटया चंद्रपूरला 750.325 द.ल.टन चुनखडी आहे. चुनखडीवर आम्हाला सिमेंटचे कारखाने उभे करता येतील. गडचिरोलीला देखील चुनखडी आहे. पण गडचिरोलीची चुनखडी काढून तेथे सिमेंटचे कारखाने उभे करण्यासाठी शासनाने व्यवस्था केलेली नाही. उद्योजक येत नाहीत असे नाही. पण त्यांना नक्षलवाद्यांपासून

.



MSS/ ST/ KTG/ पूर्वी श्री. रोझेकर 16:00

संरक्षण पाहिजे. ते संरक्षण आपण त्यांना दिले पाहिजे. तेथील आदिवासी लोकांना काम देतो असे सांगितले तर ते आदिवासीच तुमच्या सोबतीला येतील आणि उद्योजकांचे कारखाने उभे रहातील. पण तशी शासनाची मानसिकता असण्याची गरज आहे. आमच्या एमआयडीसीमध्ये आम्हाला चुनखडीवर आधारित उद्योग मोठया प्रमाणावर उभे करता येतील. मँगनीज खनिज हे नागपूर आणि भंडारा या ठिकाणी 20.853 द.ल. टन आहे. गडचिरोली, चंद्रपूर भंडारा या ठिकाणी 185.440 द.ल.टन लोह खनिज आहे. एकटया गडचिरोलीमध्ये 178.610 द.ल.टन लोह खनिज आहे. मागील सरकारने हे लोह खनिज तिसऱ्याच कारखानदाराला विकले. गडचिरोलीच्या बाहेर कारखाना काढून त्या कारखान्यासाठी हे लोह खनिज कच्चामाल म्हणून नेण्याची परवानगी शासनाने दिली होती. परंतु तेथील लोकांनी त्यास विरोध केला, आम्ही विरोध केला. आमच्याकडे जे काही आहे ते तुम्ही दुसरीकडे देणार असाल तर आम्ही आयुष्यभर भिकारीच रहायचे काय ? आम्हाला काहीच अपेक्षा नाहीत काय, आम्हाला आमची मुले मोठी व्हावीत असे वाटत नाही काय, आमची मुले शिकावित त्यांनी चांगले दिवस बघावेत, पुढच्या पिढीने चांगले दिवस बघावेत असे आम्हाला वाटत नाही काय ? ही सर्व खनिज संपत्ती विदर्भासाठी वापरुन त्यावर आधारित उद्योग निर्माण केले पाहिजेत. डोलोमाईट, ग्रॅनाईट अशी खनिज संपत्ती विदर्भामध्ये आहे. गडचिरोलीतील सूरजागड येथे 123 द.ल. टन लोह खनिज आहे. लवासासाठी 20 कि.मी.जमीन घेतलेली आहे. ही जमीन विदेशातील लोकांना कार्पेट टाकण्यासाठी, त्यांच्यासाठी सिटी निर्माण करण्यासाठी दिलेली आहे. विदेशातील लोकांना कौतुक वाटले पाहिजे. गरिबीकडे दुलक्ष करुन श्रीमंतांचे लाड करण्यासाठी 20 कि.मी.ची वन जमीन देण्यात येत असेल तर मग गडचिरोलीमध्ये लोहखनिजावर आधारित कारखाना काढण्यासाठी 262 हेक्टर जमीन का देत नाही ? 262 हेक्टरमध्ये कारखाना काढला तर गडचिरोली जिल्ह्यातील सर्व मुलांना नोकरी मिळेल. गडचिरोलीमध्ये 82 द.ल.टन चुनखडी आहे. कारखान्यासाठी 201.50 हेक्टर इतकी वन जमीन लागणार आहे. चंद्रपूर येथील चेडवाई येथे 160 द.ल.टन चुनखडी आहे. त्यावर आधारित उद्योग काढण्यासाठी 630 हेक्टर इतकी वन जमीन लागणार आहे. यवतमाळ जिल्हयातील मुकूट पॉईण्ट येथे 132 द.ल.टन चुनखडी आहे. तेथे कारखाना काढण्यासाठी 1152 हेक्टर जमीन लागणार आहे. शासनाने 20-20 हजार हेक्टर जमीन मोठमोठ्या कारखानदाराना कारखाने उभे करण्यासाठी दिलेली आहे. पण या

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

मागासलेल्या क्षेत्रामध्ये कारखाना काढण्यासाठी जमिनीची मागणी केली तर आमच्यावर कायद्याचा बडगा उभारला जातो. हे धोरण बदलले पाहिजे. गडचिरोलीमध्ये कारखाना काढण्यासाठी 262 हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. त्याच प्रमाणे चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्हयामध्ये देखील कारखाना काढण्यासाठी जमीन उपलब्ध करुन दिली पाहिजे.

खऱ्या अर्थाने या भागामध्ये एमआयडीसी उभी करण्याची गरज असताना शासनाने बुटीबोरीला पंचतारांकित एमआयडीसी घोषित केली. आमचे मुख्यमंत्री विदर्भातील आहेत. बुटीबोरी येथे मोठमोठे कारखाने आहेत, उद्योग आहेत. त्या ठिकाणी एमएसईबीचा एक कार्यकारी अभियंता द्यावा अशी मी मागील सरकारकडे मागणी केली होती. परंतु एवढया मोठया उद्योगासाठी केवळ एक कनिष्ठ अभियंता देण्यात आला. आता आमची अशी मागणी आहे की, त्या ठिकाणी एमएसईबीचे चांगले कार्यालय स्थापन करावे जेणेकरुन प्रत्येकाला न्याय मिळू शकेल. नागपूरमध्ये एमआयडीसी आहे. त्या ठिकाणी 8149 कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन 3171 उद्योग घटक आले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

त्यातून प्रत्यक्षात किती रोजगार निर्माण झाला? 1 लाख बेरोजगारांना देखील काम देऊ शकलो नाही. नागपूर विभागात फक्त 69 हजार लोकांना रोजगार मिळाला. त्यात बुटीबोरी एमआयडीसी व इतर सर्व एमआयडीसींचा समावेश आहे. बुटीबोरी एमआयडीसीच्या माध्यमातून 50 हजार लोकांना काम मिळाले आणि उर्वरित एमआयडीसीच्या माध्यमातून फक्त 19 हजार लोकांना काम मिळाले. इतर जिल्हयांबाबत ही करुण अवस्था आहे. अमरावती विभागात 110 घटक असून 3126 कोटी रुपयांची गुंतवणूक केली गेली आहे. फक्त 24 हजार बेरोजगारांना काम मिळाले. एकट्या कोकणामध्ये 2.80 लाख लोकांना रोजगार मिळाला. पुणे विभागात 3.74 लाख लोकांना रोजगार मिळाला. या भागात बेरोजगारांना अशा प्रकारे रोजगार मिळत असेल तर विदर्भ किती मागे याचा विचार करु शकता.

सभापती महोदय, चुनखडीचे आजही 15 सिमेंट कारखाने विदर्भामध्ये निघू शकतात. लोह खनिजावर आधारित कारखाना काढल्यास 2 ते 3 हजार लोकांना रोजगार मिळू शकतो. फेरो मॅगनीजचा वापर करुन गाडीचे रुळ तयार करता येतात. त्याचा कारखाना उभारता येईल. इलेक्ट्रोलिटी मॅगनीजचा वापर बॅटरीमध्ये केला जातो. डायऑक्साईड व झींकचा त्यामध्ये वापर होतो. त्यावर आधारित ड्राय बॅटरी सेलचा कारखाना निघू शकतो. सिलिको मॅगनीजचा वापर विजेच्या कण्डक्टरमध्ये केला जातो. त्याचा छोटा कारखाना निघू शकतो. डोलोमाईट हा शोभेचा दगड आहे. लोह व कोळसा खाणीत याच्या भुकटीचा वापर करता येतो. कायनाईट सिलिंग नाईट याचे भंडारा येथे साठे आहेत. या धातुचा वापर शास्त्रीय उद्योग, सिमेंट निर्मिती, काच निर्मिती, उच्च प्रतीच्या उष्णरोधक विटा तयार करण्यासाठी केला जातो. क्रोमाईट याचा नागपूर, चंद्रपूर व भंडारा येथे साठा आहे. या खनिजचा उपयोग उष्णतारोधक वस्तू, रासायनिक उद्योगात केला जातो. बेराईट या खनिजाचा चंद्रपूर येथे प्रचंड साठा आहे. या खनिजाचा उपयोग तेल विहिरीच्या खोदकामात व पेंट उद्योगात केला जातो. तांब्याचा नागपूर जिल्हयातील पुलार, तांबेखाणी, कोलारी, भवरी या गावाच्या परिसरात 7.708 दशलक्ष टन साठा आहे. जस्त खनिजाचा नागपूर जिल्हयातील तांबेखाणी, कोलारी व भवरी गावातील परिसरात मोठा साठा आहे. म्हणजे खनिज संपत्तीच्या आधारे फक्त आणि फक्त वन संवर्धन कायदा शिथिल करुन हे कारखाने

..2..

श्रीमती शोभा फडणवीस....

उभे करुन आम्हाला न्याय द्यावा. त्याचबरोबर चंद्रपूर जिल्हयात कोलबेस गॅस मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. तत्कालीन पंतप्रधान माननीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळातील पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी हा कोलबेस गॅसचा शोध लावला होता. याचा फायदा होऊ शकतो. जट्रोफा या वनस्पतीपासून छत्तीसगड राज्यात डिझेल तयार होऊ शकते तर महाराष्ट्र राज्यात प्रयत्न का होत नाही? विदर्भामध्ये 4000 मे.वॅट वीज निर्माण करु शकतो. वीज, कोळसा खाणी या माध्यमातून मोठमोठे उद्योग उभे करुन विदर्भाचा विकास नवीन शासनाने करावा हे स्वप्न डोळ्यापुढे ठेवून माझे मुद्दे मांडले आहेत, त्याबाबत शासनाने ठोस कार्यवाही करावी एवढे बोलून माझे विचार पूर्ण करते.

----------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आपण अनेक वर्षे या सभागृहात विदर्भाच्या प्रस्तावावर चर्चा करीत आहोत. ज्या सगळ्या प्रश्नांचे विवेचन पूर्वीच्या वक्त्यांनी केले ते विवेचन आणि विश्लेषण पाहिले तर त्यामधून हेच स्पष्ट होते की, विदर्भातील जनतेची अपेक्षा महाराष्ट्र सरकारकडून होती आणि आजही आहे, पुढेही राहील. त्यांना न्याय देण्यासाठी ज्याप्रकारे सरकारकडून प्रतिसाद मिळाला पाहिजे होता तसा मिळाला नाही. म्हणून मला पहिला मुद्दा मांडावयाचा आहे की, जी दुरवस्था आज आपण पहात आहोत त्याची कारणे जी आहेत त्यामध्ये अनुशेषाचा प्रश्न आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करीत असताना विदर्भाचा अनुशेष सगळ्यात जास्त आहे. उत्तर महाराष्ट्र, कोकण, मराठवाड्यात अनुशेष आहे. ज्यावेळी दांडेकर समिती नेमण्यात आली आणि 2003 मध्ये आदेश देण्यात आले त्यावेळेपासून सातत्याने एक चित्र दिसते ते म्हणजे अनुशेषाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

सभापती महोदय, नवीन सरकार अस्तित्वात आल्यानंतर असे वाटले की, पुन्हा पुन्हा कशासाठी हे मुद्दे मांडायचे. मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, विदर्भाच्या विकासाबाबत येथील जनतेला न्याय मिळाला नाही याच्या खोलाशी जाऊन समजून घेण्याचा प्रयत्न केला तर अनेक उदाहरणांमधून आपल्याला कळते की, विकासात कशाप्रकारे अडथळे आलेले आहेत. उदाहरणे द्यायची झाली तर भरपूर देता येतील. त्या उदाहरणांच्या खोलाशी गेलो तर त्यातून स्पष्ट होईल की, विदर्भातील नागपूर, वर्धा, बुलढाणा जिल्हा बँकामध्ये शेतकऱ्यांच्या 1.5 लाख कोटी रूपयांच्या ठेवी अडकल्या आहेत. केंद्र सरकारने उत्तरप्रदेशासह विदर्भातील या तीनही बँकांसाठी पॅकेज जाहीर केले आहे. विदर्भाच्या विकासाच्या संदर्भात ज्यावेळी मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत त्यावेळी सरकारने काही घोषणा केलेल्या असणे अपेक्षित आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये ठराव मांडले गेले आहेत. काल विदर्भाच्या विकासाच्या संदर्भातील प्रस्तावांवर विधानसभेत चर्चा झ ालेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या चर्चेला उत्तर दिले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोप-यामध्ये मुख्यमंत्र्यांचे उत्तर पोहोचल्यानंतर विधानपरिषदेमध्ये आज ही चर्चा सुरु होत आहे. पुन्हा विधानपरिषदेमध्ये या चर्चेवरील उत्तर मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षित आहे. पुन्हा पुन्हा त्याच मुद्यावर प्रश्न मांडायचे आणि त्याचे उत्तर नवीन सरकार कशाप्रकारे देईल याची वाट पहायची. माननीय मुख्यमंत्र्यांना विदर्भाचा चांगला अभ्यास आहे.

सभापती महोदय, आपण जर का बँकाचे घोटाळे बघितले, सिंचनाच्या प्रश्नाचा विचार केला तर विदर्भ सिंचनाच्या प्रश्नामध्ये अविकसित असल्याचे दिसते. सिंचन घोटाळ्याची कारणे काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आहेत, कशा प्रकारे सिंचन योजना तळागाळापर्यंत पोहोचण्यामध्ये विलंब झाला, प्रकल्पांच्या किंमती का वाढल्या, शेतकऱ्यांपर्यंत लाभ का पोहोचू शकला नाही याच्या मुळाशी गेलो तर एक वाक्य ढळढळीत जाणवते ते म्हणजे सुप्रशासन आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव या दोन कारणांमुळे मोठया प्रमाणात विदर्भाच्या विकासात अडथळे निर्माण झाले आहेत.

सभापती महोदय, एका बाजूला महाराष्ट्राचा विकास करायचा आहे यासाठी विदर्भ ॲडव्हाण्टेज परिषद भरविण्यात आली त्या माध्यमातून मोठया प्रमाणात इंडस्ट्री येईल अशी अपेक्षा केली गेली. उलट चित्र असे दिसते की, मागील 5 वर्षात परवाना राज, दुसरीकडे विजेचे प्रश्न या कारणामुळे उद्योग बंद झालेले आहेत, स्थलांतरित झालेले आहेत. याचे कारण म्हणजे या ठिकाणी जी नोकरशाही आहे, लाल फितीचा कारभार यामुळे इंडस्ट्री राज्यातून बाहेर जात आहे. सातत्याने विदर्भात काय नाही हे मांडले जाते. आपण म्हणतो विकास झाला पाहिजे, परंतु जोपर्यंत अडथळे दूर करु शकत नाही तोपर्यंत विकास शक्य होणार नाही. सिंचन घोटाळयामध्ये कोण जबाबदार आहे, संपूर्ण गैरव्यवहार झाला, प्रकल्पांच्या कामांना विलंब का झाला हे चौकशीतून स्पष्ट होणार आहे. विदर्भातील अनेक मंत्री महोदयांनी यापूर्वी राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये नेतृत्व केले आहे. कॉंग्रेस पक्षाच्या सरकारमध्ये विदर्भातील अनेक मंत्री उच्च स्थानी होते. कधीही विदर्भातील मंत्र्याशिवाय कॅबिनेट पूर्ण झाली नाही. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये विदर्भातील अनेक मंत्र्यांनी महत्वाची भूमिका बजावली. सुप्रशासनाच्या अभावी विदर्भाला फटका बसला तसाच तो मराठवाड्याला बसला, उत्तर महाराष्ट्राला बसला. यातून स्पष्ट होते की, घोडा का अडला, भाकरी का करपली? वेळेवर न परतल्यामुळे हे घडले. विदर्भाचा विकास थांबला आहे कारण विकासात अडथळे तयार झाले.

सभापती महोदय, सत्ता परिवर्तन झाले नव्हते त्यामुळे विकास अडला होता असे म्हणण्यास वाव आहे. आज महाराष्ट्रामध्ये अनेक पतपेढ्यांमधील घोटाळे पाहिले तर असे म्हणता येईल की, सहकार विभाग काय करीत होता? 4-4 वर्षे अनेक केसेस प्रलंबित राहिल्या. आरोपी जामिनावर सुटले. नागपूर मधील अनेक पतपेढ्या मोडकळीस आल्याबद्दल सभागृहात मी एक लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. माननीय राज्यमंत्री श्री.दादाजी भुसे यांनी आम्हाला आश्वासन दिले. नागपूरमध्ये 11 नागरी सहकारी पत संस्थामधील 60 हजार ठेवीदार वा-यावर असल्यामुळे त्यांनी बैठक घेतली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 2डी.1...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ............

त्यावेळी लक्षात आले की, काही बँका व त्यांच्या संचालकांनी अनेक प्रॉपर्टीज विकत घेतल्या व त्या स्वतच्या नावावरच विकत घेतल्या. त्यावेळेस आयकर विभागाने सांगितले की, संचालकांच्या नावावर प्रॉपर्टी आहे म्हणून आम्ही ती आमच्या विभागाच्या ताब्यात ठेवली आहे. ठेवीदारांसाठी जर या संचालकांची प्रॉपर्टी जप्त करण्याचा प्रयत्न केला तर आयकर विभागाचे म्हणणे आहे की, आम्ही ती प्रॉपर्टी जप्त करु देणार नाही कारण ती आमच्या ताब्यात आहे. मला वाटते की संपूर्ण भारतातून हे एकच उदाहरण असेल की जे खूप डोके वापरुन ही हेराफेरी केलेली आहे. त्यामुळे आयकर विभागाने देखील ज्या संचालकांची प्रॉपर्टी विकून ठेवीदारांना त्यांचे पैसे मिळू नये म्हणूनच ताब्यात घेतली काय अशी शंका येते. या घटनेला हे चौथे वर्ष असून स्वतः माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील नागपूर मधील पतसंस्थांमधील घोटाळ्यांबाबत प्रश्न विचारला होता. पण यामध्ये अशा प्रकारची मेख मारुन ठेवली असून ठेवीदारांना संरक्षण मिळणार नसेल आणि सुप्रशासनाचा अभाव असेल तर त्याचा फटका नागपूरमधील मिहान, बँका तसेच पतपेढ्यांना आणि खातेदारांना सुध्दा मोठ्या प्रमाणात बसलेला आहे. नागपूर जिल्हा शेतकरी समितीने मिहानच्या संदर्भात मला एक निवेदन दिलेले आहे. मिहान भागातील जनतेने टाहो फोडून जनतेसमोर आपल्या समस्या मांडल्या. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा बैठक घेतली, त्या बैठकीतील मुद्दा असा आहे की, शासन या सभागृहात अनेक वर्षांपासून सांगत होते आणि माझी सुध्दा याबाबतीतील लक्षवेधी सूचना मी मांडली होती. माजी मुख्यमंत्री श्री. चव्हाण साहेब असताना माननीय सभापतींनी याच विषयावरील अर्धा-तास चर्चेचे रुपांतर अडीच तासाच्या चर्चेत केले आणि त्यावेळी शासनाने जे पॅकेज जाहीर केले होते त्यात मिहान प्रकल्पात जे प्रकल्पग्रस्त झाले, ज्यांची जमीन गेली त्यांना 12.5 टक्के विकसीत भूखंड देण्यात येतील. पण त्याबाबतचा शासन निर्णय जारी करताना मात्र हे भूखंड विकसित करण्याचा खर्च आणि शुल्क प्रकल्पग्रस्तांनी भरावयाचे आणि हा खर्च लाखामध्ये आहे, असा त्यात उल्लेख करण्यात आला. वास्तविक या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीपोटी जो मोबदला मिळणार होता त्यातून त्यांना हा विकसित करण्याचा खर्च अदा करावयाचा आहे. ही गोष्ट बगळा आणि कोल्ह्याच्या गोष्टीसारखी झाली, वाढलेले सुध्दा खाता येत नाही. म्हणून शासनाने ही जमीन विकसित करुनच प्रकल्पग्रस्तांना द्यावी तसेच त्यांचे 12.5 टक्के

............2

डॉ. नीलम गोऱ्हे ............

शूल्क माफ करण्यात यावे. अशी मी मागणी करते. त्याचबरोबर मिहान प्रकल्पाची जमीन संपादित करताना प्रकल्पग्रस्तांना वेगवेगळ्या प्रकारच्या नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिलेले होते पण उद्योग अद्याप सुरु झालेले नाहीत. तसेच सभागृहात दिलेल्या घोषणांची देखील अंमलबजावणी होत नाही.

महोदय, दांडेकर समितीने केलेल्या शिफारशींप्रमाणे मुंबईतील काही उद्योग नागपूर आणि विदर्भात आणावे असे होते. या अधिवेशनात आमच्या माहितीप्रमाणे केळकर समितीचा अहवाल सभागृहात ठेवला जाणार आहे, त्या अहवालावर साधक-बाधक चर्चा झाली पाहिजे. याचे कारण असे की, समितीमधील शिफारशींची अंमलबजावणी होत नसेल तर काय योग्य आणि काय अयोग्य यावरही विचारमंथन होणे आवश्यक आहे. काही वेळा सभागृहात असेही म्हटले जाते की, पश्चिम महाराष्ट्राने या सर्व गोष्टी पळवल्या. मी जरुर सांगू इच्छिते की, पश्चिम महाराष्ट्रातील नेतृत्वाने अनुशेषाच्या बाबतीत न्याय्य भूमिकेने काम केले नाही आणि हीच त्यांची भूमिका विदर्भातील विकासाच्या त्रुटीतून स्पष्ट होते. आपण सर्व ज्यावेळेस नेतृत्वाच्या संदर्भात बोलतो त्या अनुषंगाने मला चार मुद्दे सुचवावेसे वाटतात. त्यात पहिला म्हणजे अनुशेषाची उपलब्धता करुन देण्यासाठी कशा प्रकारचे नियोजन करावयाचे यासाठी केंद्र सरकारचे सहकार्य शासनाला घ्यावे लागणार आहे. कारण हा केवळ एका विभागाचा प्रश्न असेल तर शेतकरी आत्महत्या, दुष्काळाबाबतचा प्रश्न आहेच आणि त्यासाठी केंद्र सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीची मदत घेणे आवश्यक आहे. सर्वांनीच सुटा सुटा भाग म्हणून संघर्ष करण्यापेक्षा संपूर्ण महाराष्ट्रासाठी भूमिका घेऊन केंद्राकडे राज्याची भूमिका मांडली तर निश्चितपणे त्याची अंमलबजावणी शक्य होईल. तसेच नॅचरल रिसोर्सेस मॅनेजमेंटचा विचार करता जंगले आणि पाणी या दोन्ही मंत्रालयांचा समन्वय करणे आवश्यक आहे.

दुसरा मुद्दा असा आहे की, मुंबईत संपूर्ण मंत्रालय आहे आणि संचालनालये मात्र पुण्यात आहेत. वास्तविक पुणेकरांनी तशी कोणतीच मागणी केली नव्हती की संचालनालये आमच्या पुण्याला ठेवावीत. आपण म्हणतो की, विदर्भात अधिकारी येण्यास तयार नसतात म्हणून माझी सूचना आहे की, नागपूर या उपराजधानीच्या ठिकाणी संपूर्ण संचालनालये हलविली तरी जनतेला मुंबई-पुण्याला हेलपाटे घालावे लागणार नाहीत. लोक मंत्र्यांना भेटण्यासाठी मुंबईला येतात हा भाग वेगळा पण बहुतांशी जनतेच्या मुंबई-पुण्याच्या फेऱ्या वाचू शकतील.

............3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ............

तिसरी सूचना अशी आहे की, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भ येथे दर सहा महिन्यांनी संपूर्ण मंत्रिमंडळ आणि संबंधित अधिकारी वर्गाबरोबर एक विकास परिषद घेऊन कोणत्या प्रकारच्या योजना झाल्या आणि त्याची अंमलबजावणी झाली की कसे, त्यात कोणत्या त्रुटी आहेत यासंबंधीचा आढावा त्या परिषदेत घेतला पाहिजे. पूर्वी निवडणुका आल्यानंतर औरंगाबादला कॅबिनेटची बैठक, कधी कोकणात कॅबिनेटची बैठक, नाशिकला एक बैठक अशा प्रकारे मंत्रिमंडळाच्या बैठका घेतल्या जात होत्या. अशा बैठकांमध्ये अगोदर घेतलेल्या बैठकांमधील बेरीज एकत्र करुन अमुक इतका निधी दिला तो मिळाला की नाही हे मात्र कोणी किती वेळा पाहिले हे समजत नाही. त्यासाठी वरील ठिकाणी दर सहा महिन्यांनी एक विकास परिषद घ्यावी.

चौथी सूचना मी अशी करणार आहे की, राज्यात सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात त्यासाठी एखाद्या प्रकल्पाच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र प्राधिकरण नेमले जाते त्याच धर्तीवर आत्महत्याग्रस्त परिवाराच्या पुनर्वसनास गती मिळणे, त्यांना योग्य मोबदला मिळणे अशा सर्व अडचणी व या कामातील त्रुटी दूर करण्याचे काम त्या प्राधिकरणामार्फत करता येईल.

शेवटचा मुद्दा असा आहे की, नागपूर आणि मुंबई या दोन शहरांमध्ये चांगल्या प्रकारचे नाते आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी खूप हृदयस्पर्शी विषय सभागृहात मांडला. त्या विदर्भातील असल्या तरी संपूर्ण राज्यावर त्यांचे प्रेम आहे आणि आमचे त्यांच्यावर प्रेम आहे. तसेच विदर्भातील नेते मंडळींची मुले-मुली पुण्यात घर घेऊन राहत आहेत असे आपले सर्वांचे प्रेम व नाते आहे. विदर्भात रोजगारात वाढ होण्यासाठी उद्योगांच्या बाबतीत काय करता येईल त्याबद्दल माननीय उद्योग मंत्री श्री. सुभाष देसाई यांनी चालना दिलेलीच आहे आणि त्या माध्यमातून उद्योगधंद्यांना चालना मिळण्यासाठी फक्त मुंबईच लक्षात न घेता राज्याचा विकास प्रत्येकापर्यंत पोहचविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे आणि अशी राजकीय इच्छाशक्ती असेल तर कोणताही दुजाभाव राहणार नाही. या निमित्ताने मी आल्फ्रेड हिचकॉकच्या चित्रपटात नेमका खलनायक कोण आहे हे चित्रपटाच्या शेवटी लक्षात येते त्याप्रमाणे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या संदर्भात परीक्षेच्या शेवटी शून्यच येते. अशा प्रकारे आजपर्यंत होत आले आहे.

यानंतर श्री. भारवि ............

अशुद्धीत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

विदर्भावर अन्याय झाला आहे हे मी ठणकावून सांगते. असे बोलल्यानंतर सभागृहात आरडाओरड होईल याची मला कल्पना होती. त्यामुळे भाषणाच्या शेवटी मी हे बोलले आहे आणि माझे मत मांडलेले आहे. धन्यवाद.

.......

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडाच्या विकास शुल्काची आकारणी कमी करण्यासंबंधी

**मु.शी.**: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडाच्या विकास शुल्काची आकारणी कमी करण्यासंबंधी माननीय उद्योग मंत्र्यांचे निवेदन

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळामध्ये उद्योगधंद्यासाठी भूखंडाचे वितरण केले गेल्यानंतर एम.आर.टी.पी.ॲक्ट अंतर्गत राज्यातील विशेष नियोजन प्राधिकरणांना शुल्क आकारावे लागते व हे विकास शुल्क वसूल केले जाते.

मागील काही वर्षातील जागतिक मंदीची परिस्थिती, दुष्काळामुळे ओढवलेले संकट, उद्योगधंद्याची खालावलेली परिस्थिती यामुळे अनेक उद्योजकांची मागणी होती की, विकास शुल्काची आकारणी कमी करण्यात यावी. शासनाने याचा सहानुभूतीपूर्वक विचार केला असून आता त्याबाबत निर्णय घेतलेले आहेत.

निवासी भूखंड विकासासाठी आराखडा मंजूर करताना महामंडळाच्या निवासी वापरासाठीच्या प्रचलित जमीन दराच्या 0.3 टक्के अथवा शीघ्र सिद्ध गणक दराच्या 0.3 टक्के यापैकी जो जास्त असेल तो. यापूर्वी हा दर 0.5 टक्के एवढा होता. तो कमी करून 0.3 टक्के एवढा केला.

औद्योगिक भूखंडासाठी महामंडळाच्या औद्योगिक वापरासाठीचा प्रचलित दराच्या 0.3 टक्के अथवा शीघ्र सिद्ध गणक दराच्या दीड पटीच्या 0.3 टक्के यापैकी जो जास्त असेल तो. यापूर्वी हा दर 0.5 टक्के एवढा होता. तो कमी करून 0.3 टक्के एवढा केला.

वाणिज्य भूखंडावर यापूर्वी हा दर 0.5 टक्के एवढा होता तो कमी करून 0.3 टक्के एवढा केला.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष देसाई....

बांधकामासाठी सुद्धा निवासी भूखंडावर यापूर्वी हा दर 2 टक्के होता. तो कमी करून 1 टक्के एवढा केला.

औद्योगिक भूखंडांवर यापूर्वी 2 टक्के दर होता तो कमी करून 1 टक्के एवढा केलेला आहे. यामुळे उद्योगांना प्रोत्साहन मिळून महाराष्ट्रामध्ये औद्योगिकीकरण झपाट्याने वाढेल अशा प्रकारची आशा आहे. धन्यवाद.

.............

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष

**मु.शी.**: विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष या विषयावर सर्वश्री.सुनिल तटकरे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, जनार्दन चांदूरकर, धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेंद्र जैन, संजय दत्त, किरण पावसकर, अनंतराव गाडगीळ, प्रकाश गजभिये, रामहरी रुपनवर, ख्वाजा बेग, जोगेंद्र कवाडे, अनिल तटकरे, हरिसिंग राठोड, संदिप बाजोरिया, चंद्रकांत रघुवंशी, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. शरद रणपिसे, आनंदराव पाटील वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरू.....

श्री.संदीप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भाच्या दृष्टीने हा अतिशय चांगला प्रस्ताव असून विदर्भाच्या व्यथा सभागृहाने अत्यंत गांभीर्याने समजून घेतल्या पाहिजेत, अशी माझी विनंती आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राचा प्रश्न येतो तेव्हा सदनातील सन्माननीय सदस्य त्या भागातील असल्यामुळे ती चर्चा ते शांतपणे ऐकतात. त्यावेळी माननीय मंत्र्यांची उपस्थिती देखील चांगली असते म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण विदर्भाची व्यथा समजून घ्यावी. वेगळ्या विदर्भाच्या मुद्यावर आपले सरकार आले आहे. वेगळ्या विदर्भाचे आपण जनतेला आश्वासन दिलेले आहे. हे आश्वासन आपले सहकारी पूर्ण होऊ देणार नाही याची मला पूर्ण कल्पना आहे. तरी देखील आपण वेगळा विदर्भ करणार आहात असे आम्ही समजतो. आपण विदर्भाला न्याय देणारच आहात.

गेल्या 100 वर्षापासून हे विधान भवन विदर्भाची व्यथा ऐकत आहे, तरी देखील विदर्भाचा प्रश्न सुटलेला नाही. विदर्भाचा प्रश्न आपण 40 दिवसात सोडविला पाहिजे असे म्हणत नाही. माझ्याकडे विद्यमान माननीय मुख्यमंत्र्यांच्या दिनांक 20.12.2012 रोजीच्या भाषणाची प्रत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदीप बाजोरिया....

सभापती महोदय, विदर्भात प्रामुख्याने सिंचनाचा बॅकलॉग आहे. विदर्भातील 55 लाख हेक्टर जमिनीपैकी 40 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकते. यासाठी आमच्या सरकारने प्रयत्न देखील केले होते. आमच्या सरकारने विदर्भात प्रचंड प्रमाणावर कामे देखील आणली होती. परंतु, आपण त्या कामात भ्रष्टाचार झाला असे आरोप केले म्हणून आता चौकशी देखील सुरू आहे. जे चुकीचे झाले आहे त्याची चौकशी व्हायला पाहिजे. आपण पश्चिम विदर्भातील प्रकल्पांसाठी उपाययोजना सुचविल्या आहेत. विदर्भात जिगाव सारखा प्रकल्प असून गोसीखुर्द प्रकल्प 90 टक्के पूर्ण झालेला आहे. बावनथळी, हुमन प्रकल्प हे वन कायद्यांमुळे अडकून पडलेले आहेत. हे सर्व प्रकल्प आपण पूर्ण केले पाहिजेत.

विदर्भात लोअर पेंढी प्रकल्प आहे. हा खारपाणपट्ट्यातील प्रकल्प असून तो संघर्षातून आलेला आहे. हा प्रकल्प अमरावती विभागातील महत्तम बॅकलॉगमधील आहे. येथील प्रकल्पांचा निधी दुसऱ्या विभागाकडे वळविण्यात आलेला आहे. विदर्भातील निधी आपण पश्चिम महाराष्ट्रासाठी वळते केले आहेत. ते पैसे त्या प्रकल्पांसाठी वळते करून त्या प्रकल्पांना चालना द्यावी अशी मी विनंती करतो. विदर्भात जेवढे म्हणून लघु प्रकल्प असतील त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ न देता सर्व अडथळे दूर करून लघु प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण केले पाहिजेत. त्यासाठी निधीची, वन कायद्याची, भूसपांदनाची अडचण येता कामा नये. मोठे प्रकल्प पूर्ण करण्यास बराच कालावधी लागतो. 1984 मध्ये तत्कालीन माननीय पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामाची कोनशीला ठेवली. 30 वर्षे झालीत तर तो प्रकल्प अजून पूर्ण झालेला नाही. त्यामुळे या प्रकल्पाच्या कामाची किंमत वाढत चालली आहे. आज देखील विदर्भातील काही प्रकल्प हे गेल्या पाच वर्षापासून बंद आहेत. या पाच वर्षात कच्च्या मालाची किंमत वाढली असून त्यास कोण जबाबदार आहे? जे चुकीचे झाले आहे त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. विदर्भात सिंचनाचे प्रकल्प हे झालेच पाहिजेत. आमच्या विदर्भामध्ये कापूस पिकतो. मात्र सूत गिरण्या पश्चिम महाराष्ट्रात आहेत. माझ्या राहत्या गावात जी सूत गिरणी आहे त्याचे चेअरमन ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे असून ती सूत गिरणी 20 वर्षापासून बंदच आहे. ती सूत गिरणी सुरू करण्यास आपण प्रोसाहन दिले पाहिजे, मदत केली पाहिजे, यात जी अडचण आहे ती दूर केली पाहिजे.

..6

श्री.संदीप बाजोरिया....

यवतमाळ जिल्ह्यातील सूत कारखाने देखील बंद आहेत. बोधगया येथील सहकारी साखर कारखाना, पुसदमधील पद्मावती इत्यादी साखर कारखाने बंद असून फक्त पुसदमधील विवेक सहकारी साखर कारखना सुरू आहे. जे बंद कारखाने आहेत त्यांना मदत करून ते पुनरूज्जीवित केले पाहिजेत.

विदर्भाचे जे काही प्रकल्प असतील त्यांच्यासाठी वेगळे निकष लावावेत. सन 2007 मध्ये विदर्भ आणि अमरावती विभागाचे 5 जिल्हे होते त्यासाठी वेगवेगळे निकष लावण्यात आले ते सर्व निकष पुन्हा लावणार आहात काय असा माझा सवाल आहे. जलसंपदा विभागाने अमरावती विभागासाठी, सिंचन प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यतेसाठी वेगळा नियम केला होता. त्यांनी निधीसाठी विशेष तरतूद केली होती. त्यांना आता सगळे अधिकार आपण देणार आहात काय ? यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलढाणा येथे कॉटन इंडस्ट्रीज निर्माण झाली पाहिजे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संदीप बाजोरिया .......

अमरावती, मोर्शी, काटोल, वरूड या ठिकाणी संत्र्यांवर आधारित उद्योग निर्माण केले पाहिजेत, नागपूरला क्लस्टअप केले पाहिजे. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा येथे औष्णिक वीज प्रकल्पासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. विदर्भाची उद्योगातही पिछेहाट आहे. एक आटो इंडस्ट्री आली तर त्याच्यामागे 100 उद्योग येत असतात. यामध्ये बेअरिंगचा उद्योग असो, जॉईंट, कास्टींग, टायर, पेटींग असे उद्योग येत असतात. परंतु आमच्याकडे एकही उद्योग येत नाही. आमच्याकडे जागा उपलब्ध आहे परंतु तरी सुध्दा आमच्याकडे कोणतेही उद्योग येत नाहीत. आटो इंडस्ट्रीज एक तर नाशिकला जातात किंवा पुण्यात जातात परंतु विदर्भात येत नाही.

सभापती महोदय, विदर्भात चांगले अधिकारी आले पाहिजेत. परंतु चांगल्या अधिकाऱ्यांची विदर्भात येण्याची मानसीकता नसते. चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम, भंडारा, गोंदिया या जिल्हयांमध्ये अधिकाऱ्यांची जाण्याची इच्छा नसते. यामध्ये राजकीय उदासिनता असल्याचे आम्हाला दिसून येते.

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 20/11/2011 रोजी विधानसभेत जे भाषण केले होते त्यातील काही भाग मी या ठिकाणी वाचतो. त्यांनी म्हटले होते की, "पश्चिम विदर्भातील शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करीत आहेत. याबाबत शासनाकडून कोणतीही संवेदना दाखवली जात नाही. राज्य शासनाने विदर्भातील मराठी माणसाला आपले कधीच मानलेले नाही. शासनाकडून विदर्भातील मराठी माणसासाठी केवळ भाषणे दिली जातात. नागपूरमधील मराठी माणसास महाराष्ट्र हा संयुक्त महाराष्ट्र असल्याचे वारंवार सांगितले जाते. पण त्याच्या विकासाकडे मात्र लक्ष दिले जात नाही अशा प्रकारे विदर्भातील मराठी माणसाला दुय्यम दर्जा दिला जातो. गेल्या 15 वर्षात शासनाने खरे तर विदर्भातील मराठी माणसास नागरिकत्वही दिले नाही."

सभापती महोदय, आता या राज्याचे मुख्यमंत्री विदर्भाचे आहेत, महत्वाचे सर्व विभाग विदर्भाकडे आलेले आहेत. किमान आता तरी विदर्भातील मराठी माणसाला महाराष्ट्राचे नागरिकत्व दिले जाणार आहे काय ? या विदर्भाचे दुःख तुम्ही दूर करणार आहात काय ? विदर्भाच्या संदर्भात आपण विरोधी पक्षात असताना गेल्या 15 वर्षात ज्या ज्या उपाययोजना सुचविल्या होत्या त्याचे पालन केले जाणार आहे काय ? आता तुमचे सरकार केंद्रातही आहे आणि येथेही आहे. त्यामुळे तुम्ही विदर्भातील जनतेला न्याय देणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संदीप बाजोरिया .. ..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई यांनी कोळशाच्या संदर्भातील उल्लेख केला आहे त्यासंदर्भात मला त्यांचे समर्थन करावयाचे आहे. विदर्भातील वन विभागात वन कायद्यामुळे जे कोळशांचे साठे अडकले आहेत त्यासंदर्भातील वन विभागाच्या जाचक अटी दूर करुन या भागातील कोळसा खाणींना परवानगी दिली जाणार आहे काय ? एवढे सांगून आपण मला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले पुनश्च आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.जयवंतराव जाधव)** : विदर्भाच्या चर्चेवरील उत्तर आजच पूर्ण करावयाचे असल्यामुळे आता या पुढील वक्त्यांनी आपली भाषणे कृपया 5 मिनिटात पूर्ण करावे अशी विनंती आहे.

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनाला अनन्यसाधारण महत्व असते. परंतु नवीन पिढीचे लोक विचारतात की, नागपूरला अधिवेशन कशासाठी घेतले जाते ? वास्तविक नागपूरला जे अधिवेशन भरवले जाते ते नागपूर कराराच्या माध्यमातून भरले जाते. माननीय यशवंतराव चव्हाणांनी स्वातंत्र्याचा मंगलकलश आणला त्यावेळेस त्यांनी म्हटले होते की, आपल्या राज्याची भावनात्मक एकात्मता राखली गेली पाहिजे आणि त्यामध्ये आपण निश्चितच यशस्वी झालो आहोत. सभापती महोदय, आपण जेव्हा या आसनावर विराजमान होता त्यावेळी सन्माननीय सदस्य "जय विदर्भ, जय महाराष्ट्र, जय भीम, जय कोकण" असा गजर करीत असतात. यामागे प्रत्येक विभागातील आमदारांच्या भावना दडलेल्या असल्यामुळे अशा प्रकारच्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या जात असतात. योगायोगाने या सभागृहात विदर्भाचे अनेक प्रश्न मार्गी लागलेले आहेत. विदर्भाला आतापर्यंत चार मुख्यमंत्री मिळाले आहेत. पहिले मुख्यमंत्री माननीय दादासाहेब कन्नमवार, दुसरे मुख्यमंत्री माननीय वसंतराव नाईक, तिसरे मुख्यमंत्री माननीय सुधाकररावजी नाईक आणि आता चौथे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीस. याच विदर्भात संत गाडगेबाबा होऊन गेले आहेत. संत गाडगेबाबांनी स्वच्छता अभियान राबविले होते परंतु आता माननीय पंतप्रधान श्री. मोदी साहेबांनी स्वच्छता अभियांन हातामध्ये घेतले आहे. मुळात स्वच्छता अभियानाचे पुरस्कर्ते याच विदर्भात जन्माला आले होते. महात्मा गांधी तसेच संत विनोबा भावे यांचे महाराष्ट्रात अनेक वर्षे वास्तव्य होते. याच नगरीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाला ग्राम गीतेचा संदेश दिला. पूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे करोडो दलितांचे उध्दारकर्ते आहेत त्यांनी याच ठिकाणी दीक्षा घेतली होती व याच भूमीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असून संघाचा संपूर्ण देशाचा कारभार नागपूर मधूनच चालत असतो. त्यामुळे नागपूरमधील अधिवेशनाला अनन्यसाधारण महत्व आहे. (अडथळा) सभापती महोदय, आमचा जो भोळाभाबडा विदर्भवासी आहे, या ठिकाणचा आत्महत्याग्रस्त शेतकरी आहे तो या अधिवेशनाकडे डोळे लावून अपेक्षेने बसला आहे की, या अधिवेशनात काही तरी जाहीर होईल .

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड .. ..

पण अधिवेशन घेऊनही काहीच मिळाले नाही तर हा विदर्भातील शेतकरी म्हणेल की, तुम्ही नागपूरला येऊन काय दिले आहे ? बंद करा हे अधिवेशन, विदर्भातील शेतकऱ्यांना काहीच मिळत नसेल तर नागपूरला अधिवेशन कशाला पाहिजे, या नागपूर अधिवेशनाचा आम्हाला काय उपयोग आहे, अशी येथील जनतेस बोलण्याची वेळ येऊ देऊ नका. त्यामुळे आत्महत्याग्रस्त विदर्भवासींयाना काही देणार आहात की नाही ? तुम्ही विदर्भाला काय दिले आहे ? कर्ज माफी झाली काय, शासनाने आम्हाला काही दिले आहे काय यासंदर्भात आम्हाला येथील शेतकरी रोज फोन करुन विचारत असतात. मला त्यांना दुर्दैवाने सांगावे लागते की, अरे कसली कर्ज माफी घेऊन बसला आहात. खरे तर या ठिकाणच्या जनतेला आपण जे काही दिले आहे ते येथील जनतेला समजलेले नाही. लोक आम्हाला विचारत आहेत की, आम्हाला या सरकारने काही दिलेले नाही, उलट सावकारांचे कर्ज माफ केलेले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने या निर्णयाचा फेर विचार करावा. खरे म्हणजे तुम्हाला शेतीमधील कळतच नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. मी सुद्धा एक शेतकरी आहे. विदर्भामध्ये शेतकऱ्यांशिवाय कोणी जगू शकत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी "शेतकरी नसलेले लोक" असे जे वक्तव्य केले आहे ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे. कारण हा शेतकऱ्यांचा सुद्धा अपमान आहे.

**तालिका सभापती (श्री.जयवंतराव जाधव )** : सन्माननीय सदस्यांनी उच्चारलेले वाक्य तपासून काढून टाकण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, त्यांना शेतकऱ्यांचा कळवळा आहे की नाही. सन्माननीय सदस्या स्वत:वर का घेत आहेत ?

श्री.हरिसिंग राठोड: सभापती महोदय, आपण सावकारांना 370 कोटी रुपये दिले त्याचा फेरविचार करुन त्या संदर्भात एक समिती नेमण्यात यावी अशी माझी मागणी आहे. शेतकऱ्यांकडून 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून घेऊन त्यांच्या जमिनी बळकावण्यात आल्या आहेत. त्या संदर्भात न्यायालयात केसेस सुरु आहेत. आपण अशा शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. आमच्या दृष्टीने ते खरे सावकार आहेत. तेव्हा आपण याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जे भाषण केले त्याला मी पाठिंबा देतो. त्यांनी अतिशय चांगले भाषण केले. आपण विरोधी पक्षात असताना जसे भाषण करीत होता असते तसेच भाषण सत्ताधारी पक्षात असतानाही केलेले आहे.

सभापती महोदय, पैनगंगा प्रकल्प सुरु करण्यासाठी मागील दहा वर्षापासून प्रयत्न सुरु आहे. मुख्यमंत्री महोदयांनी यवतमाळ जिल्ह्यामध्ये बैठक घेतली होती त्यामध्ये त्यांची द्विधा मन:स्थिती दिसली होती. मी एका गोष्टीसाठी मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो कारण शेतीचे खरेदी-विक्रीचे व्यवहार थांबविण्यात आले होते त्याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देऊन ते व्यवहार पुन्हा सुरु करण्याचे आदेश दिले. जी गोष्ट चांगली झाली असेल त्याबाबत आम्ही निश्चितच अभिनंदन करु परंतु जी गोष्ट चुकीची असेल तर ती चुकीची आहे हे आम्हाला सांगितले पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड.....

सभापती महोदय, माझी या चर्चेच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, त्यांनी कर्जमाफीच्या संदर्भात फेरविचार केला पाहिजे. आपण शेतकऱ्यांचे पूर्ण कर्ज माफ केले पाहिजे. शेतकऱ्यांचा 7/12 उतारा कोरा करण्यात येईल अशी निवडणुकीपूर्वी घोषणा करण्यात आली होती.

सभापती महोदय, आमच्या सरकारने सामान्य माणसाला अधिकार देण्यासाठी आधार कार्ड योजना सुरु केली होती. आज आधार कार्ड हे गोरगरीबांची गरज आहे. अजूनही 50 टक्के लोकांनी आधारकार्ड काढलेले नाही. परंतु जेव्हा "जन धन" योजना आली तेव्हा लोकांनी बँकेत खाते उघडण्यासाठी रांगा लावल्या. कारण मोदी सरकार प्रत्येक खात्यामध्ये 15 लाख रुपये जमा करणार आहेत. या सरकारने गोरगरीब लोकांना भुरळ घातली आहे. हे सरकार धनगर समाज, कोळी समाज, बंजारा समाज, गोवारी समाज या सर्वांचे प्रश्न सोडविणार होते. धनगर समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करावा या विषयाची लक्षवेधी सूचना चर्चेला होती त्यावेळी सभागृहात थोडा गोंधळ झाला होता, आपण मला त्या लक्षवेधी सूचनेवर बोलू दिले नाही. धनगर समाजाला आरक्षण देणे हे महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारितील बाब नाही. सन 1967 मध्ये बंजारा आणि धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील विधेयक संसदेत चर्चेसाठी आले होते. हा समाज आरक्षणासाठी लागू असलेला क्रायटेरिया फूलफील करतो की नाही अशी मते काही खासदारांनी व्यक्त केल्यामुळे चंदा यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारची संयुक्त समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने देशभर दौरा करुन बंजारा आणि धनगर समाज सर्व क्रायटेरिया फूलफील करतात असा अहवाल दिलेला आहे. तेव्हा धनगर समाजाला अनुसूचित जातीसाठी असलेल्या सवलती देण्यात याव्यात अशी माझी मागणी आहे. हे विधेयक अजूनही केंद्र सरकारकडे प्रलंबित आहे. मागील चार महिन्यांपासून सांगत आहे की, हे काम मोदी सरकारने करायचे आहे. त्यावेळी सांगण्यात आले की, आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्ही तुम्हाला एक महिन्यात आरक्षण देऊ. आपण लोकांना अशाप्रकारचे आश्वासन देऊन सत्तेवर निवडून आला आहात. तेव्हा आपणास या प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

..3..



AJIT/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 16:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग  राठोड.....

सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यामध्ये झुडपी जंगलाचा प्रश्न आहे. त्या ठिकाणी शेतकरी पिढ्यानपिढ्या शेती करतात त्यांना 7/12 मिळत नाही, त्यांचे भोगवटा प्रमाणपत्र दोनचे एक होत नाही. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीक विमा योजना काढूनही त्यांना अजून पैसे मिळालेले नाहीत. गारपिटीमध्ये नुकसान झाल्याचे अजून पैसे मिळालेले नाहीत. अनेक शेतकऱ्यांना अजून मदत मिळालेली  नाही. माझ्या दारव्हा भागाकडे लक्ष द्यावे, अशी विनंती आहे. आज जनावरांना देण्यासाठी चारा नाही.

सभापती महोदय, माझे भाषण संपविण्यापूर्वी एवढेच सांगतो की, भोळेभाबडे लोक आपल्याकडून आशा लावून बसले आहेत, आपण त्यांना काहीही न देता येथून निघून गेलात तर आपली सुरुवात फार वाईट झाली हे लोकांना समजल्याशिवाय राहणार नाही. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या ठिकाणी विदर्भाच्या प्रश्नावर नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, कापूस, जंगले,पाणी, खनिज, वीज, सौरऊर्जा अशा नैसर्गिक वरदानाने समृद्ध असलेला विदर्भ प्रांत, हा निव्वळ सिंचन, उद्योग, रोजगार निर्मितीची कमतरता, नवीन प्रकल्पांचा अभाव प्रशासकीय साधनांची कमतरता या आधारामुळे एकेक दिवस मागास होत चालला आहे. या विभागाचा अनुशेष सतत वाढत असल्याचे आपल्याला दिसते. आपण येथे विकासाच्या बाबतीत चर्चा करीत असलो तरी विदर्भातील जनतेला मात्र वेगळा विदर्भ करण्याच्या भावनेने झपाटलेले आहे. आज विदर्भातील जनता "मुझे तुमसे कुछ भी नहीं चाहिए, मुझे मेरे हाल पर छोड दो" या मतावर येऊन पोहोचली आहे. विदर्भ मागासलेला का आहे ? 1956 मध्ये संविधानामध्ये 271 (2) हे कलम आणण्याचे कारण काय ? तत्कालीन वैदर्भीय नेते बापुजी अणे, ब्रिजलाल बियानी असो किंवा या सदनाचे अनेक वर्षे सदस्य राहिलेले प्रा.बी.टी.देशमुख साहेब असो या सर्वांना त्याचवेळी जाणीव झाली होती की, आपण संयुक्त महाराष्ट्रामध्ये गेलो तर आपणास योग्य न्याय मिळणार नाही. आपण बापुजी अणे यांची संसदेतील भाषणे वाचली किंवा त्यांचे राज्य पुनर्रचना आयोगासमोरील निवेदन वाचले तर विदर्भाच्या संदर्भात भविष्यात येणारे धोके या संदर्भातील विश्लेषण त्यांनी 60 वर्षापूर्वी केले असल्याचे दिसून येईल.

सभापती महोदय, या विदर्भाच्या इतिहासाची कोण काळजी घेत आहे, विदर्भाची चिंता कोण करीत आहे ? आपणास माहीत आहे की, गौंडराजे बुलेंद शहा यांनी ही नागपूर नगरी वसवली आणि तेथून आपला राज्य कारभार चालविला. त्यांनी छोट्या मोठ्या सिंचनाच्या सोयी करण्यापासून आदिवासी, गोरगरीब, अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांना घेऊन विदर्भ ते छत्तीसगड पर्यंतचे राज्य या नागपूर शहरातून चालविले.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ प्रस्तावावरील चर्चा उत्तरासह संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.अनिल सोले : महोदय, त्यानंतर नागपूरचे राघोजीराव भोसले यांनी नागपूर पासून निजामाशी लढाई देत ओरिसापर्यंत आपला प्रांत पोहचविला, एवढे मोठे विदर्भाचे राज्य आणि राजसत्ता या नागपूर नगरीतून आणि विदर्भातून चालवली. आप्पाजी भोसले यांची 1817 साली ब्रिटीशांसोबत झालेली बर्डी किल्ल्याची लढाई, या इतिहासाकडे महाराष्ट्रात सर्वत्र दुर्लक्ष होत आहे.

महोदय, डॉ.पंजाबराव देशमुख हे या भूमिचे पुत्र होते. त्यांनी कृषी क्रांतीचे जनक म्हणून या देशाची कृषी क्रांती आणि कृषी आधारित आर्थिक धोरण कसे असले पाहिजे, याची मांडणी केली. विदर्भाचे हे सर्व पुत्र विदर्भाच्या उन्नतीचे परिमाण ठरले.

महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी केवळ दोन-तीन गोष्टींकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. या ठिकाणी विश्लेषण करण्यात आले की, विदर्भावर कोणाकडून अन्याय होत नाही. महोदय, या संदर्भात मी माझी आकडेवारी पाच मिनिटात सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

महोदय, विदर्भात एसईझेड किती झाले ? विदर्भात 10 आणि उर्वरित महाराष्ट्रात 124 एसईझेड ॲप्रूव्हड झाले. त्यापैकी विदर्भात 8 आणि उर्वरित महाराष्ट्रात 64 नोटीफाईड झाले. तसेच त्यापैकी विदर्भात 2 आणि उर्वरित महाराष्ट्रात 17 एक्झीक्यूट झाले. ते दोन एसईझेड नागपूरमध्ये झाले आणि अमरावतीमध्ये एकही एसईझेड झाला नाही.

महोदय, दिनांक 31 डिसेंबर, 2012 च्या को-ऑपरेटीव्ह इंडस्ट्रीयल इस्टेटच्या स्टेटसनुसार असे लक्षात येते की, विदर्भात 20 आणि उर्वरित महाराष्ट्रात 142 प्रोजेक्ट सँक्शन झाले. त्यापैकी विदर्भात 7 आणि उर्वरित महाराष्ट्रात 101 चे फंक्शनिंग झाले. इंडस्ट्रीयल युनिटस् इन ऑपरेशनचा विचार केला तर असे लक्षात येईल की, विदर्भात 397 आणि उर्वरित महाराष्ट्रात 7222 झाले. शेअर कॅपिटल विदर्भात 1.2 कोटी आणि उर्वरित महाराष्ट्रात 16 कोटी झाले. त्यातून विदर्भात एम्प्लॉयमेंट जनरेशन 3992 आणि उर्वरित महाराष्ट्रात 1,37,082 निर्माण झाले.

..2..



श्री.अनिल सोले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, दिनांक 31 मार्च, 2012 नुसार इंडस्ट्रीयल युनिटस् इन एमआयडीसीचा विचार केला तर असे लक्षात येईल की, विदर्भात 4,276 युनिट आले आणि उर्वरित महाराष्ट्रात 35,691 आले. 2011-2012 ची आकडेवारी बघितली तर त्यावरुन असे लक्षात येईल की, विदर्भात 11,684 कोटीची गुंतवणूक झाली आणि उर्वरित महाराष्ट्रात 89,694 कोटीची गुंतवणूक झाली. महोदय, विदर्भाचे डायव्हर्शन ऑफ फंडस् कसे होते ते मी एका उदाहरणावरुन सांगतो. त्या दृष्टीकोनातून विचार करणे नितांत आवश्यक आहे. विदर्भात अलॉटेड फंड 2003 ते 2008-09 पर्यंतचा काढला तर लक्षात येईल की, विदर्भाला 387.64 कोटी रुपये कमी मिळाले. मराठवाड्याला 100.61 कोटी रुपये आणि उर्वरित महाराष्ट्राला 287.04 कोटी रुपये जास्त मिळाले. आपल्या लक्षात येईल की, उर्वरित महाराष्ट्रात एका वर्षात 1,175 कोटी ऐवजी 1,835 कोटी रुपये खर्च होतो. विदर्भात मात्र तो कमी होतो.

महोदय, विदर्भात होणाऱ्या अन्यायाच्या बाबतीत राज्यपालांच्या सचिवांनी 2008 साली एक उत्कृष्ट टिपण प्रकाशित केले आहे ते सभागृहाच्या निदर्शनास आणून मी माझे भाषण संपवितो. ते पुढीलप्रमाणे आहे. (संदर्भ-'संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) अंतर्गत प्राप्त झालेल्या विशेष अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राच्या राज्यपालांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना, आदेश व त्यांची फलनिष्पत्ती', वैधानिक विकास मंडळ शाखा, राज्यपालांचे सचिवालय, राजभवन, मुंबई, डिसेंबर, 2008). त्या टिपणीत असे नमूद केले आहे की, "सत्यशोधन समितीने प्रथम 1984 मध्ये आणि त्यानंतर निर्देशांक व अनुशेष समितीने 1994 मध्ये अनुशेष निश्चित केला तेव्हापासून प्रादेशिक असमतोल वाढत असल्याचे राज्यपालांच्या निदर्शनास आले. संपूर्ण अनुशेषामधील विदर्भाचा अनुशेष 1984 मध्ये 39.12 टक्के इतका होता तो वाढून 1994 मध्ये 47.26 टकके इतका झाला. याउलट, उर्वरित महाराष्ट्र प्रदेशाच्या बाबतीत 1984 मध्ये असलेला 37.32 टक्के अनुशेष कमी होऊन 1994 मध्ये 23.62 टक्के इतका झाला आणि पुढे तो 1 एप्रिल, 2000 रोजी 22.92 टक्के इतका कमी झाला. अशारीतीने अनुशेष दूर करण्यासाठी विशेष नियत वाटप करुन देखील विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये वर्षानुवर्षे प्रादेशिक तफावत सतत वाढत राहिली."

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण विधानसभा सभागृहात झाले आहे. त्या भाषणावरुन विदर्भातील जनतेला निश्चितपणे धीर आला आहे. एवढा मोठा अनुशेष येत्या पाच वर्षात भरुन काढणे अत्यंत कठीण आहे असे मला वाटते. त्या दृष्टिकोनातून सरकारने विदर्भासाठी विशेष पॅकेज देऊन तशी घोषणा करण्याची आवश्यकता आहे. एवढेच या निमित्ताने सांगतो व वेळेची मर्यादा लक्षात घेऊन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, विदर्भाच्या भूमीवर प्राचीन काळापासून विदर्भाचे नाव आहे. असे म्हटले आहे की, विदर्भामध्ये आदिमानवाची वसाहत पहिल्यांदा झाली. ॠग्वेद आणि उपनिषदांमध्ये सुध्दा विदर्भाचा उल्लेख आलेला आहे. विदर्भातील नद्यांचा सुध्दा उल्लेख त्यामध्ये आलेला आहे. वर्धा नदी, पयुषनी आणि वेणा या नद्यांचा त्यामध्ये उल्लेख झालेला आहे. वर्धा नदी म्हणजे आताची वर्धा नदी, वेणा म्हणजे आताची वैणगंगा नदी आणि पयुषनी म्हणजे आताची पूर्णा नदी होय. विदर्भाचा इतिहास हा प्राचीन आहे, हे या उल्लेखांवरुन दिसून येईल. ज्या अर्थी विदर्भातील नद्यांचा, राजांचा आणि राजपुत्रांचा उल्लेख येतो, त्याचप्रमाणे प्रसिध्द किंवा प्रख्यात जो विदर्भ होता तो तेथील राजकन्यांच्या उल्लेखामुळे होता. या उल्लेखांवरुन एक लक्षात येईल की, माझ्या विदर्भाने 7 हजार वर्षांपूर्वीच मिळविलेली ही कीर्ती होती. विदर्भाची स्थापना विदर्भ या राजाने केली. त्याचे नाव येथे घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. जामद नावाच्या राजाचा तो मुलगा होता आणि त्याचा वंश यदू होता. विदर्भाची राजधानी कौंडण्यपूर होती. त्यांच्या लोपामुद्रा, दमयंती, इंदुमती आणि रुक्मिणी सुध्दा राजकन्या होती. परंतु शेवटी ज्याला कालिदास म्हणून ओळख मिळाली त्याने 'मालविकाग्नी मित्र' या नावाने जे नाटक लिहिले ते सुध्दा विदर्भावरच लिहिले. या निमित्ताने ज्याचा उल्लेख केल्याशिवाय हा विषय संपणार नाही, ती बाब सांगणे आवश्यक आहे. मला या ठिकाणी विदर्भातील एका राजकन्येचा उल्लेख करावा लागेल. ती राजकन्या म्हणजे सिंदखेडराजाच्या लखोजी जाधव नावाच्या राजाची मुलगी होय. त्यांना आपण 'जिजामाता' म्हणून ओळखतो. त्या सुध्दा विदर्भाच्याच राजकन्या होय. ज्या विदर्भाने जिजाई दिली नसती तर माझ्या महाराष्ट्राला छत्रपती शिवराय मिळाले नसते. जो शिवाजी निधड्या छातीने म्हणतो की,

"मीच दिल्ली, मीच केरळ, मीच हिंदुस्थान आहे,
मरण ही माझे भुईला कुंकवाचे दान आहे,
शेवटी पण एक निश्चित, ते मला टाळू न शकती
मी युगाच्या वादळाने घेतलेली तहान आहे."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग....

अशा प्रकारे शिवछत्रपतींच्या राज्यामध्ये महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील एक अविभाज्य घटक असलेल्या विदर्भाच्या पावनभूमीत विदर्भातील सर्व समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी ही चर्चा घडवून आणली जाते. या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणातून विदर्भाची काय परिस्थिती आहे हे निदर्शनास आणून दिले आहे. महोदय, मला वेळेची मर्यादा असल्यामुळे मी जास्त खोलात जाणार नाही.

महोदय, नागपूरचे 1953 सालचे आमदार श्री.ए.बी.वर्धन यांनी नागपूर करारातील कलमांचा नवीन बिलात समावेश करुन काही दुरूस्त्या सुचविल्या होत्या. त्या दुरूस्त्यांना उत्तर देताना त्यावेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भातील जनतेला एक आश्वासन दिले होते आणि ते म्हणजे....

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. ख्वाजा बेग ....

"I wish to assure the people of the Vidarbha that they need have no apprehension that their legitimate interests will not be protected; on the other hand they will be zealously guarded and will be treated as a sacred trust of the future Maharashtra Government. The term of what is known as the Nagpur Pact will be honoured and wherever possible, something more will be done." याचा अर्थ एवढाच होतो की, त्यावेळी सुध्दा त्या वेळच्या राज्यकर्त्यांना असे वाटले होते की, आम्हाला न्याय मिळणार नाही. त्यामुळे कराराच्या रूपाने या सर्व गोष्टी समोर आणण्यासाठी त्यावेळी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी प्रयत्न केला होता. त्यानंतर दिनांक 26 जुलै, 1984 ला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये ठराव मांडण्यात आला. त्यामध्ये माननीय राष्ट्रपतींनी माननीय राज्यपालांना अधिकार दिले आणि 10 वर्षांनंतर दिनांक 9 मार्च, 1994 रोजी माननीय राष्ट्रपतींनी आदेश काढून महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांवर घटनेच्या अनुच्छेद 371 (2) अन्वये जबाबदारी दिली. संपूर्ण देशात विदर्भ हे एखादे, दुसरे राज्य आहे, असे मला वाटते. विदर्भातील सर्वात महत्तवाचा प्रश्न मी या निमित्ताने आपल्या समोर मांडणार आहे. सभापती महोदय, मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. मला थोडासा वेळा द्यावा. वेदांमध्ये सुध्दा असे सांगितले आहे की, "सत्वा नुरूपा सर्वस्व श्रध्दा भवती भारत, श्रध्दा मयो यं पुरूषो यं यच्छ:द्र: सएवस:" सभापती महोदय, माणूस हा आशादायी प्राणी आहे. ज्याची जशी आणि जेवढी अपेक्षा असते तसे आणि तेवढाच तो अपरिहार्य बनतो. त्यामुळे विदर्भात सुरूअसलेल्या अधिवेशनाच्या निमित्ताने मी हे सांगत आहे की, विदर्भवासी आपल्याकडे आशादायी नजरेने पाहत आहे. त्यामुळे मी आपल्याकडे 2-4 मिनिटांचा वेळ वाढवून मागितला. मी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या दिनांक 17.03.2012 च्या निदेशात दिल्याप्रमाणे, विदर्भात सिंचनाच्या सोयीकरिता गोदावरीच्या खोऱ्यातून 678 टीएमसी पाणी आणि तापीच्या खोऱ्यातून 95 टीएमसी पाणी असे एकूण 773 टीएमसी पाणी उपलब्ध आहे. 1 टीएमसी पाण्यातून जवळपास 4800 हेक्टर जमिनीत सिंचन निर्माण होते. विदर्भात शेती योग्य जमीन 57 लाख हेक्टर



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. ख्वाजा बेग ....

आहे आणि त्या अनुषंगाने विचार केला तर उपलब्ध पाण्यातून जवळपास विदर्भातील 65 ते 70 टक्के जमीन सिंचनाखाली येऊ शकते. आज सिंचन प्रकल्पाचे काम सिंचन महामंडळाकडे आहे. दु:खाची, दुर्दैवाची बाब अशी आहे की, या महामंडळाकडे शाखा अभियंता, उप अभियंता यांची 1932 पदे मंजूर असून 579 पदे म्हणजे 30 टक्के पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. आपण ज्या सिंचनाचा विचार करतो ते सिंचन अशी रिक्त पदे असतील तर कसे वाढेल ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी वन कायद्याचा उल्लेख केला. आपणाकडून त्या संदर्भात देखील लक्ष देणे गरजेचे आहे. गडचिरोली जिल्हा संपूर्णपणे नक्षलग्रस्त जिल्हा असून त्याच्या क्षेत्रफळातील जवळपास 80 टक्के क्षेत्र वनांनी व्यापलेले आहे. जिल्ह्यात गोदावरी खोऱ्यातील भरपूर पाणी उपलब्ध असूनही सिंचनाचे प्रमाण वनांच्या अडचणीमुळे वाढू शकत नाही.

सभापती महोदय, आपण वारंवार बेल वाजवित असल्यामुळे आता मी शेवटच्या टप्प्यात येतो. विदर्भात मोठ्या प्रमाणात अनुशेष आहे. आपण विदर्भातील अनुशेषाच्या भाषणाचाही अनुशेष निर्माण करीत आहात. गेल्या खरीप हंगामातील सोयाबीनचे कमी उत्पादन आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील विषमतेमुळे सोयाबीनच्या निर्यातीत 82 टक्क्यांनी घट झाली. हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. विदर्भाच्या संदर्भातील धोरणामुळे विदर्भातील धरणांमध्ये सर्वाधिक गाळ निर्माण झाला आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारितील सिंचन प्रकल्पांमध्ये जवळपास 5.36 टक्के गाळ आहे. गाळ साठल्यामुळे दरवर्षी सिंचन क्षमतेत सरासरी 0.25 टक्के घट होत असल्याचे निदर्शनास येत आहे. ही बाब देखील गंभीर स्वरूपाची आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, मागच्या कालखंडात यवतमाळ टेक्सटाईल पार्कची घोषणा करण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या हितासाठी यवतमाळ टेक्सटाईल पार्क बनविण्याची घोषणा होती. परंतु, अद्याप त्या संदर्भात पावले उचलण्यात आलेली नाहीत. जिल्ह्यातील 80 टक्के कापूस राज्याबाहेर असलेल्या कापड गिरण्यांना पुरविला जातो. तत्कालीन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री यांनी 6 टेक्सटाईल पार्क उभारण्यासाठी 110 कोटी रूपये मंजूर केले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3

श्री. ख्वाजा बेग ....

परंतु, 6 पैकी एकही टेक्सटाईल पार्क विदर्भात उभारण्यात आलेले नाही. यवतमाळ मधील लोहारा या एमआयडीसीतील जमिनींचे अधिग्रहण करून ती सुध्दा सेझमध्ये आली होती. आता सेझ बरखास्त करण्यात आल्याचे समजते. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. विदर्भातील झुडपी जंगले नष्ट होत आहेत. पर्यावरणाचे योग्य संतुलन राखण्यासाठी 33 टक्के जंगलाची आवश्यकता असल्याचे आताच बोलले गेले. विदर्भात 6 टक्के झुडपी जंगले आहेत. विदर्भातील 1,02,718 हेक्टरवरील वृक्ष नष्ट होत असल्याची भीती या निमित्ताने निर्माण झाली आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाटमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. कुपोषणाचा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. काही ठिकाणी धरणे आहेत. परंतु, विजेच्या कमतरतेमुळे धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थती होत आहे. अमरावती विभागातील 5 जिल्हे आणि वर्धा जिल्हा यांमध्ये 16,378 सिंचन विहिरींची कामे प्रलंबित असून धडक सिंचन योजना व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना यामधील ही संख्या आहे. ही संख्या अतिशय कमी असून हे गंभीर आहे. सरकारने माझ्या विदर्भाला जाता जाता काही तरी द्यावे असे वाटते. सरकारकडे करण्याची क्षमता असेल तर ते जरूर होईल. विदर्भातील जनतेचा विश्वास, आत्मविश्वास वाढावा या दृष्टीने, "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" असे शासनाने विदर्भातील शेतकऱ्यांना सांगितले तर बरे होईल असे वाटते. आपण तसे कराल, अशी आशा आहे. धन्यवाद !

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बऱ्याच प्रतिक्षेनंतर बोलण्याची संधी मिळत आहे, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. मी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे.

विदर्भाच्या प्रश्नांची, विकासाची चर्चा अत्यंत सुंदर रितीने होत आहे. चर्चेची सुरुवात सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी केली. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी उत्कृष्ट प्रकारची स्टॅटिस्टिकल माहिती दिली. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य प्रा. अनिल सोले, सन्माननीय सदस्य सर्वश्री हरिसिंग राठोड, ख्वाजा बेग इत्यादी मित्रांनी यावर भाषणे केली आहेत. विदर्भाच्या प्रश्नावर बोलताना सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, विदर्भाच्या विकासासाठी आम्ही कोणत्याही प्रकारचा त्याग करायला तयार आहोत. मी सांगू इच्छितो की, आम्हाला तुमच्या त्यागाची गरज नाही. विदर्भाला त्यांचा हक्क पाहिजे, अधिकार पाहिजे. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे की, मांगने से जो नहीं मिलता, उसको छीन कर लेना, उसके लिए चाहे कोई भी कुर्बानी देनी पड़े तो जरूर देना. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस बोलल्या पाहिजे होत्या. पण का बोलल्या नाहीत, हे कळत नाही. माननीय मुख्यमंत्री स्वत: म्हणतात की, वेगळा विदर्भ होईलच. तेव्हा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना घाबरण्याची काय गरज आहे, हे मला समजत नाही. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, विदर्भाचे व्हिलन आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

नागपूर करारानुसार विदर्भ महाराष्ट्रात विलीन झाला, त्या नागपूर कराराचे ज्यांनी इमानेइतबारे पालन केले नाही, ते व्हिलन आहेत. ज्यांनी शब्द पाळला नाही, ते व्हिलन आहेत. पण त्या व्हिलनचे नाव घेण्यास तुम्ही का घाबरता ? सकाळ वृत्तपत्राचे संस्थापक, संपादक माननीय नानासाहेब परुळेकर यांनी त्यांचे आत्मचरित्र लिहिले आहे. त्या आत्मचरित्रात त्यांनी विदर्भ राज्याचा पुरस्कार केला आहे. आपण कदाचित ते वाचले असेल. त्यांनी वेगळ्या विदर्भ राज्याचा पुरस्कार केला म्हणून पुण्यातील मंडळींनी त्यांच्या घरावर मोर्चा नेऊन दगडफेक केली. पुण्यात राहून विदर्भाचा कैवार घेणारा हा माणूस कोठे आणि विदर्भात येऊन, विदर्भाच्या छातीवर बसून, विदर्भाच्या विकासाची नरडी दाबण्याचे प्रयत्न करणारे आमचे हे लोक कोठे, असा प्रश्न आमच्या सारख्या कार्यकर्त्यांपुढे निर्माण होतो.

सभापती महोदय, नागपूर करार हा साधा नाही. इतिहास घडविणारी माणसे इतिहास विसरत नसतात आणि इतिहास विसरणारी माणसे कधी इतिहास घडवू शकत नाहीत. म्हणूनच आमचा सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे असा आग्रह आहे की, आता इतिहास घडविण्याची जबाबदारी तुमच्यावर आलेली आहे. एकनाथराव खडसे साहेब आपण विदर्भाचे जावई आहात. तुमची जबाबदारी जास्त आहे. आपण विदर्भाचे जावई आहात, हे मला माहीत नव्हते. पण समजल्यानंतर मला फार आनंद झाला. आता ही जबाबदारी आपली आहे.

सभापती महोदय, मी आकडेवारीमध्ये जाणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी चांगली आकडेवारी मांडली आहे. सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग यांनी देखील चांगले विषय मांडले आहेत आणि आता सन्माननीय सदस्य, आमचे मित्र श्री.प्रकाश बिनसाळे हे देखील त्यांच्या भाषणात या विषयावर अधिकचा प्रकाश टाकतील.

सभापती महोदय, पुराणामध्येही विदर्भाचा उल्लेख आहे. सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग यांनी रुक्मिणीचा संदर्भ दिला आहे. वर्धा जिल्ह्यात अमरावतीच्या बॉर्डरवर वर्धा नदी वाहते. तेथे कौंडिण्यपूर नावाचे गाव आहे. कौंडिण्यपूरचे राजे होते व राजकन्या रुक्मिणी होती. हा इतिहास तुमच्याच पुराणात आहे. पुराण तुमचे, वेद तुमचे, गीता तुमची, रामायण तुमचे, महाभारत तुमचे,

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

तुम्हीच हे सांगता, आम्ही सांगत नाही. तुम्हीच हे लिहिले आहे, आम्ही नाही. आम्हाला लिहिण्याचा, वाचण्याचा अधिकारही नव्हता. आम्ही काय लिहिणार ? श्रीकृष्ण महाराजांनी रुक्मीणीहरण केले आणि राजकन्येला कौंडिण्यपूरहून वृंदावनाला नेले. हे पुराणातील दाखले आहेत, वांगी नाहीत. 'मेघदूत' हे महाकाव्य कालिदासाने लिहिले. आजही जगभर त्या मेघदूताचा गौरव केला जातो. मेघाच्या माध्यमातून प्रेयसीला संदेश पाठविण्याची कल्पना किती फॅन्टॅस्टिक आहे नाही ? आजच्या प्रेमविरांना या कल्पना सुचतात की नाही माहीत नाही. त्यांचे सर्व वॉटस्ॲप, एसएमएस वर सुरु असते. सभापती महोदय, पुराणामध्ये विदर्भ आहे. सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग यांनी इतिहास सांगितला. लोक इतिहास सांगण्यास का घाबरतात मला समजत नाही. ज्या जिजाऊ माँ साहेबांनी कर्तबगार शिवबा घडवला आणि त्याने अटकेपर्यंत झेंडा लावला, पानिपतपर्यंत ते गेले, मोठमोठ्या सैन्याला ज्याने घाम फोडला, त्या शिवबाने महारांना बरोबर घेतले, मांगांना बरोबर घेतले, मावळ्यांनाही घेतले, सर्वांना घेऊन फौज तयार केली आणि त्या फौजेला 'मावळ्यांची फौज', असे नाव दिले. ती फक्त मराठ्यांची फौज नव्हती. बारा बलुतेदार, सर्व जाती, आदिवासी, महार, मांग, ढोर, ब्राह्मण, सर्वांना बरोबर घेतले आणि मावळ्यांची फौज उभी केली. पण आज राहिले ते मावळे, उडाले ते कावळे, अशी परिस्थिती आहे. हा इतिहास आहे. जिजाऊ माँ साहेबांचा जन्म सिंदखेडराजा मध्ये झाला. त्या जिजाऊं माँ साहेबांनी काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत ज्यांची पूजा केली जाते, वंदना केली जाते, असा छत्रपती शिवरायांसारखा कर्तबगार, शूरवीर राजा आपल्याला दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखा माणूस, ज्याने रक्ताचा एकही थेंब न सांडवता धम्मक्रांती केली. आज संपूर्ण भारतात धर्मांतराची चर्चा सुरु आहे. लोकसभेतही सुरु आहे. हे स्वातंत्र्य राज्यघटनेने आपल्याला दिले. रक्ताचा एकही थेंब न सांडवता त्यांनी क्रांती केली. ही जगातील एकच अशी क्रांती आहे. अन्यथा, जगातील प्रत्येक क्रांतीला रक्ताचा, रक्तलांछित क्रांतीचा इतिहास आहे. मग ती युरोपची क्रांती असेल, फ्रान्सची क्रांती असेल, रशियाची क्रांती असेल, कामगारांची क्रांती असेल, माओंची क्रांती असेल, प्रत्येक क्रांतीमध्ये लक्षावधी लोकांचे रक्त रस्त्यावर सांडले, तेव्हा कोठे परिवर्तन

...3.....



SRR/ प्रथम श्री.मंगेश........ 17:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आले. पण हातात शस्त्र न घेता, रक्ताचा एकही थेंब न सांडविता, लक्षावधी लोकांचे समतेच्या, बंधुत्त्वाच्या, न्यायाच्या, माणुसकीच्या प्रवाहात आणणारे परिवर्तन ज्या क्रांतीने केले, ती धम्मक्रांती याच भूमीत, विदर्भात घडली. या देशाचे सरकार जेथून चालते, ती संघभूमी देखील येथेच आहे. देशाचे सरकार चालविणारे रिमोट येथेच आहे. माणुसकीचे रिमोट दीक्षाभूमीवर तर सरकारचे रिमोट संघभूमीवर.

सभापती महोदय, हे सर्व सांगण्याचे कारण हे आहे की, अनुशेषाची चर्चा आपण करतो. आम्ही शेषाचे नाव ऐकले होते. अण्णाभाऊ साठे काय म्हणतात माहीत आहे ना आपल्याला ? आपल्या ग्रंथामध्ये असे लिहिले आहे की, "पृथ्वी शेषाच्या फण्यावर तरलेली आहे." पण आण्णाभाऊंनी सांगितले की, "ही पृथ्वी शेषाच्या फण्यावर नाही तर कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे." हा तळहात जर उलटा झाला तर काय होईल, याचे भान सरकारने ठेवले पाहिजे. देऊन टाका ना विदर्भ, कशाला झंगट पाहिजे, कशाला चर्चा पाहिजे ? किती किती गोष्टींचा अनुशेष आहे ? तुम्हाला वाईट वाटेल, सगळ्यांना पाझर फुटेल, एवढ्या विदर्भाच्या जनतेला हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. आत्महत्या सर्वात जास्त कोठे झाल्या, येथेच तर विदर्भात झाल्या आणि आमच्या बाजूला असलेल्या मराठवाड्यात झाल्या. आमच्या मित्रांनी सांगितले की, मेळघाटात आदिवासी बालकांचे कुपोषणामुळे प्राण चालले आहेत, ते मरत आहेत. त्यांचे प्राण कुपोषणाने नाही तर उपासमारीने चालले आहेत. ते उपोषणमुळे मरत आहेत. पण आपण 'कुपोषण,' असे गोंडस नाव त्याला दिले आहे. खरे तर ते कुपोषणाने मरतात, उपासमारीने मरतात. आदिवासी माऊलीच्या पोटात भाकर नाही, आदिवासी माऊलीच्या पोटात भाकर नाही म्हणून छातीत दूध नाही, छातीत दूध नाही म्हणून आपल्या लेकराला ती दूध पाजू शकत नाही, त्यामुळे त्या आदिवासी माऊलीच्या खांद्यावर रडता रडता ती लेकरे प्राण सोडतात, मरुन जातात. इतक्या वर्षाच्या महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरही विदर्भातील माऊलींची ही अवस्था आहे. आपण कुत्र्यांना 40-40 रुपयांची बिस्किट खाऊ घालता. कुत्र्याला चॉकलेट, आईसक्रीम आणि आमची

...4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

आदिवासी माऊली लेकराला शाळेमध्ये पाठविते, शेतात, रानात जाते आणि शाळेतून आमचे लेकरु फाटकी, तुटकी चड्डी घालून, फाटके, तुटके शर्ट घालून, कसे तरी हातात दप्तर घेऊन घरी येते. मॉ भूक लागली म्हणून आईचा पदर ओढते, दहा दहा वेळा म्हणते, भूक लागली, भूक लागली, पण घरात दाणा असेल तर देईल ना लेकराला खायला ?

यानंतर श्री.मा.शिगम........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 17:30

प्रा. जोगेंद्र कवाडे....

शेवटी ती माता वैतागून पोराच्या पाठीत धपाटा घालते. पोरगे बिचारे रडत रडत झोपी जाते. दुसऱ्या दिवशी हे आदिवासी लेकरु उठून शाळेत जायला लागते आणि जाता जाता आईला विचारते की, माय मी रात्री तुझ्याकडे फक्त भाकरच मागितली होती, तरी तू मला का मारले. ती माता काय उत्तर देणार. धावत जाऊन ती माता लेकराला छातीशी कवटाळते आणि म्हणते, जा लेकरा जा, मी काहीही करीन आणि दुपारी तुला शाळेमध्ये भाकर आणून देईन. अशी विदर्भाची अवस्था आहे, व्यथा आहे. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे. "जिस तन लागे वही तन जाने, दर्द पराया क्या जाने रे. अशी आमच्या विदर्भाच्या जनतेची अवस्था झाली आहे. नद्या, नाले, धरणे, जंगले, खनिज, खाणी इत्यादी सर्व विदर्भामध्ये आहे. विदर्भामध्ये काय नाही ? विदर्भामध्ये काय नाही त्याचे फक्त नाव तुम्ही सांगा, You name it and I will show it. अशी एकही गोष्ट नाही, जी विदर्भामध्ये नाही. महाराष्ट्रामध्ये विदर्भ पाहिजे कारण वन विदर्भामध्ये आहे. म्हणून विदर्भ आपणास पाहिजे. कधी कधी कशाचे जास्त वाईट वाटत असेल तर ते या उपेक्षेचे, या अनास्थेचे वाटते. एखाद्या महाराष्ट्राच्या वसाहतीसारखी या विदर्भाची अवस्था झालेली आहे. भारत देशाला इंग्रजांनी वसाहतीचे रूप दिले आणि इंग्लडचे वैभव वाढविण्यासाठी आमच्या देशाचे दोहन केले, शोषण केले. ही इंग्रजांची नीती महाराष्ट्रामध्ये विलीन झाल्यानंतर विदर्भाचे दोहन करुन, शोषण करुन महाराष्ट्राचे वैभव वाढवित आहात काय ? वाढवा ना वैभव. व्हा तुम्ही श्रीमंत. तुम्ही पुरणपोळी खा, पंचपक्वान्ने खा. पण विदर्भातील जनतेला कमीत कमी कष्टाची भाकर तरी इभ्रतीने खाण्याचा अधिकार द्या. आज ही परिस्थिती आहे. सांगण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. शिक्षणाचा अनुशेष आहे, सिंचनाचा अनुशेष आहे, उद्योगाचा अनुशेष आहे. विदर्भामध्ये कापूस पिकतो म्हणून जमशेदजी टाटांनी पहिल्यांदा या नागपूरमध्ये इम्प्रेस मिल काढली. त्यानंतर मॉडेल मिल काढण्यात आली. या मिल कुठे बेपत्ता झाल्या. विदर्भातील सर्व कापड गिरण्या बंद झाल्या. विदर्भात कापूस पिकतो आणि सूत गिरण्या इचलकरंजीमध्ये चालतात. विदर्भात कापूस पिकतो आणि कापडाचे कारखाने पश्चिम महाराष्ट्रात चालतात. आमचे पश्चिम महाराष्ट्राशी भांडण नाही. आमचे भांडण कुणाशीच नाही. आम्ही आमच्या व्यथा आपणाला सांगायच्या नाही तर कुणाला सांगायच्या.

..2..

प्रा. जोगेंद्र कवाडे....

सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आमचा अनुशेष आहे. पुण्या-मुंबईचा कलावंत असेल तर टी.व्ही.वर, सिनेमात, वर्तमानपत्रामध्ये दिसतो. पण आमचा विदर्भातील कलावंत साध्या पेपरमध्ये सुध्दा दिसत नाही. त्याला भाव नाही. आमच्या विदर्भामध्ये किती तरी कलावंत आहेत. शाहीर विठ्ठल उमप हे केवढे मोठे कलावंत. ते दीक्षाभूमीवर आले आणि दुर्दैवाने तेथेच त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचा गौरव देशामध्ये झाला, महाराष्ट्रामध्ये झाला. एलकुंचवार, नाटककार धारवेकर, कवी ग्रेस, राम शेवाळकर हे सर्वजण विदर्भातील आहेत. कवी ग्रेस यांच्या कवितांचे भाषांतर जगातील अनेक भाषांमध्ये झाले. बाबा आमटे हे विदर्भातील आहेत. बाबा आमटे यांचा जेथे आश्रम आहे त्या भामरागडला पाच नद्यांचा संगम होतो आणि ती प्राणहिता नदी होते. पुढे आंध्रामध्ये ती गोदावरी होते. जेव्हा चेवेला धरण झाले त्यावेळी आम्ही शासनाला सांगितले होते की, धरणासाठी पाणी विदर्भातून जात आहे. धरण आंध्रमध्ये बांधले जात आहे. आंध्र सरकार बरोबर करार करुन त्या धरणातील किती पाणी महाराष्ट्र राज्याला मिळेल, किती वीज महाराष्ट्र राज्याला मिळेल हे ठरवा. पण आमच्या सरकारने ते ठरविले नाही. कारण ते पाणी विदर्भाचे होते. मग विदर्भाचे राहिले काय आणि गेले काय, विदर्भाबद्दल काही देणे घेणे नाही. ही अनास्था, उपेक्षा किती दिवस सहन करणार. सर्व क्षेत्रामध्ये मग ते शिक्षणाचे क्षेत्र असेल, सिंचनाचे क्षेत्र असेल, उद्योगाचे क्षेत्र असेल, वनाचे क्षेत्र असेल, खनिज संपत्तीचे क्षेत्र असेल, साहित्य- संस्कृतीचे क्षेत्र असेल, या सर्व गोष्टींचा अनुशेष आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड या नक्षलवादी भागाचा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी उल्लेख केला. हा नक्षलवाद आमच्याकडे आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे इकडे नक्षलवाद का नाही ? हा नक्षलवाद थोडा तिकडे घेऊन जा.आता विदर्भवाद्यांना तिकडे येऊन नक्षलवादी बनावे लागेल. कृपा करुन ती वेळ येऊ देऊ नका. आमच्याकडेच सर्व संकटे आहेत, त्यामुळे विकासाचे प्रश्नही आमच्याकडे आहेत. विकासाशी आमचा संबंध आलेला नाही. विदर्भातील हुमन प्रकल्प, तुलतुली प्रकल्प का अडले ? पश्चिम महाराष्ट्रातील लोक हुशार आहेत. आमचा विदर्भ हा साधाभोळा आहे. आता कुठे थोडे थोडे कळायला लागले म्हणून वळवळ करायला लागलो. तुलतुली आणि हुमन प्रकल्प जंगलाच्या प्रश्नामुळे अडले. मी खासदार असताना राज्याच्या वनमंत्र्यांना बोलावून दिल्लीला बैठक घेतली होती. त्यावेळी भारतीय

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

जनता पक्षाचेच सरकार होते. तुलतुली आणि हुमन प्रकल्पावर कोटयवधी रुपये खर्च करुन देखील ते प्रकल्प होऊ शकले नाहीत. विदर्भ व्यापार-उद्योगामध्ये देखील मागासलेला आहे. विदर्भाच्या विकासाच्या संदर्भात विदर्भाचा खैरलांजी आणि जवखेडा करुन टाकलेला आहे. विदर्भाच्या विकासाचा सत्यानाश करुन टाकला आहे. व-हाड आणि सोन्याची कु-हाड असणा-या विदर्भाच्या हातात भिकेचा कटोरा आहे. विदर्भाला मागावे लागते. हे चालणार नाही. विकासामध्ये ज्या ज्या गोष्टी बसतात त्या सर्वांचा अनुशेष विदर्भामध्ये आहे. याचे एकच उत्तर आहे की, आम्हाला वेगळया विदर्भाचे राज्य देऊन टाका एवढे या सरकारला सांगून मी माझे भाषण संपवितो.

---

नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, यापूर्वीच्या वक्त्यांनी केलेली प्रभावी भाषणे आम्ही ऐकली. बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे महाराष्ट्र शासनाचे ब्रीद असले पाहिजे. या राज्यातील कोणताही नागरिक सत्तेच्या परिणामामुळे पोळू नये, दुखावला जाऊ नये. या देशात सहा महिन्यापूर्वी सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यातून केंद्रस्थानी सत्ता परिवर्तन झाले. निवडणुकीपूर्वी संपूर्ण देशात अच्छे दिन आयेंगे अशा जाहिराती प्रसिध्द केल्या गेल्या. जनतेने त्या जाहिरातींकडे पाहून मतदान केले. भारतीय जनता पक्षाचे सरकार पूर्ण बहुमत मिळवून सत्तेवर आले. निवडणुकीपूर्वी सर्वच वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर भ्रष्टाचार, अत्याचार, बलात्कार, दहशतवादी हल्ले, आत्महत्या यांच्याच बातम्या वाचायला मिळत होत्या. सत्ता परिवर्तन होऊन नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर अशी अपेक्षा होती की, वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर वेगळया बातम्या वाचायला मिळतील. लोकांना न्याय मिळेल, समान हक्क मिळेल, कोणताही अनुशेष राहणार नाही. लोकांनी तसे स्वप्न पाहिले होते. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अच्छे दिन येतील अशी लोकांना अपेक्षा होती. परंतु पूर्वीच्या सरकारच्या काळात शेतकऱ्यांच्या जेवढ्या आत्महत्या होत होत्या त्यापेक्षा जास्त आत्महत्या होत आहेत, अल्पवयीन बालिकांवर अत्याचार होत आहेत, बलात्कार होत आहेत. मी म्हणेन की,

"हवा के रुख बदलते हैं तो चिराग के कोने जलते हैं,
मोदी जी ने इस महाराष्ट्र को कहां लाकर खड़ा कर दिया,
अभी तो बर्फ छूने से भी हाथ जलते हैं"

सभापती महोदय, विधानसभेत विरोधी पक्षात असताना माननीय महसूल मंत्री यांनी केलेली भाषणे, माननीय मुख्यमंत्री यांनी केलेली भाषणे आम्हाला आदर्श ठरली होती. आज ते विरोधी पक्षात असते तर या प्रश्नावर अधिक प्रकाश टाकू शकले असते. विदर्भाचे राज्य व्हावे ही संकल्पना 100 वर्षापूर्वी मांडली गेली होती. परंतु वैदर्भीय जनतेचे दुर्भाग्य असे की, विदर्भाच्या स्वतंत्र राज्याला अद्याप मान्यता मिळाली नाही. विदर्भ जागच्या जागी राहिला, त्यामुळे दिवसेंदिवस अनुशेष वाढत गेला. केळकर समितीच्या अहवालानुसार विदर्भाचा अनुशेष 5 लाख कोटी रुपयांवर गेला आहे. केळकर समितीचे मत आहे की, विदर्भाला 35 टक्के आणि मराठवाड्याला 31 टक्के विकास निधी दिला पाहिजे. निश्चितपणे आमच्या सरकारकडून त्या पध्दतीने अपेक्षा आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आघाडी सरकारच्या ध्येयधोरणावर, उपाययोजनांवर टीका करण्यात आली होती. काही चुका झाल्या असतील, नाकारुन

...2..



श्री.प्रकाश गजभिये.....

चालणार नाही. परंतु अमरावती विभागातील सिंचन क्षेत्र लक्षात घेतले तर सिंचन विकासासाठी आघाडी सरकारने 2243 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले होते, त्यातील 1247 कोटी रुपये खर्च होऊ शकले नाहीत. विभागातील प्रत्येक जिल्हयासाठी निधी उपलब्ध करुन दिला होता, त्यातील बराच निधी खर्च होऊ शकला नाही. सिंचनाच्या संदर्भात विदर्भामध्ये वातावरण तयार केले गेले. त्याचा आघाडी सरकारला फटका बसला. विदर्भाच्या पर्यटनाचा विषय आहे, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विदर्भातील खनिज संपत्तीची विस्तृत आकडेवारी दिली आहे. विदर्भामध्ये मोठया प्रमाणात कापूस उत्पादन घेतले जाते, कच्चा माल उपलब्ध आहे. विदर्भ हा कोणत्याही राज्यापेक्षा कमी नाही.

सभापती महोदय, या राज्यात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना पक्षामध्ये निवडणुकीनंतर युती झाली. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवडणुकीपूर्वी जाहीरपणे भूमिका मांडली होती की, आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर निश्चितपणे वेगळ्या विदर्भाचा विचार करु संयुक्त महाराष्ट्राचा करार झाला तेव्हा विदर्भाचा समावेश महाराष्ट्रात झाला. 105 हुतात्म्यांच्या बलिदानानंतर हे राज्य अस्तित्वात आले. पंडित नेहरु म्हणाले होते की, एक प्रदेश केला तर मुंबई मिळेल, अन्यथा गुजरातकडे जाईल. त्यावेळी आम्हाला गुजरातमध्ये जावे लागेल की काय अशी मुख्यमंत्र्यांना भीती वाटत होती. आता त्यांना नेहमी गुजरातकडे जावे लागते हे नाकारता येणार नाही. मुख्यमंत्री कार्यक्षम आहेत. परंतु माननीय पंतप्रधानांमुळे ते निर्णय घेऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. विरोधी बाकावरुन सत्ताधारी बाकावर गेल्यानंतर दृष्टी बदलली ही शोकांतिका आहे.

सभापती महोदय, नागपूरमधील मिहान प्रकल्पाची 2002 मध्ये घोषणा करण्यात आली आणि आज 12 वर्षे उलटूनही हा प्रकल्प रेंगाळलेला आहे. मिहान प्रकल्पाच्या दृष्टीने दुसरी धावपट्टी उभारण्यात आलेली नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमाने नागपूर येथून उड्डाण करु शकत नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे की, 2019 पर्यंत नवी मुंबईच्या विमानतळावरुन आंतरराष्ट्रीय विमाने उड्डाण करतील, त्याच धर्तीवर नागपूरच्या विमानतळावरुन आंतरराष्ट्रीय विमाने उड्डाण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करतील अशी घोषणा करण्यात यावी. नागपूर हे उप राजधानीचे शहर आहे. मुंबई शहराला शांघाय शहर बनविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मग या उप राजधानीच्या शहराला टोकिओ शहरासारखे बनविणार की न्यूयॉर्क शहरासारखे बनविणार हे स्पष्ट केले पाहिजे.

नंतर 2एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये .........

मिहान प्रकल्पातील दोन अपंग व्यक्तींची जमीन गेली त्यातील एकाचा हक्क डावलण्यात आला व केवळ एकाच अपंगाला न्याय मिळाला पण दुसऱ्या एकाचा हक्क नसतांनाही त्याला मोबदला देण्यात आला. अजूनही ही एक अपंग व्यक्ती न्याय मिळण्याच्या प्रतिक्षेत आहे. मिहान भागातील एअरपोर्ट साठी 58 कोटीची सध्या गरज आहे पण हे शासन तेवढी रक्कम सुध्दा देऊ शकत नाही. नागपूर मध्ये जो मेट्रो प्रकल्प घोषित करण्यात आला त्यासाठी 10 हजार कोटीचा खर्च आहे. यामध्ये नागपूर महापालिकेने 2500 कोटी आणि शासनाने 2500 कोटी एवढी रक्कम द्यावयाची आहे. पण आमच्या नागपूर महानगरपालिकेची इतकी दयनीय अवस्था आहे की, दर महिन्याच्या 5 तारखेपूर्वी होणारे कर्मचाऱ्यांचे पगार महिन्याच्या 20 तारखेपर्यंत सुध्दा ही महापालिका देऊ शकत नाही. मग मिहानसाठी एवढी रक्कम कोठून आणि कशी भरणार हा खरा प्रश्न आहे. शासनाकडे नागपूर महापालिकेला 500 कोटी रुपये देण्याची मागणी केलेली आहे पण तेवढी रक्कम सुध्दा हे शासन देऊ शकत नाही. तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांनाही हे सरकार मदत देऊ शकत नाही म्हणून माझी मागणी आहे की, नागपूर या उपराजधानीसाठी किमान 58 कोटी रुपये एअरपोर्टसाठी तातडीने द्यावेत अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------------

...........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले........ 17:50

श्री. मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विदर्भासंबंधी नियम 260 अन्वये सभागृहात सुरु असलेल्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मी काही ठराविक मुद्देच या ठिकाणी मांडलणार आहे. याचे कारण अनेक वक्त्यांनी अत्यंत चांगले मुद्दे उपस्थित केलेले आहेत. विदर्भात मूळ प्रश्न सिंचन प्रकल्प पूर्ण होण्यातील अडथळे यासंबंधीचा असून 70 ते 80 टक्के प्रकल्प पूर्ण झालेले आहेत त्याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. विदर्भात प्रामुख्याने प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यता या वादात काही प्रकल्प अडलेले आहेत. मी गोसी-खुर्द या प्रकल्पाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता सन 1980 मध्ये फक्त 400 कोटीचीच मिळाली. त्यासाठी तीन वर्षापूर्वी ॲप्लीकेशन करण्यात आले होते. पण अर्ज केल्यानंतर प्रत्यक्षात प्रशासकीय मान्यता मिळते त्या दिवशी त्या प्रकल्पाची किंमत खूपच वाढलेली असते. अशा प्रकारे सन 1980 पासून एस्कॅलेट केले तर आजची या प्रकल्पाची किमत 25 हजार कोटीपर्यंत झालेली आहे. याउलट प्रत्येक वेळेस आवश्यक तो निधी या प्रकल्पाला मिळाला असता तर कमी किमतीतच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला असता. पण मधल्या काळात जो इरिगेशन स्कॅमचा गवगवा झाला त्याची चौकशी होईलच पण विदर्भातील प्रकल्पांच्या सुधारित मान्यता आज थांबलेल्या आहेत आि त्यातील अडचणी दूर करुन या मान्यता देण्याची गरज आहे. तसेच विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यात प्रामुख्याने वन कायद्यामुळे अनेक प्रकल्प रखडले जातात. विदर्भातील प्रकल्पाच्या बाबतीत मुंबईचा एखादा माणूस तक्रार करतो त्यामुळे कोठे ना कोठे प्रकल्पात अडचणी निर्माण होतात. वास्तविक मुंबईचा माणूस या प्रकल्पाच्या ठिकाणी कधी आलेलाच नसतो. सिव्हील वर्क करताना काही चुका होत असतात आणि जो चुकला असेल त्याला शिक्षा मिळाली पाहिजे या मताचा मी आहे.

महोदय, गडचिरोली हा जिल्हा नक्षलग्रस्त जिल्हा असून जंगलांचे जे प्रमाण या जिल्ह्यासाठी लागू आहे ते 20 टक्के आहे, त्याउलट या जिल्ह्यात 76 टक्के जंगल आहे, हे सुध्दा कारण प्रकल्प अपूर्ण राहण्यामागे आहे.

दूसरा मुद्दा म्हणून विदर्भात रोजगार निर्मितीसाठी जो "टफ" नावाचा कायदा आणि वस्त्रोद्योग धोरण आणले त्यामुळे एकही सूत गिरणी विदर्भाच्या वाट्याला आलेली नाही. माझा मुद्दा

...........3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मितेश भांगडिया ........

असा आहे की, ज्या सवलती यासाठी देण्यात येतात त्या यंत्रसामुग्रीवर म्हणजेच भांडवलाच्या 10 टक्के अनुदान दिले जाते. वास्तविक संपूर्ण प्रोजेक्टच्या 10 टक्के अनुदान दिले पाहिजे आणि दुसरी मागणी म्हणजे या प्रकल्पांसाठी 6 रुपये प्रति युनिट दराने वीज पुरवठा करण्यात यावा. असे केले तर मी खात्री देतो तसेच ॲफिडेव्हिट सुध्दा करुन देण्यास तयार आहे की, विदर्भातील 10 उद्योगपती जागोजागी सूतगिरण्या उभ्या करण्यास तयार होतील. अशा प्रकारे 25 हजार पिंडलच्या 10 सूत गिरण्या उभ्या झाल्या तरी त्यातून 5 हजार लोकांना रोजगार मिळू शकेल. एवढे बोलून व या दोन्ही प्रस्तावांना मान्यता शासनाने द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

...........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सव्रश्री. राजेंद्र जैन, माणिकराव ठाकरे श्रीमती शोभाताई फडणवीस, श्रीमती नीलम गोऱ्हे, प्रा. अनिल सोले, श्री. हरिसिंग राठोड, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. प्रकाश गजभिये, श्री. मितेश भांगडिया इ. सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला, त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो.

महोदय, विदर्भात प्रत्येक वेळी अधिवेशन काळात विदर्भाच्या अनुशेषाबाबत आणि पुढील विकासाच्या संदर्भात चर्चा होत आली. अनेक वेळा चर्चा करुन आणि निधीची उपलब्धता होऊनही विकासाला हवा तसा वेग आला नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

यानंतर श्री. भारवि ...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

सभापती महोदय, यापूर्वी कोणाचे सरकार होते याचा विचार करण्यापेक्षा विदर्भ आज कुठल्या स्थितीत आहे याचा निश्चित विचार करण्याची आवश्यकता आहे. विदर्भाची निर्मिती कोणत्या परिस्थितीत झाली हे प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितले. जेव्हा भाषावार प्रांत रचना झाली तेव्हा मुंबई महाराष्ट्रात राहावी म्हणून विदर्भ प्रांत महाराष्ट्रात विलीन करण्यात करण्यात आला. एक भाषिक प्रांत निर्माण करण्यासाठी विदर्भ करार झाला. त्यामुळेच एकसंघ मराठी राज्याची स्थापना झाली. पण या विदर्भ करारानुसार जी काही पावले भविष्यकाळामध्ये उचलावयास पाहिजे होती ती उचलली गेली नाहीत. महाराष्ट्रात कधी विदर्भातील, पश्चिम महाराष्ट्रातील, मराठवाड्यातील, कोकणातील मुख्यमंत्री झाले असतील. महाराष्ट्रात खान्देश सोडून सर्व भागातील मुख्यमंत्री झालेले आहेत. येथे हा विषय नाही. येथे आरोप-प्रत्यारोपाचा कुठलाही भाग नाही. कोणी म्हणेल की, पश्चिम महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झाला म्हणून विदर्भावर अन्याय झाला. पश्चिम महाराष्ट्राचा म्हणेल की, विदर्भाचे 3 मुख्यमंत्री झालेत त्यांनी काय केले ? सर्वसामान्य माणसाला वाटते की, कोणी काय केले यापेक्षा तुम्ही काय करणार आहात. मी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांचे भाषण ऐकत होतो. या प्रस्तावावर आपण उत्तर द्यावे अशी चिठ्ठी माननीय मुख्यमंत्र्यांकडून आताच आली. मी आपली भाषणे काही ऐकलेली नाहीत. त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्याला उत्तर देणे शक्य होणार नाही. माझी तशी काही तयारी देखील नाही. विदर्भाच्या मुद्यावर कोणते प्रश्न येतात ते आता पाठच झाले आहेत. त्यापेक्षा नवीन मुद्दे आलेच नाहीत. नवीन एखाद-दुसरा मुद्दा मिहानचाच आला. त्यापलीकडे नवीन कोणताच मुद्दा नव्हता. सिंचनाचा अनुशेष आहे, झुडपी जंगलांचा प्रश्न आहे, माजी मालगुजारी तलावांच्या दुरूस्तीचा प्रश्न आहे, सूत गिरण्या व साखर कारखाने नाहीत, संत्रा बागांचा विकास होत नाही, पर्यटनाचा विकास होत नाही, रस्ते खराब आहेत, वीज निर्माण करून देखील सर्व प्रदूषण आम्ही सहन करतो इत्यादी विषयांच्या पलीकडे विदर्भाची चर्चा कधीच गेली नाही आणि त्या पलीकडे विषय देखील नाहीत. दांडेकर समिती, किंमतकर समिती यांचा अहवाल आला. त्यानंतर सर्वच भागातील अनुशेष दूर होत गेला.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

अनुशेष दूर करण्यामध्ये सर्वात जास्त अन्याय हा विदर्भावर झालेला आहे. त्याच्या बरोबरीने महाराष्ट्रातील चित्र पाहिले तर विदर्भापेक्षाही काकणभर जास्त अन्याय कोकणावर झालेला आहे. त्या बरोबरीने खान्देशवर देखील अन्याय झाला. समन्यायी तत्त्वावर निधीचे वाटप झाले या हेतूने वैधानिक विकास मंडळांची निर्मिती झाली. पण दुर्दैवाने कोणत्याही विभागाचा समन्यायी तत्त्वाने विकास झाला नाही. विदर्भासाठी पॅकेज सोडून आता पर्यंत रूपये 2073.00 कोटी इतका निधी दिल्याचे दाखविण्यात आले. पण प्रत्यक्षात 1000 कोटी रूपयेच मिळालेत. आपण राज्यपाल महोदयांचे निदेश पहावेत. राज्यपाल महोदयांनी गेल्या दहा वर्षात सिंचनासाठी किती निधी द्यावा यासंबंधी निदेश दिले आहेत ते आपण पहावेत. मी दाव्याने सांगतो की, त्या निदेशाचे पालन दहा वर्षात झ ाालेले नाही. माझे चुकले असेल तर मी उद्या आपली माफी मागतो. बजेटमध्ये प्रोव्हीजन्स झाल्या असतील. बजेटमध्ये प्रोव्हीजन्स ह्या राज्यपालांच्या निदर्शनात आणण्यासाठी केल्या होत्या. अंतिमत: पाहिले तर विदर्भासाठीचा पैसा हा 50 टक्के देखील विदर्भावर खर्च झाला नाही. एखाद-दुसऱ्या वर्षी 60 टक्क्यांच्या आसपास खर्च पोहोचला असेल. हेतूपूर्वक, जाणीवपूर्वक विदर्भातील पैसा हा पश्चिम महाराष्ट्राकडे वळविण्यात आला. आपण जर एक, दोन, तीन, चार नव्हे तर अनेक वर्षांचे अर्थसंकल्प पाहिले तर ते लक्षात येईल. यात आपण कोणाची फसवणूक करीत होतो? घटनेच्या अनुच्छेद 371 (2) आपण माननीय राज्यपालांना अधिकार दिलेले आहेत. त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी वारंवार केला आहे. घटनेने आम्हाला न्याय दिला. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या नावाने राज्य चालविणारे होते त्यांनी आमच्यावर अन्याय केला.

आम्हाला वेगळा विदर्भ हवा असे वैदर्भीय माणसाच्या मनामध्ये का येत आहे ? अशी भावना त्याच्या मनामध्ये का निर्माण झाली आहे ? ही भावना निर्माण होण्याचे मूळ कारण असे की, त्याला वाटायला लागले की, त्याच्यावर सातत्याने अन्याय होत आहे. येथे लहान भाऊ की मोठा भाऊ ही भूमिका त्याचा मनामध्ये आहे. त्याला असे वाटले की, माझ्यावर सातत्याने अन्याय होत आहे. माझ्यासाठी दिलेला पैसा हा माझ्यावर खर्च न होता तो दुसरीकडे वळवला जात आहे. विदर्भातील सर्व विभागातील अधिकाऱ्यांच्या निम्म्या पेक्षा अधिक जागा रिक्त आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

मला आठवते की, गोसीखुर्दचे भूमिपूजन करणारा मी चौथा मंत्री असेन. त्याच्या आधी तीन वेळा त्याचे भूमिपूजन झाले होते. त्यावेळी मी नारळ फोडला नाही, वाढवला नाही, भूमिपूजन केले नाही. कारण गोसीखुर्दला ज्यावेळी मी गेलो त्यावेळी त्याच्या आधी तीन दगड लावलेले मला दिसले. पहिली उद्घाटनाची शिळा स्व.श्रीमती इंदिरा गांधी यांच्या इंदिरा सागर या नावाने होते. दुसरी उद्घाटनाची शिळा स्व.श्री.राजीव गांधी यांच्या राजीव सागर या नावाने होती. तिसरी उद्घाटनाची शिळा स्व.श्री.नरसिंह राव यांच्या नावाने होती. त्यांनी सागर वगैरे काही नाव दिले नव्हते. त्यानंतर मी गेल्यानंतर मला विचारण्यात आले की, उद्घाटनाची चौथी शिळा कुठे लावायची. बळीराजाने जसे तीन पावलाने क्षेत्र व्यापले होते तसे सारे क्षेत्र उद्घाटनाच्या शिळेने व्यापले होते. तेथे जागाच शिल्लक राहिली नव्हती. त्यावेळी मी सांगितले की, शिळा वगैरे काही नको, मशिनरी आणा आणि कामाला लागा. त्यावेळी सुधारित टेंडर हे माझ्या सहीने निघाले. श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या मनात देखील हा प्रकल्प पूर्ण व्हावा अशी इच्छा होती. श्री.राजीव गांधी देखील हा प्रकल्प व्हावा म्हणून येथे आले होते. असे काय घडले की, हे काम पुढे जाऊ शकले नाही. त्यावेळी देखील केंद्र शासनाने निधी देण्याची तयारी दाखविली होती. पण राज्य शासनाच्या माध्यमातून भूमिसंपादनासाठी लागणारे अधिकारी, व्यवस्था, निर्माणच केली गेली नाही. त्यामुळे भूसंपादन झाले नाही. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी विरोध केला. या कारणांसाठी प्रकल्प पुढे जाऊ शकला नाही असे मला अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या 18 वर्षाच्या कालखंडामध्ये त्या प्रकल्पाची किंमत चौपट वाढली. आता तर खूपच वाढली आहे. त्यावेळी मी अधिकाऱ्यांना विचारले की, काय केले तर काम पूर्ण होईल. तेव्हा ते म्हणाले की, आम्हाला अधिकारीवर्ग कामासाठी उपलब्ध करून देण्यात यावा. त्यांनी मला सांगितले की, 100 टक्के अधिकारी दिल्यानंतर आम्ही काम पूर्ण करून दाखवितो. त्यावेळी अधिकारी मिळत नव्हते. भूसंपादनासाठी प्रांत वगैरेसारखी तज्ज्ञच व्यक्ती लागते. महाराष्ट्रातील सेवानिवृत्त तहसीलदार, प्रांत यांनी गोसीखुर्द प्रकल्पावर काम करण्यासाठी यावे म्हणून मी वर्तमानपत्रात जाहिरात दिली. त्यांना सेवानिवृत्तीपूर्वीचा शेवटचा पगार तसेच गाडी, ऑफिस, झेरॉक्स मशिन्स, मोबाईल फोन इत्यादी सुविधा शासनामार्फत पुरविले जाईल असे नमूद केले होते. मला मुदतीच्या आत भूसंपादनाचे प्रस्ताव करणारे अधिकारी हवे होते.

यानंतर श्री.जुन्नरे...

यानंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ......

वर्तमानपत्रात वारंवार प्रसिध्दी केल्यानंतर अधिकारी आले. ते अधिकारी सरकारी सेवेतील नसून बाहेरचे होते. कॅबिनेटची मंजुरी घेऊन अधिकारी आणल्यामुळे भूसंपादनाच्या कामाला वेग आला, कामे मार्गी लागली आणि आज 15 वर्षानंतर त्या ठिकाणी पाणी थांबू शकले. आज विदर्भातील सरकारी सेवेतील 50 टक्के जागा रिक्त आहेत. मागच्या महिन्यात आदरणीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मला बोलावून विचारले की, विदर्भातील सर्व खात्यामध्ये 50 टक्क्याच्या आसपासच जागा भरलेल्या आहेत. विदर्भाचा विकास करावयाचा असेल तर पहिल्यांदा प्रशासनातील रिक्त जागा भरल्या पाहिजेत, त्यामुळे विदर्भातील रिक्त जागा भरण्यासाठी काय केले पाहिजे ? मी त्यांना सांगितले की, विदर्भात बदली केली तर कोणी जाण्यास तयार होत नाही. 100 लोकांच्या विदर्भात बदल्या केल्या तर 99 लोकांच्या बदल्या रद्द करण्यासाठी अर्ज येतात. दुर्दैव हे आहे की, जे अधिकारी विदर्भात जन्माला आले, विदर्भात वाढले, विदर्भात पदवीधर झाले, जे येथेच सरकारी नोकरीत जॉईन झाले ते सुध्दा विदर्भात येण्यास तयार नाहीत त्यामुळे बाहेरच्यांना दोष देण्यात काय अर्थ आहे ? विदर्भातील जागा भरण्यासाठी आम्ही मागच्या महिन्यापासून मोहीम सुरु केली आणि हळू हळू नागपूर, अमरावती विभागातील महसूल विभागाच्या जागा 70/80 टक्के भरण्यामध्ये आम्हाला यश आले असून त्यातील काही अधिकारी अद्याप जॉईंट झालेले नाहीत. अजून सुध्दा ते वाट पाहत आहेत की, सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे साहेबांचा वशिला नाथाभाऊकडे लागेल का ? या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात जाहीर करावे लागले की, विदर्भामध्ये जेवढया बदल्या झालेल्या आहेत त्यातील कोणाचीही बदली रद्द केली जाणार नाही, त्यांना जॉईन व्हावेच लागेल अन्यथा नोकरी सोडावी लागेल. कठोर पावले उचलल्याशिवाय तुम्हाला अधिकारी मिळणार नाहीत. काही वेळा असे सांगितले जात होते की, विदर्भामध्ये अधिकारी नसल्यामुळे संपूर्ण पैसा खर्च झाला नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गजभिये साहेबांनी सांगितले की, त्या ठिकाणच्या गैरव्यवहार, भ्रष्टाचारामुळे प्रशासनामध्ये मोठी हलचल झाल्यामुळे अधिकारी काम करण्यास तयारच नव्हते.

सभापती महोदय, ज्यावेळेस सिंचन खात्यावर गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराचे आक्षेप केले गेले त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब नुकतेच मुख्यमंत्री झाले होते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ......

त्यांनी निर्णय घेतला होता की, सिचंन विभागाच्या प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी मंत्रिमंडळाकडे मान्यता घेतल्याशिवाय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणार नाही असा चिफ सेक्रेटरी श्री. रत्नाकर गायकवाड यांच्या सहीने फतवा निघाला व त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील कामे ठप्प झाली ती या क्षणापर्यंत ठप्प झाली. सुधारित प्रशासकीय मान्यता हा निरंतर चालणारा कार्यक्रम असतो. सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये कोणी भ्रष्टाचार केला असेल त्याबद्दल आज मी काही सांगू शकत नाही. परंतु एखाद्या ठिकाणी असा प्रकार झाला असेल तर संपूर्ण महाराष्ट्रातील संपूर्ण कामे थांबवून ठेवणे योग्य नाही. या निर्णयामुळे अगोदरचा कामाचा जो वेग होता तो मंदावला गेला आणि त्याचा सर्वाधिक फटका विदर्भाला बसला. विदर्भासाठी माननीय पंतप्रधानांनी पॅकेज दिले होते, विदर्भासाठी कॉंग्रेस सरकारने विदर्भ सिंचन सधन विकास कार्यक्रम राबविण्याचा कार्यक्रम सुरु केला होता. विदर्भासाठी जे जे लागेल ते ते विदर्भासाठी देण्याची तयारी त्यावेळच्या केंद्रातील कॉंग्रेस सरकारने दर्शवली होती. परंतु गेल्या 3-4 वर्षात सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे 10 टक्के सुध्दा कामे झाले नाहीत. 50 कोटी रुपयांचा प्रकल्प असला तरी मंत्रिमंडळाकडे जावे लागत असे आणि 500 कोटी रुपयांचा प्रकल्प असला तरी मंत्रिमंडळाची परवानगी लागत असल्यामुळे कामे होऊ शकली नाहीत. विदर्भातील सिंचनाचे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी 1995 मध्ये विदर्भ सिंचन विकास महामंडळाची स्थापना झाली आणि खऱ्या अर्थाने विदर्भातील सिंचनाच्या कामांना वेग आला.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या सरकारचे प्रशासकीय मान्यतेच्या संदर्भात धोरण कसे राहणार आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी सर्व प्रश्नांची उत्तरे देणार आहे फक्त भाषणात व्यत्यय आणू नका. विदर्भ सिंचन विकास महामंडळाची स्थापना झाली होती त्यावेळेस 10 प्रमुख प्रकल्पांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला होता. त्या कालखंडात मागणी आल्यामुळे विदर्भातील जे प्रकल्प 100-200 कोटी रुपयांमध्ये पूर्ण होऊ शकणार होते त्यांचाही त्यात समावेश केला गेला. त्या कालखंडात गोसीखुर्द प्रकल्पाला सुप्रमा देऊन त्याच्या कामाला सुरुवात केली गेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ......

होती त्याच कालखंडात पैनगंगेच्या प्रकल्पालाही मंजूरी देण्यात आली. पैनगंगेचा प्रकल्प गोसीखुर्द प्रकल्पाच्या खालोखाल आहे. प्राणहिताचे बॅरेज आपण बांधावयाचे, पुनर्वसन आपले करावयाचे, आपलीच गावे बुडवायची, जमीन बुडवायची आणि त्यातील पाणी तेलंगणाला द्यावयाचे हे काही बरोबर नाही. प्राणहितामध्ये पाणी जात असतांना एका बाजूला वैनगंगा आणि दुसऱ्या बाजूला वर्धा नदीचे पाणी येते, त्या ठिकाणी एकंदर पाच नद्यांचे पाणी एकत्र येते. परंतु आता या सरकारची यासंदर्भातील भूमिका वेगळी आहे. तेलांगणा राज्य सरकारला यासंदर्भात शासनाने स्पष्टपणे सांगितले आहे की, जोपर्यंत तुम्ही बॅरेजेसची उंची कमी करीत नाही तोपर्यंत आमच्या पुनर्वसनाच्या गावांची संख्या कमी होणार नाही. जोपर्यंत प्राणहिताच्या बॅरेजेसची उंची कमी केली जात नाही तोपर्यंत प्राणहिताच्या कामाला महाराष्ट्र सरकारकडून सहमती दिली जाणार नाही.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयातील नदींमध्ये बारमाही पाणी वाहत असते. बारा महिने वाहणाऱ्या नद्या फक्त विदर्भातच आहेत. गंगा-यमुनेच्या खालोखाल बारमाही नद्या फक्त विदर्भात आहेत. गडचिरोली जिल्हा हा संपन्न जिल्हा आहे परंतु नक्षलग्रस्त एरियामुळे तो बदनाम झ ााला आहे. परंतु या ठिकाणी हूमन, तुलतुली धरणांच्या कामांना मंजूरी देण्याचा आपण प्रयत्न केला होता. वन विभागाच्या अडचणीमुळे जे प्रकल्प अडले होते ते प्रकल्प आजही त्याच अडचणीमुळे अडलेले आहेत. विदर्भामध्ये झुडपी जंगलाचा प्रश्न मोठया प्रमाणात असून गडचिरोली जिल्हयात वनाचा प्रश्न मोठया प्रमाणात आहे. लोकसभेत कोणते प्रश्न मांडावयाचे यासंदर्भात मागच्या महिन्यात माननीय मुख्यमंत्र्यांनी खासदारांची बैठक आयोजित केली होती त्याच्या दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर साहेबांच्या समवेत मी आणि माननीय मुख्यमंत्र्यांची चर्चा झाली होती.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांना आम्ही सांगितले की, झुडपी जंगलाचा प्रश्न सुटला पाहिजे. एक झा्ड जंगलात नाही. जंगलच अस्तित्वात नाही. परंतु उताऱ्यावर झुडपी जंगल आहे. काही ठिकाणी अगदी छोटी झाडे आहेत. परंतु जंगल नाव दिल्यामुळे अडचण झाली आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांनी आमच्याकडून माहिती मागविली आहे. त्यांच्या पातळीवर निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे त्यांनी आम्हाला सांगितले आहे. या संदर्भात अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात येईल आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून झुडपी जंगल असा उल्लेख आला तो वगळण्याचा प्रयत्न करण्यात येईल असा त्यांनी आम्हाला शब्द दिलेला आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयाचे पूर्वीचे निर्णय आहेत, त्या निर्णयाच्या आधारावर ते प्रयत्न करणार आहेत.

सभापती महोदय, विदर्भाच्या विविध प्रश्नाच्या संदर्भातील प्रस्ताव चर्चेला होता, परंतु सर्वात जास्त सिंचनावर चर्चा झाली. जोपर्यंत विदर्भातील पाण्याचा प्रश्न सुटणार नाही तोपर्यंत विदर्भाच्या विकासाला वेग येणार नाही. उद्योग हा नंतरचा भाग आहे. शेतीला प्राधान्याने पाणी मिळाले पाहिजे. जीगाव-टाकळी प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे प्रश्न आहेत. तसेच अनेक प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे प्रश्न आहेत आणि त्या कामांना वेग आणण्याची गरज आहे. तो वेग आम्ही निश्चितपणे आणणार आहोत. बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णासारखा प्रकल्प पूर्ण झाला. पण त्या प्रकल्पातील पाणी मराठवाड्याकडे गेले. विदर्भाला त्याचा कमी लाभ मिळाला. विदर्भाचा पाण्याचा वाटा असूनही विदर्भाला तो मिळत नाही. पाणी वाटपाबाबत विदर्भावर अन्याय झालेला आहे, अशी आपली भावना आहे ती आम्ही दूर करण्याचा प्रयत्न करु.

सभापती महोदय, अप्पर वर्धा प्रकल्प झाला. आपण त्यातील पाण्याचा वापर पूर्णपणे करु शकलो नाही. त्या पाण्याचा वापर करण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. आम्ही सिंचनाच्या कामाला वेग देऊ एवढे मी या ठिकाणी सांगतो.

सभापती महोदय, मागील कार्यक्रम पुढे नेण्याचा आमचा संकल्प आहे. या कार्यक्रमासाठी निधी मिळालेला नाही. सन 2012-2013 पासून विदर्भ सधन सिंचन कार्यक्रमासाठी 3 हजार 250



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

कोटी नियतव्यय कार्यक्रम कार्यान्वित आहे. या कार्यक्रमातून काही निधी उपलब्ध झाला. केंद्र सरकारने या कार्यक्रमासाठी मागील तीन वर्षापासून 650 कोटी रुपयांची तरतूद केली. त्यापैकी या वर्षी 150 कोटी रुपये प्राप्त झाले. पुढील पाच वर्षात किमान 500 कोटी रुपये उपलब्ध करुन घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना व राज्याच्या निधीतून तरतूद उपलब्ध करुन पाच वर्षाचा हा कार्यक्रम पूर्ण करण्यात येईल. केंद्र सरकारने निधी दिला नाही तरी राज्य सरकार आपल्या हिश्श्यातून निधी देऊन विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम पूर्ण करील. फळे व भाजीपाला वाढ करण्यासाठी याचा उपयोग होईल.

सभापती महोदय, पूर्व विदर्भातील मालगुजारी तलावांच्या बाबतीत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. विदर्भामध्ये 300 ते 350 वर्षापूर्वीचे मालगुजारी तलाव आहेत. या तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला असून तो गाळ काढण्यात आलेला नाही. चंद्रपूर, गडचिरोली, भ्ंडारा, गोंदिया व नागपूर या जिल्ह्यांमध्ये मालगुजारी तलाव आहेत. मालगुजारी तलावांची एकूण संख्या 6 हजार 867 असून त्याची सिंचन क्षमता 1 लाख 31 हजार 311 हेक्टर इतकी आहे. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून चार तलावांची दुरुस्ती महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाने पूर्ण केली. सध्याच्या मापदंडानुसार या मालगुजारी तलावांचे नूतनीकरण करणे, तलावाची खोली वाढविणे इत्यादी कामे त्यामध्ये बसत नाहीत. सन 2008 मधील हे मापदंड आहेत. प्रति हेक्टरी 21 हजार रुपये असा मापदंड आहे. या तलावांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन दिला तरी त्या निधीमध्ये काम होत नव्हते. सन 2008 नंतर या मापदंडामध्ये काहीही बदल केला नव्हता. तेव्हा या मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी प्रति हेक्टरी 45 हजार रुपयाचां मापदंड करण्यात येत असल्याची घोषणा मी करीत आहे. त्यास मंत्रिमंडळाची मंजुरी घेण्यात येईल. अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रति हेक्टरी 47 हजार रुपये मापदंड केल्यास सर्व मालगुजारी तलावांची कामे होतील. जर ते मालगुजारी तलाव वन विभागात असतील तर वन विभागाची परवानगी घेण्यात येईल. तेव्हा मालगुजारी तलावाचा महत्वाचा प्रश्न या माध्यमातून सुटू शकेल. या कामासाठी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

केंद्र सरकार काही निधी देण्यास तयार आहे. तसेच आपण त्यामध्ये राज्याचा हिस्सा टाकणार आहोत. काही मालगुजारी तलाव मोठे आहेत त्यांच्या दुरूस्तीसाठी 10 वर्षे लागतील, परंतु ते काम टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

सभापती महोदय, आज विदर्भातील जनतेची अशी भावना आहे की, आमच्याकडे वीज निर्मिती होत असताना त्याचा लाभ आम्हाला मिळत नाही. खापरखेडा, पारस येथे वीज निर्मिती होते. त्या ठिकाणी निर्माण होणारे प्रदूषण आम्ही सहन करायचे, आम्ही आजारी पडायचे. आमच्याकडे वीज निर्मिती होऊन आम्हाला काय मिळते ? येथील विजेचा पुरवठा मुंबई आणि कोकण विभागाला करायचा. मुंबईमध्ये विजेचा जो भाव आहे तोच भाव विदर्भाला लागू आहे. त्या ठिकाणी दहा रुपये युनिट दर असेल तर येथेही दहा रुपये युनिट दर आहे. आपण विदर्भातील युनिट दर कमी केले पाहिजेत. विदर्भातील उद्योगांना कमी दरात वीज उपलब्ध करुन दिली पाहिजे अशी विदर्भातील लोकांची सातत्याने मागणी आहे. विदर्भामध्ये जे उद्योग येतील त्यांना वेगळे पॅकेज स्कीम ऑफ इन्सेटिव्ह देण्यात येईल असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे. त्यामध्ये विजेचा देखील समावेश असेल. या स्कीममध्ये विक्रीकरामध्ये सवलत, जमिनीच्या दरामध्ये सवलत, डयुटी माफीचा विषय, एमआयडीसीसाठी लागणाऱ्या पाण्याच्या दराबाबत वेगळी चर्चा करुन त्याबाबत घ्यावयाचा निर्णय, व्हॅट इत्यादीं बाबत तसेच स्टेट एक्साईजच्या संदर्भात एक पॅकेज तयार करुन त्यामधून जो कर जमा होणार आहे तो उद्योजकाने सात वर्षे, बारा वर्षे वसूल करुन तो भांडवल म्हणून वापरावा आणि बारा वर्षानंतर शासनाला परत करावा अशाप्रकारची पॅकेज इन्सेटिव्ह स्कीम करण्याचा आमचा प्राथमिक विचार आहे. आपण असे केले पाहिजे असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु त्या सदंर्भात अजून प्राथमिक विचार सुरु आहेत. पण हे विदर्भासाठी केले पाहिजे असा आमचा आग्रह आहे. या माध्यमातून उद्योगाला वेग येईल. तसेच उद्योगांना कमी किमतीमध्ये वीज कशी उपलब्ध करता येईल याचा देखील विचार करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

सभापती महोदय, काही खाजगी उद्योगाच्या संदर्भात ऊर्जेच्या बाबतीत एमओयु करण्यात आले. त्याला पुढे वेग आला नाही. त्यामध्ये अदानीसारखे प्रकल्प होते. काही विभागात इको टुरिझम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. बुलढाणापासून चंद्रपूर पर्यंत आणि गडचिरोलीपासून भंडारा-वर्धापर्यंत जी टुरिझम क्षेत्र आहेत ती आयडेन्टीफाय करुन त्यामध्ये तीर्थक्षेत्र असेल, ताडोबासारखे जंगल असेल, पेंच प्रकल्प असेल अशी प्रेक्षणीय स्थळे आहेत. आपण केवळ पूर्व विभागावर लक्ष केंद्रित करीत आहोत असे नाही तर पश्चिम विदर्भामध्ये देखील प्रेक्षणीय स्थळे आहेत, ज्यामध्ये जिजाऊंचे जन्म स्थान असलेला भाग आहे, ही सर्व प्रेक्षणीय स्थळे विकसित केली पाहिजेत. एकदा पर्यटक विदर्भात आला तर त्याने तीन-चार दिवस विदर्भामध्ये फिरले पाहिजे अशा स्वरुपाचा आराखडा तयार करण्याच्या सूचना मुख्यमंत्री महोदयांनी पर्यटन विभागाला दिलेल्या आहेत. त्यातून रोजगार निर्मिती होईल. हा आराखडा तयार झाल्यानंतर ते पर्यटन स्थळ किंवा तीर्थक्षेत्र विकसित करणे, त्या ठिकाणी निवासाची उत्तम व्यवस्था करणे इत्यादी बाबी आल्या. अलीकडे विदर्भात पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत. पेंच प्रकल्प नागपूर शहराच्या बाजूला आहे. त्या ठिकाणी अनेक पर्यटक व निसर्गप्रेमी भेट देतात. काही मेळघाटला जातात, काही चिखलदऱ्याला जातात. नागपूर शहराजवळ मायनर इरिगेशनचे प्रकल्प आहेत त्या ठिकाणी बीओएम पद्धतीवर म्हणजे बांधा, वापरा आणि मेन्टन करा या तत्वावर वॉटर टुरिझम, वॉटर गेम्स, वॉटर स्पोटर्स करण्याचा आमचा विचार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

शिर्डी किंवा अन्य ठिकाणी लहान मुलांसाठी वा मोठ्या माणसांसाठी जसे वॉर्टर स्पोटर्स किंवा गार्डन्स आहेत तसे निर्माण करण्यासाठी बीओएम तत्त्वावर राज्य सरकार परवानगी देईल. जो कोणी अशा प्रकारचे गार्डन करण्यासाठी पुढे येईल त्यांना आम्ही सांगणार आहोत की, तुम्हीच गार्डन बांधा, वापरा आणि पैसे वसूल करा. राज्य सरकार या कामासाठी लीजवर जमीन देईल. पाणी कर, मनोरंजन कर राज्य सरकार वसूल करेल. अशा प्रकारचे गार्डन शहरालगत निर्माण करण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळू शकतो. केवळ शहरालगतच नाही तर ज्याला जेथे असे गार्डन करावयाचे असेल त्यांच्यासाठी वॉटर पर्यटन विषयक टूरिझम पॉलिसी करण्याचा माननीय मुख्यमंत्र्यांनी मनोदय व्यक्त केला आहे.

महोदय, पर्यटनाला गेल्यानंतर केवळ ताडोबा अभयारण्यात जायचे आणि वाघ पाहून परत यायचे असे होता कामा नये. त्या ठिकाणी मुलाबाळांसह गेल्यानंतर एक दिवस वाघाच्या आणि दुसऱ्या दिवशी पाण्याच्या संगतीत राहिले पाहिजे. नागपूर येथील निम्म्यापेक्षा जास्त कुटुंब अशा पर्यटन स्थळी कसे जातील, त्यांना त्या ठिकाणी जास्तीत जास्त आनंद वाटेल असा उपक्रम करण्यास माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. वास्तविक पाहता हा उपक्रम जुनाच आहे परंतु त्याला उजाळा द्यावयाचा आहे.

महोदय, विदर्भाचा केवळ एकाच बाजूने विकास करुन चालणार नाही. मिहान प्रकल्प आणि विमानतळाच्या बाबतीत येथे चर्चा झाली. काहींनी सांगितले की, येथून परदेशात विमान गेले पाहिजे. मी सांगू इच्छितो की, नागपूरच्या विमानतळाला आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून परवानगी मिळाली आहे. त्यामुळे नागपूर येथून आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतुकीला सुरुवात होईल. मिहान प्रकल्पामध्ये एक भाग हा विमानतळासाठी राखून ठेवला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ किंवा मिहानच्या इंडस्ट्रीजच्या माध्यमातून रोजगार निर्मिती होईल.

महोदय, मिहान प्रकल्पाचे एकूण क्षेत्र 4,187.61 हेक्टरचे असून त्यापैकी 1,177 हेक्टर सरकारी आणि 3 हजार 10 हेक्टर खाजगी क्षेत्र आहे. या ठिकाणी बाधित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. ज्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत त्यांना सिडकोच्या धर्तीवर 12.5 टक्के विकसित जमीन देण्यात येणार आहे. काही ठिकाणी अशा जमिनी दिल्या आहेत. मग त्यामध्ये शहरी भागातील चिंचबनचे पुनर्वसन असेल, खापरीचे पुनर्वसन असेल. मिहान प्रकल्पात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 18:30

श्री.एकनाथराव खडसे....

रस्ते, मल:निस्सारण, पाण्याची सोय इत्यादी कामे सुरु असतानाच, त्याच्या जोडीला विमानतळाची कामे सुध्दा जोराने सुरु आहेत.

महोदय, नागपूर हे मध्य भारतातील महत्त्वाचे केंद्र आहे. नागपूर हे देशाच्या मध्यभागी आहे. त्यामुळे नागपूरमध्ये कार्गो हब निर्माण करणे आवश्यक आहे. सध्या मुंबईच्या विमानतळावर विमान थांबण्यासाठी जागा नाही. तसेच कार्गो हबसाठी सुध्दा जागा नाही. त्यामुळे पुढील कालखंडात नागपूर येथील कार्गो हबला मान्यता मिळाल्यानंतर देशातील नव्हे तर परदेशातील उत्कृष्ट प्रकारचे कार्गो हब नागपूरमध्ये निर्माण होऊ शकते. या कामाला 10 वर्षे लागतील. मी सांगू इच्छितो की, मिहान प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

महोदय, विशेष आर्थिक क्षेत्र या संदर्भातील व्यवस्था नागपूर शहरात करण्यात येत आहे. मुंबईच्या आजूबाजूला अशा प्रकारचे विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु दुर्दैवाने ते अयशस्वी ठरले. कारण त्यांना योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. नागपूरमध्ये अशा प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहिले आणि त्यांना विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून सवलती दिल्यास, तेथे मोठ्या प्रमाणावर उद्योजक येऊ शकतील आणि उद्योगाला चालना मिळेल. हे करीत असताना एकट्या नागपूरकडे लक्ष देऊन चालणार नाही. नागपूरचा विकास करीत असताना संपूर्ण विदर्भ सरकारच्या नजरेसमोर आहे.

महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, बुटीबोरीला मर्यादित स्वरुपात इंडस्ट्री झोन आहे. पूर्वी बुटीबोरी सारखीच पंचतारांकित इंडस्ट्री अमरावती येथे निर्माण केली होती. पण त्या ठिकाणी प्रतिसाद मिळाला नाही. मलकापूर येथील दसरखेडला सुध्दा एमआयडीसीचा झोन निर्माण केला होता. त्याला पूर्वी प्रतिसाद मिळाला नाही. परंतु त्याला आता चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे. महोदय, नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर अमरावती येथील इंडस्ट्रीमध्ये मोठ्या तीन उद्योजकांनी येण्याची इच्छा व्यक्त केली आहे. कारण मुंबई, पुणे या भागात जागेच्या अडचणी जाणवत असल्यामुळे आता या भागात हळूहळू इंडस्ट्री येण्यास सुरुवात झाली आहे. ती सध्या नाशिकपर्यंत आली आहे, पुढील कालखंडात जळगावपर्यंत येईल. नागपूरचे विमानतळ, कार्गो हब तसेच मिहान प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अनेक इंडस्ट्रीज या भागात येतील.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

महोदय, या भागात ॲग्रो इंडस्ट्री उभी राहण्यासाठी सरकारने प्रयत्न केले. पूर्वीच्या कालखंडात सर्वांचा या बाबतीत प्रयत्न राहिला आहे. या भागातील सूतगिरण्या जिवंत राहिल्या पाहिजेत अशी सन्माननीय सदस्यांनी अपेक्षा व्यक्त केली. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, काही साखर कारखाने बंद झाले आणि काही हळूहळू विकले गेले. त्यामुळे उरलेले कारखाने तरी जिवंत ठेवा, अशी सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे आणि ती बरोबर आहे. वास्तविक पाहता साखर कारखाने जिवंत राहण्यासाठी ऊस पाहिजे. ऊसाचे पीक घेण्यासाठी शेतीत पाणी पाहिजे. भविष्यात मला आशा आहे की, सिंचनाचे क्षेत्र वाढत आहे. विदर्भातील शेतकरी अधिक संशोधक होत चालला आहे किंबहुना नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करायला लागला आहे. सोयाबीन, कापूस, धान या पिकांच्या बाबतीत झालेले संशोधन त्याने स्वीकारले आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत या पिकांच्या उत्पादनात वाढ झाली आहे. त्यामुळे ॲग्रो इंडस्ट्री निर्माण करणे आवश्यक आहे. पूर्वी काटोल येथे संत्र्यावर आधारित प्रक्रिया उद्योग निर्माण करण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु दुर्दैवाने तो यशस्वी होऊ शकला नाही. या उद्योगाच्या बाबतीत परवा बैठक घेण्यात आली. त्यात माहिती मिळाली की, ते लिटीगेशनमध्ये आहे. मी या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केली आहे. आम्ही त्यांना सांगितले की, संत्रा प्रक्रिया उद्योगांसाठी सबसिडाईज्ड दराने जागा उपलब्ध करून द्यावी लागेल. एक उद्योग अयशस्वी झाला म्हणून काय झाले. नवीन उद्योग सुरु करून बंद उद्योगाला सुध्दा सुरु करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. मला वाटते या दृष्टीने प्रयत्न झाला पाहिजे.

महोदय, महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन म्हणजेच एमएआयडीसीचा **नोबाचा** प्रकल्प मी परवा बघितला. त्याच धर्तीवर या ठिकाणी फळ प्रक्रिया उद्योग आणावयाचे आहेत. त्या प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर केंद्रीय अनुदान देण्यात येईल. या विभागाच्या माननीय केंद्रीय मंत्री नुकत्याच वर्धा येथे येऊन गेल्या. एमएआयडीसी च्या माध्यमातून बुटीबोरी येथे फळ प्रक्रिया उद्योग हा राज्य सरकारचा अंगीकृत व्यवसाय म्हणून सुरु करणार आहोत. यासाठी जी प्राथमिक जमीन हवी आहे त्यासाठी एमएआयडीसीने 4 एकर जमीन देण्याचे मान्य केले आहे. आणखी काही प्रकल्प एमएआयडीसीच्या माध्यमातून उभे करायचे आहेत. बुलढाणा ते नागपूर

..4..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 18:30

श्री.एकनाथराव खडसे....

पर्यंतच्या सूत गिरण्या बंद पडल्या आहेत. त्यासाठी नवीन पॅकेज द्यावे लागेल. पूर्वी वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात आले आहे. त्या धोरणामध्ये अतिमागासलेल्या भागामध्ये 1:9 भाग भांडवल देत असताना राज्य सरकारकडून अधिकाधिक भाग भांडवल कसे देता येईल, मग त्यासाठी 10 टक्क्याची अट 5 टक्के करणे, काही वर्षांसाठी व्हॅटमध्ये सूट देणे इत्यादी सुविधा दिल्या तर विदर्भातील सूत गिरण्या पुनर्जीवित होऊ शकतील. ज्या सूत गिरण्यात पुनर्जीवित होतील किंवा नव्याने येतील त्यांना विजेच्या बाबतीत सवलत देण्याचे धोरण राज्य सरकार नक्की घेईल आणि त्या बाबतीत राज्य सरकारच्या माध्यमातून सहानुभूतीपूर्वक विचार सुरु आहे. उद्योगांना सवलतीच्या दरात वीज दिल्याशिवाय त्यांचा उद्योग टिकणार नाही. त्याशिवाय विदर्भात उद्योग व्हायबल सुध्दा होत नाही. अशा प्रकारचे जे प्रक्रिया उद्योग आहेत त्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभा सभागृहात घोषणा केली आहे.

महोदय, अन्न प्रक्रिया उद्योग, फळ प्रक्रिया उद्योग, ॲग्रो बेस्ड इंडस्ट्री याला विदर्भात मोठ्या प्रमाणावर वाव आहे. पण त्यांच्याकडे भांडवल नाही, पैसा नाही. शिवाय त्यांना कर्ज देण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका पुढे येण्यास तयार नाहीत. जे असे प्रक्रिया उद्योग सुरु करतील त्यांना सरकारकडून हमी दिली जाईल. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, जे असे उद्योग उभे करु इच्छितात त्यांनी बँकांकडून कर्ज घ्यावे. सरकार सुध्दा बँकांना सांगेल की, जे फळ प्रक्रिया उद्योग सुरु करु इच्छितात त्यांना कर्ज द्यावे. महोदय, जर त्यांनी कर्ज भरले नाही तर ते पैसे सरकारच्या तिजोरीतून देण्यात येतील.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

पण येथे उद्योग उभे राहिले पाहजेत, अशी सरकारची धारणा, इच्छा आहे. सदर बाबतीत आणखी काही विविध उपक्रम राबविण्याची आमची तयारी आहे. आदरणीय श्री. नितीन गडकरी हे केंद्र शासनात भूतल परिवहन मंत्री आहेत. आम्हाला त्यांचा राज्यातील, विदर्भातील पुलांसाठी, आरओबीसाठी, फ्लायओव्हर ब्रीजसाठी, भुयारी मार्गासाठी, मेट्रोसाठी निश्चितपणे उपयोग होत आहे. मला विश्वास आहे की, आदरणीय श्री. नितीन गडकरी यांनी भूमिपूजन केले ते काम पूर्ण होणार आहे. कारण मला आमच्या मंत्रिमंडळात असताना त्यांचा अनुभव आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेचे काम सुरू करीत असताना अनेकांनी आमच्याजवळ शंका उपस्थित केली होती. मी त्यावेळी अर्थमंत्री होतो. मला अनेक जण विचारीत होते की, खडसे साहेब, असे होऊ शकते का, काय कल्पना तुमच्या गडकरी साहेबांच्या, ते म्हणजे हवेत बोलणारे आहेत, 6 हजार कोटी, 2 हजार कोटी, 4 हजार कोटी असे ते म्हणत आहेत, ते काम होईल का ? मी म्हटले की, ते काम होणार. कारण माननीय श्री. गडकरींनी मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेच्या संदर्भात आत्मविश्वास व्यक्त केला आहे. आमच्या काळात आम्ही सर्व पूर्ण करून दाखवू. सी-लिंकच्या संदर्भात आहे ते करून दाखवू. मला आनंद वाटतो की, ती कामे त्या कालखंडात झाली. नागपूर शहरातील भुयारी रेल्वे, मेट्रो रेल्वे, नागपूर शहराच्या बाहेरून जाणारा मार्ग, त्या वरचे फ्लायओव्हर ब्रीज, रेल्वे ओव्हर ब्रीज म्हणजेच आरओबी यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून, आदरणीय श्री. गडकरी साहेबांच्या माध्यमातून पैसा देण्याचे त्यांनी मान्य केले आहे. मान्यच केले आहे, असे नाही तर काही रेल्वे ओव्हर ब्रीजला त्यांनी मान्यता दिली आहे आणि मान्यता दिली आहे असे नाही तर बजेटमध्ये प्रोव्हिजन केली आहे. विदर्भाच्या विकासाचे छोटे छोटे टप्पे आहेत. परंतु, ते छोटे असले तरी त्रासदायक आहेत. रेल्वे गेट हे छोटे असले तरी ते त्रासदायक असते, वेळखाऊ असते, डिझेलचा, इंधनाचा खर्च अधिक होत राहतो. अशा ठिकाणी रेल्वे ओव्हर ब्रीजला मान्यता देण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे. आदरणीय श्री. गडकरी साहेबांनी माझ्याशी बोलताना सांगितले की, एकही आरओबी करण्याचा मी शिल्लक ठेवणार नाही. विदर्भातील रेल्वेचे सर्व ओव्हर ब्रीज बांधून टाकीन, असे त्यांनी सांगितले. विदर्भातील नव्हे तर उर्वरित महाराष्ट्रातीलही ही कामे करण्यात येतील, मात्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

त्यांनी मागणी केली पाहिजे. आता त्याची सुरुवात झाली आहे. विदर्भामध्ये त्यासाठी केंद्र शासनाकडून अधिक पैसा यावा, असा आमचा प्रयत्न आहे. आम्ही हे करू शकत नाही, हे मला माहीत आहे. नागपूर-मुंबई, नागपूर-धुळे-सुरत हायवे आहेत, ते फोर लेन हायवे केले पाहिजेत. आता असलेल्या नॅशनल हायवेंची दुरवस्था काय आहे हे आम्ही आता अधिवेशनासाठी येताना पाहिले आहे. आदरणीय श्री. गडकरी साहेबांबरोबर 3-4 महिन्यांपूर्वी बैठकीच्या वेळी चर्चा झाली. आपल्या येथील सर्वच्या सर्व हायवेज त्यांनी प्राधान्याने करण्यासाठी घेतले. ते निव्वळ घेतले नाही तर नागपूर-धुळे-सुरत रेल्वे मार्गाचे काम अमरावतीपर्यंत पूर्ण झाले आहे. अमरावतीपासून पुढे फोर लेन हायवे करण्यासाठी मंजुरी पाहिजे होती, त्यांच्याकडे गेल्यानंतर त्याला मंजुरी मिळाली आणि अमरावतीपासून जळगाव, जळगावपासून धुळे, धुळयापासून नवापूर, गुजरात बॉर्डरपर्यंत त्यांनी आम्हाला मंजुरी दिली. 5600 कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली. निव्वळ मंजुरी मिळाली असे नाही तर निविदा निघाली. काल परवा ती निविदा फायनल झाली असावी, असे मला वाटते. कारण ते काम अंतिम स्तरावर होते. केंद्र शासनाच्या मदतीने आपल्या विदर्भाचा विकास होऊ शकतो. निव्वळ एकच काम नाही. विदर्भातील प्रमुख असे 15-16 रस्ते आहेत, जे आदरणीय श्री. गडकरींनी ठरविले आहे की, ते मी करणार आहे, राज्य सरकारचा भार आणि आर्थिक ताण कमी करणार आहे. राज्यावरील आर्थिक ताण कमी करण्याचा तो प्रयत्न आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून आम्हाला अशा प्रकारच्या प्रकल्पांसाठी पैसे मिळू लागले आहेत. मी आपल्या माध्यमातून त्यांचे आभार मानेन. ते निव्वळ बोलले नाहीत तर कामांच्या निविदा निघाल्या आहेत. निव्वळ निविदा निघाल्या असे नाही तर निविदा दिल्या गेल्या आणि त्या माध्यमातून फोर लेन हायवे पहिल्यांदा होणार आहे. मी त्यावेळी आदरणीय श्री. गडकरी साहेबांना बैठकीमध्ये म्हटले होते की, डांबरी रस्ते टिकत नाहीत. रस्ते कॉंक्रिटचे केले पाहिजेत. पुणे-मुंबई एक्सप्रेस जर कॉंक्रिटचा होऊ शकतो तर मग आमच्याकडे का होऊ नयेत ? त्यांनी तत्काळ अमरावतीपासून नवापूरपर्यंतच्या कॉंक्रिट फोर लेन हायवेला मंजुरी दिली आणि त्यामुळे त्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामामध्ये साडे तीनशे कोटी रुपयांची वाढ करावी लागली. पण ही पॉलिसी आहे. मला अपेक्षा आहे की, या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

संदर्भात विदर्भातील विकासासाठी राज्य सरकारकडे आर्थिक ताण असला तरी केंद्र शासनाची मदत घेता येईल. आम्ही सांगितले की, प्रसंगी या संदर्भात कर्ज काढू. तुम्ही कर्ज काढले, ते जाऊ द्या. सदर विषयी परत बोलायचे नाही. आम्ही लागले तर प्रसंगी कर्ज काढू. पण विकासाचा वेग वाढविल्याशिवाय राहणार नाही. विदर्भातील नागरिकांना सातत्याने असे वाटले आणि वाटते की, अधिकारी येत नाहीत, कामे मंजूर होत नाहीत, कामे मंजूर झाली तर कामे करीत नाहीत, कामे करायची म्हटले तर चौकशी लावत राहतात. विदर्भातील जनतेच्या मनात अशा प्रकारची भावना निर्माण झाली आहे. विदर्भातील जनतेला वाटत आहे की, आमच्या संदर्भात वर्षानुवर्षे भेदभाव केला जात आहे. विदर्भाच्या जनतेच्या मनात हे ठाम झाल्यामुळे वेगळा विदर्भ करावा ही भावना रूजली. विदर्भाचा विकास झाला असता तर इतक्या वर्षांत विदर्भवासी आपल्याबरोबर आले असते आणि कदाचित विदर्भातील नागरिकांनी वेगळ्या विदर्भाची मागणी केली नसती. यासाठी तुम्ही-आम्ही जबाबदार आहोत. मी असे म्हणत नाही की, आता विरोधात बसलेलेच जबाबदार आहेत, काही प्रमाणात आम्हीही जबाबदार असू. सदर बाबतीत जबाबदार काही प्रमाणात तुम्ही असाल तर काही प्रमाणात आम्ही असू. विदर्भाचा प्राधान्याने विकास केला तर विदर्भातील जनतेच्या मनातील भावना कमी होऊ शकते. विदर्भातील जनतेला असे वाटत आहे की, त्यांना सापत्नपणाची वागणूक दिली जात आहे. आपल्याकडून ही भावना कमी झाली तर पुढील काळात कदाचित त्यांचे मतपरिवर्तन होऊ शकते. आपण याकडे लक्ष दिले पाहिजे. आज आम्ही दोन घास कमी खाऊ, पण विदर्भातील माणसाला दोन घास जास्त देऊ, ही भावना प्रामाणिकपणे राबविण्याचा प्रयत्न केला तर मला वाटत नाही की, उद्याच्या कालखंडामध्ये सन्माननीय सदस्य प्रा. जोंगेद्र कवाडे मागणी करतील. आपण विदर्भातील अनुशेष दूर करण्याचा प्रयतन करू या. मला वाटते की, हे झाले नाही तर समजू की, आम्ही अपयशी ठरलो. आम्हालाही ते जमले नाही. पण हा प्रामाणिक प्रयत्न आहे. परंतु, मी आपल्याला एक गोष्ट सांगू इच्छितो की, सर्व गोष्टी एका महिन्यांमध्ये होतील, असे नाही. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये साहेबांचे भाषण मी ऐकत होतो. ते म्हणाले की, विदर्भात आत्महत्या, बलात्कार वाढले आहे. मी सांगू इच्छितो की, या गोष्टी महिन्याभरात थांबणार नाहीत. परंतु, हे कमी कसे होईल, 100 टक्के नष्ट कसे होईल, यासाठी आपण प्रयत्न करूया.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे ....

एका महिन्यात सर्व होईल हे तर शक्य नाही आणि आता चमत्कार करण्यासाठी जादूचा दिवा माझ्याकडे नाही आणि अल्लाऊद्दीनचा आणि माझा परिचय नाही. त्यामुळे तेही मला जमणार नाही. परंतु, मी आवाहन करणार आहे की, विदर्भाच्या विकासाचा गोष्टींच्या संदर्भात राजकारण सोडून आपल्याला काम करावे लागेल. सत्ताधारी पक्षाने राजकारण करू नये आणि विरोधी पक्षाने देखील राजकारण करू नये. सत्ताधारी व विरोधी पक्षांनी हातात हात घालून काम करण्याचा प्रयत्न केला तर नक्की विदर्भ 10 पटीने पुढे जाईल. आपण विदर्भाला पुढे नेण्याचा प्रयत्न करू या, एवढेच सांगतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

----

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनामध्ये विदर्भाच्या अत्यंत महत्त्वाच्या चर्चेनंतर सदनाचे नेते माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी त्या संदर्भात आता उत्तर दिले. माननीय मुख्यमंत्री या संदर्भात उत्तर देणार होते. मला वाटले होते की, विदर्भाला विकासाच्या दृष्टीने वेगळ्या प्रकारे काही पॅकेज देण्याचा, इतर काही बाबी समोर आणण्याचा प्रयत्न सदनामध्ये होईल. आज सदनात विदर्भातील कोणीही माननीय मंत्री उपस्थित असल्याचे दिसत नाही. शासनाने विदर्भाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. विदर्भातील शेती उत्पादनाचा विकास साचेबंद रितीने कसा करता येईल, हे पाहिले पाहिजे. शेती उत्पादनाच्या संदर्भात प्रक्रिया कारखाने काढण्याची गरज आहे. शेती उत्पादनावर प्रक्रिया करणारे कारखाने, त्यांना लिंक करणारे नागपूर कार्गोपर्यंतचे रस्ते, औद्योगिक क्षेत्राला लागणारी वीज, कारखानदारी, सूत गिरण्या, साखर कारखाने या संदर्भातील विकास झाला पाहिजे.

सभापती महोदय, आता टेक्सटाईल झोनचा उल्लेख झाला. नवीन सरकारने आमच्या समोर एकूण सर्व बाबतीतील पॅकेज आणण्याची गरज होती. परंतु, राज्य शासनाकडून काही खंडित गोष्टी करण्याचा प्रयत्न होत असताना दिसतो. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यानंतर आम्हाला अपेक्षा होती की, आपण एक विशिष्ट कार्यक्रम घेऊन पुढे जाऊ. परंतु, असे कुठेही दिसून आलेले नाही. आता माननीय मंत्री म्हणतील की, आम्हाला फक्त 1 महिना झाला आहे, आम्हाला आणखी चर्चा करायची आहे. आम्ही नंतर अशा प्रकारच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विचार करणार आहोत. संपूर्ण विकसित उद्योगधंदे, शेतीपासून कार्गोपर्यंत असणारे रस्ते, आवश्यक असलेल्या गरजा, सिंचन या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार करून विदर्भात विकास करीत नाही, तोपर्यंत विदर्भाला न्याय दिला, असे होणार नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..........

मंत्री महोदयांच्या उत्तरामधून आमचे समाधान झालेले नाही. आमची अशी मागणी होती की, शेतकऱ्यांच्या संदर्भात एक कार्यक्रम तयार करावा. यामध्ये संदर्भ दिला होता. शेतकरी कर्ज बाजारी झाला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासंबंधी कोणताही उल्लेख मंत्री महोदयांच्या उत्तरात करण्यात आलेला नाही. आज विदर्भातील शेतकऱ्यांवर अडचणीची परिस्थिती ओढवली आहे. त्याला काही कारणे असतील, निश्चितपणे कोण दोषी आहे, कोण नाही, याबाबतची चर्चा आपण सदनामध्ये करीत असतो. आरोप, प्रत्यारोप होतील. पण कोरडवाहू शेतकऱ्यांना न्याय देण्याकरिता हेक्टरी मदत देण्याची गरज होती. कापूस, सोयाबीन, धान उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत उत्तरामध्ये काहीही उल्लेख केलेला नाही. शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याच्या संदर्भात काहीही उल्लेख नाही व त्यामुळे मंत्री महोदयांच्या उत्तराने आमचे समाधान झालेले नाही. म्हणून आम्ही सर्व विरोधी पक्षाचे सदस्य सदनातून बर्हिगमन करीत आहोत आणि त्या माध्यमातून शासनाचा निषेध करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत सभागृहातून बर्हिगमन करतात.)

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेला सभागृहाच्या नेत्यांनी शासनाच्या वतीने उत्तर दिलेले आहे. त्यांची इच्छाशक्ती जबरदस्त आहे, हे त्यांच्या उत्तराच्या भाषणातून पूर्णपणे जाणवले आहे. परंतु, प्रश्न असा आहे की, हे सर्व विदर्भासाठी करीत असताना विदर्भातील मूळ शेतकऱ्याच्या सोयी-सवलती व योजनांचा विदर्भाच्या बाहेरील लोक अधिकचा फायदा घेऊन त्या पळवून तर नेणार नाहीत ना, अशी भीती मंत्री महोदयांच्या भाषणातून निर्माण होते.

सभापती महोदय, दुसरा महत्त्वाचा भाग त्यांच्या उत्तरात असा यावयास हवा होता की, ज्या अडचणी सातत्याने विदर्भाच्या बाबतीत बोलल्या जातात, विदर्भातील पदे रिक्त राहतात, विदर्भात अधिकारी नेमणुका घेण्यास तयार नसतात, त्यांची अकाऊंटॅबिलिटी फिक्स करणार की नाही ?

सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या भाषणानंतर एक प्रश्न अनुत्तरीत राहतो. हा सगळा विकास करीत असतानाही विदर्भातील जनतेच्या मनात अशी भावना निर्माण झाली आहे की, आमच्यावर अन्याय होतो. विकासाचा पहिला निकष मानव विकास निर्देशांक हा आहे. आपल्याला

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सत्तेवर येऊन महिना, दीड महिना झालेला आहे. आता आपण मोठमोठ्या प्रकल्पस्थळी किती दिवसात काम पूर्ण होणार आहे, या कामासाठी किती खर्च येणार आहे, या बाबतची माहिती माहिती फलकाव्दारे जनतेला उपलब्ध करुन देत आहात. माझी आपल्याला विनंती आहे की, विदर्भातील प्रत्येक गावाचा मानव विकास निर्देशांक काय आहे, दर सहा महिन्यांनी किंवा वर्षभराने त्यामध्ये कोणता बदल झाला आहे, हे तपासले पाहिजे. त्या माध्यमातून त्यांना उपलब्ध होणाऱ्या सोयीसुविधा, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, रोजगार याबाबत होणारा विकास आपल्याला समजून येईल. विदर्भाचा विकास म्हणजे विदर्भातील जनतेचा विकास. विदर्भातील जनता म्हणजे जी मागासलेली आहे, त्यांचा विकास, असा केंद्रबिंदू ठेऊन आपण विकास कामांची रचना केली पाहिजे. आपल्या मनामध्ये ज्या विकासाच्या कल्पना आहेत, त्या पूर्णत्त्वाला जात आहेत किंवा नाही, हे देखील आपल्याला तपासता येईल. कारण, संकल्प आणि सिध्दी यामधील अंतर किती कमीतकमी ठेवता येईल, याबाबतची आपली मानसिकता तयार झाली की मग या प्रश्नाला न्याय दिल्यासारखे होईल आणि त्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अत्यंत उपयुक्त आहे. विदर्भात मानव विकास निर्देशांक सर्वात कमी आहे. त्यामुळे याचा नक्की विचार करु . आरोग्य, परिवहन, पाणी, जमीन किंवा अन्य विभागांबाबतची सर्व आकडेवारी आपल्याकडे उपलब आहे. त्यामुळे मी मुख्यमंत्री महोदयांबरोबर या संदर्भात चर्चा करीन, आपली सूचना देखील त्यांच्या कानावर घालीन आणि या बाबत योग्य विचार करावा, अशी त्यांना विनंती करीन.

**तालिका सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

-------

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 22 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 55 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 22 डिसेंबर, 2014 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------

अग्रिम प्रत / अप्रकाशित नाही